म्हटले तर

कविता

-- चं. प्र. देशपांडे.



एक

मोठ्या गर्दीच्या समारंभात
गुरुमाउलीने केलेल्या
जाहीर सांत्वनाने रडणारा
निर्लज्ज एकटेपणा
आणि
पूर्ण जगबुडी झाल्यावर
फक्त आपल्या सुप्त प्रेयसी
मुक्त होऊन वाचतील
आपल्याबरोबर
या स्वप्नातला एकटेपणा एकच

विषारी वायूच्या खोलीत
फडफडणाऱ्या पक्ष्याने
जगाची धारच घालवून
भयग्रस्त राहावे तसा प्रकार

गर्दी मारून टाकते
आणि एकटेपणा खाऊन टाकतो

या प्रश्नाला सामोरे जायला
ना गर्दी कामाची ना एकटेपणा

म्हटले तर ही समस्याच आहे
म्हटले तर एकट्याचीच
एक
--- ००० ---

भविष्याचे विचार

चंद्र तापलेला असो
की हवेतून मुंग्या निर्माण होत राहोत
आपला स्वर्गनरक
उपस्थितच असणार
आपल्या खिडकीची नियती बनून

आपल्याला वाटते
जागा मिळाली एशियाडमध्ये
की प्रश्न नाही
हरलेल्या विचारांना
विसावा मिळेल

पण अंदाज चुकण्याचा रोग
जगभर पसरलेला आहे
तो माझा काळ कसा सोडेल

कोणत्याही उत्तरांवर
माझा विश्वास नाही
सगळे उतारावरून
घरंगळत चाललेलेच
दिसतात मला

दाढी झाल्यावर
रेझर धुताना मात्र
मी भविष्याचे विचार
थांबवून ठेवतो
--- ००० ---

उत्तेजनार्थ

उत्तेजनार्थ जगता येण्यासाठी तरी निदान
मानसशास्त्राने उपयुक्त म्हणून
जाहीर केलेल्या प्रमाणात तरी
ताणतणाव घ्यावे लागतीलच
भिंतींच्या आडून लपून
जगण्याशी चोरटे चाळे
करता येण्याइतपत

हकनाक जगणेही चालेल
हे एकदा ठरल्यावर
कुणी एक पसंत करून
संसार सुरू करावा हेच बरे

पसंतीसाठी चार्ट आणि कॉलमवाईज गुण
देण्याचा प्रयत्न राबवू नये
बुद्धीचे प्रयत्न अंधार पसरवतात

त्यापेक्षा ऍक्सिडेंट हो गया रब्बा रब्बा
हे कधीही चांगले
याने पस्तावणे तरी टळते

अशा वेळा येतातच की पक्ष
सोडावे लागतात तत्त्वे बदलावी लागतात

यातून कुठवर पोचणार हे न कळताच
उडी घ्यावीच लागणार अंधारात
--- ००० ---

चकित होण्याचे व्यसन

सध्या मला दिसताहेत
उन्हात वितळणारे माझे विचार
आणि मी चकित होतोय
जसा काहीही पाहून मी होतोच

चित्रांचे प्रदर्शन पाहताना
काही जाणकार
काळजीत असल्यासारखे चेहरे का करतात
आणि एकमेकांशी बोलताना
शोकमग्न का दिसतात
हे खरे तर मला खरेच कळत नाही एकूणच
तरीही मी चकित होतोच

माझे विचार वितळणे
आणि ढगांच्या रचना बदलणे
वा नष्ट होणे
हे मला सारखेच वाटते आपोआप
तरीही मी चकित होतोच

मला व्यसन तर नसेल
चकित होण्याचे
जसे खूपजणांना असते
कधीच मुळीच चकित न होण्याचे

मला तर खरेच कण न कण प्रचंड
क्षणोक्षणी सतत चकितच करत असतो
--- ००० ---

मग तर ही कविता

माझ्या डोळ्यांसमोरचे
माझा बुबुळांच्या हालचालींसह
तरळत राहणारे हळुवार काळे ठिपके
आणि मी राहून सोडलेली
अनेक घरे आणि गावे
हे काहीच मनावर न घेता
मी कीबोर्डाकडे लक्ष ठेवतो

मी माझे वा माझ्या अनुभवांचे स्तोम नाही माजवत
माझ्या आठवणींनाही मी धरून नाही ठेवत

कुणालाच माझ्याबद्दल खात्री नाही वाटत
माझा राग राग करून तरी काय उपयोग
या विचाराने सर्वजण
आपापली दुकाने गाठतात

आणि विशेष म्हणजे या सगळ्या प्रकारात
मी लिहितो कविता जी कुणालाच
कळत नाही पण अनेकांना आवडते

मग तर ही कविता अमेरिकेतल्या
वा फ्रान्समधल्या वाचकालाही आवडेल

ओझी सोडून देण्याचे मार्ग तर
सगळ्यांनाच हवे असणार
--- ००० ---

मूक शब्द

तुझ्या एका हललेल्या दिव्यातून
एका कृतीतून आणि एका मूक शब्दातून
अंधार भेदणाऱ्या --
दूर समद्रात थांबलेल्या
माझ्या होडीला कळते --
हा चोरीचा माल
पुढे न्यायला हरकत नसल्याचे --
--- ००० ---

वास्तव

प्रत्येकजण जर
आपापल्या मानसिक गठ्ठ्यातूनच
जगत असेल तर याचा अर्थ
सगळीकडे चालू असते फक्त राशोमानच

मग मला खरे वाटते
तेच मी जगून तरी उपयोग काय
मला हवे ते मादक वास्तव
खरे मानूनच का नये जगू मी

मी कुठे जन्मलो वाढलो
कुठे नोकरी केली
कुणाशी भांडलो
हे हवेय कशाला सगळे

आपण अशीच घडवू आपली वास्तवे
जी एकमेकांच्या प्रेमात पडतील

वास्तव बदलतबिदलत नसते
ते फक्त घडत असते
एवढे समजले की झाले

मी सांगतोय ते माझे वास्तव
तू स्वीकारून चाल
तुझ्या (वास्तवाच्या) तर मी प्रेमातच आहे
--- ००० ---

ढगाचे नावीन्य

खिडकीतून ढग
घरात आल्यामुळे
मनाला काहीच फरक नव्हता पडणार
एक किरकोळ नावीन्य
इतकेच घडणार होते
आणि तसेच झाले

खूप मोठे नावीन्य असेल
तर मन म्हणते वॉव
च्यायला धक्काच बसला
मग तो सुसह्य
गोड वा भयप्रद असू शकतो
इतकेच

फारच मोठा बसला धक्का
तर ते उन्मळूनच पडेल
हे मनाला माहीत असते

मन तर तेच असते नेहमीच
धक्का असो की नसो

त्याला नकोच असतो
फार मोठा धक्का
ते जिवंत असेपर्यंत

ढगाचे नावीन्य परवडते
--- ००० ---

साधन

हे राहिलेय ते राहिलेय
गैरसमज काढायला हवा होता
झालेला अपमान अजून तरळतोय
आणि कायद्याची नीट माहिती
घेऊन मगच तमुकशी बोलायचेय

आणि तरीही
अनेक ठिकाणांहून येणारे
परिपूर्णतेचे स्पर्श
-- खरे तर
एकाच अवकाशातून येणारे

त्या स्पर्शाचे तेव्हाच होते
असणे पूर्ण
जेव्हा तो पूर्णतेने स्वीकारला जातो
-- तेच असते त्याचे सार्थक

ते स्पर्श स्वीकारताना
काहीच राहात नाहीय

राहिलेले राहणे महत्त्वाचे
की स्पर्श
हे ठरवायला साधनच नाहीय
--- ००० ---

पुसट आणि स्पष्ट

पावसात डोंगर गडप
इमारती झाडे पुसट
मला हव्याशा असणाऱ्या
अनेक गोष्टींप्रमाणे

मधेच इंद्रधनुष्य आलेय
तेही पुसट आणि अर्धवट

माझ्या आठवणी माझे अनुभव
हे तरी आहेत का माझ्या इच्छेत
या प्रश्नाने मी व्याकूळ

हे नेमके तुला कसे कळते
दार उघडताच पूर्ण स्पष्ट तू समोर
माझी निथळती कविता
--- ००० ---

दोन स्वर्ग

एकीकडे कुणी असणे
एकीकडे कुणीच नसणे
दोन्हीकडे माझे जाणेयणे
स्वतःला लपवून
लोकांत वावरत

दोन्हीकडे नष्टच व्हावे लागते
-- लोक काय म्हणतील
याची नकोच कटकट
म्हणून कधी मी बसून असतो
बंद दुकानाच्या फळीवर
तर कधी टाकतो सरळ
सूर्यावर चादर

नष्ट न होता
नष्ट व्हायचे असून
मी एखाद्या मैफलीला जातो
रंगतोही तिथे पण मापात
अगदीच धुंद न होता
-- एवढी काय गरज आहे --
विचित्रपणा सगळा
-- असे मी होऊ देत नाही

मी सपाट राहतो
मद्दडही राहतो
परवडते – माझ्याकडे दोन स्वर्ग असतात
--- ००० ---

ऍलर्जी

बऱ्याचशा आठवणी
विस्मृतीच्या शिला होऊन
डोंगरदऱ्यांत पडल्या असल्या
तरीही त्यांच्या
सावल्या राहून गेलेल्या असतात --
आठवणी आणि त्यांच्या सावल्या
यांची फारकत हीच असते माझी
खोलातली ओळख

प्रतिक्रिया देण्याची माझी यंत्रणा
निर्दोष न्याय्य आणि नैतिक
असल्याच्या खात्रीने
मी आत्मतुष्ट हल्ले करतो
असंख्यांच्या सावल्यांवर
मला दिसणाऱ्या

त्यांच्या आणि माझ्या
दिसणाऱ्या सावल्यांची
भांडणे होत राहतात
लख्ख सूर्यप्रकाशात सरकारी नळावर

मग हळूहळू एकूणच
आमच्या आमच्यात विकसित होत राहते
आपापल्या परक्या सावल्यांची ऍलर्जी

आणि आमच्या आपापल्या ओळखी पक्क्या होत राहतात
--- ००० ---

फिट

संध्याकाळ घडवते हळूहळू
प्रकाशात बदल
रस्त्याला कळते काही संपतेय
आणि अंधार तर
कुठे नेईल कोण जाणे

बदलाच्या अस्वस्थतेने
कवी लिहितात
विरहाच्या वा दुःखाच्या कविता
फिट करून टाकतात सगळीकडे
की संध्याकाळ धोक्याची

मग प्रत्येकच गोष्ट होऊ लागते
ठराविक काळाला जोडलेली
उगवता सूर्य
जणू दूतच असतो
विचाराला नवा कोंब फुटण्याचा

मग ठरतात पावसाळ्याचे अर्थ
थंडीत पांघरल्या जातात प्रेमाच्या कहाण्या
असे होत होत एकदा कळते सहजच
आता तर सगळेच फिट झालेय
मृत्यू जवळ आला असावा बहुतेक
--- ००० ---

जनम जनम

मी क्षितिजाकडे पाहिले तेव्हा
त्याची कड किंचित दुमडली गेली
असे मला वाटले

हा अपमान समजावा की बेफिकिरी
की आपोआपच परस्पर निर्हेतुक
काही घडले असेल

एक झाड माझा मित्र होते
पण त्याला विचारून उपयोग काय
इतके पर्सनल आणि ते योग्य तरी आहे का

खिडकीचे गज मोजले उगीचच
इकडे आत तर काहीच घडले नव्हते
खरे तर तसे काहीच घडलेही नव्हते

हातात चहाचा कप आणि चहा
गार होत गेलेला वाफाही
थांबत आलेल्या

माझा पुनर्जन्मावर विश्वास नसून
आठवतेय कुठले जुने गाणे
तर ' ये है जनम जनम के फेरे '
--- ००० ---

खरे तर आता

तुझ्या भेटीला पर्याय म्हणून मला
पावसा आधीचे अंधारलेले आकाशही चालते
तपशीलांचे महत्त्वच पुसून टाकणे
हा तुझा आवडता चाळा
आता माझ्या आयुष्याचा भागच आहे

हे सगळे काय घडत असते
या बाबतीत तू अनभिज्ञ असतेस
सगळे विश्वच तू असल्यामुळे

खूप पाऊस पडला तरी मी भिजत नाही
आणि कंटाळा तर आता
किस चिडिया का नाम है असे झालेय
मला कळू लागण्यापूर्वी
हे सगळे होते का अस्तित्वात
हा प्रश्नही गेलाय लयाला

मला भेटण्यासाठी तुला
काहीच नाही करावे लागत
मलाच नेहमी माझे गाव सोडावे लागते

खरे तर आता आपल्या भेटीचीही गरज नाही
माझे गाव तरी कुठे राहिलेय

प्रत्यक्ष मीलनातही अघटितपणे
आपण गुंतलेले नसतोच
--- ००० ---

इतिहास टाकून

कुठल्याही परिस्थितीत
आपण जगण्यातल्या अनिश्चिततेचे बळी ठरलो
असे होऊ नये म्हणून मी इतिहासाचा अभ्यास सुरू केला
हे गृहीत धरून की काही तरी शिस्त असणारच
अन्यथा बेशिस्त हा शब्दच नसता आला भाषेत

मला प्रेरणा स्फूर्ती अस्मिता असले बालिश काही नकोच होते
इतके कमकुवतही नव्हते माझे मन
की इतिहासाच्या सततच्या पाठांतरा अभावी
चेहरे पाडून मरत राहावे लागेल

सूर्याच्या आडून आणि चहा पिता पिता
एवढाच होता माझा विचार
की राजकारणात यशस्वी व्हायचा आपला विचारही नाहीय
तर हवाय कशाला आपल्याला आटापिटा लाखांचा पोशिंदा होण्याचा
किंवा अभिमान धर्माचा किंवा भाषेचा किंवा पक्षाचा किंवा गरिबांचाही

अत्यंत अप्रदर्शनीय कान पाडून निःशस्त्र जिंदगी
मान्य केली तरी पटकन चढवता येणारी वाघनखे
बाळगावीच लागतात हे एवढे एक तत्त्व एक प्रेरक धडा
म्हणून इतिहासातून आलेले मला मान्यच होते

म्हणून मी फक्त धोके कमी आणि जगणे जास्त
एवढेच शोधत होतो – मागत नव्हतो काहीच कारण देव
स्वतःच अनिश्चित आहे हे मी जाणून होतो --
माझा इतिहास टाकून मी पुरेसा नम्र राहायला तयार होतो
--- ००० ---

ते वाईट हे चांगले

भूतकाळावर बेतलेला धार्मिक द्वेष वाईट
पण तसाच जातिद्वेष चांगला

तुमचा धर्माभिमान वाईट
पण त्यांचा चांगला

देवदेवतांच्या विटंबनेने भडकणे वाईट
पण मानवी विभूतींच्या समर्थनीय

पुराणांचे दाखले वाईट
पण इतिहासाचे सारखे द्या

संतांचा गवगवा हे ढोंग आहे
पण मार्क्सचा गवगवा बुद्धिमान

योग ध्यान अद्वैत ही बकवास
पण नथिंगनेस ग्रेट

प्रत्येकाचे वास्तव वेगळे का असे ना
पण वास्तववाद महान पण फँटसी खोटी

तुला कळते ते पोरकट
पण मला कळते ते प्रगल्भ

तुला तुझे खरे वाटणे हा वेडेपणा आहे
सरळ माझे खरे सत्य स्वीकार
--- ००० ---

मारेकरी

कवितेत मी शब्द
पूर्ण पिळले
तेव्हाच माझे मारेकरी हजर झाले
त्यांना मी दिसलो नाही

त्यांना शंका आलीच
की मी कवितेत असणार
म्हणून त्यांनी तिला घेरले
चहूबाजूंनी कुठूनही
अर्थ निसटून सुटू नये
अशा बंदोबस्ताने

तरीही त्यांना काही कळे ना

त्यांना ऐकू जाईल असे मी बोललो
कवितेतून निःशस्त्रपणे –
तुम्हाला ही कविता न कळणे
हेच मला मारणे आहे
हे लक्षात घ्या

फक्त माझ्याबरोबर तुम्हीही मराल
त्याला आता इलाज नाही

आपण हा सोहळा
एकत्र साजरा करू या
--- ००० ---

नॉर्मल जग

मने तुंबलेली माणसे
बाहेर पडतात
लोकल्स बंद असल्या तरीही

प्रचंड शहरातली
प्रचंड हॉटेल्स
आणि हॉस्पिटल्स
रुबाब सांगत राहतात
संपर्कहीन

खिशात पैसे नसलेली
आशाळभूत माणसे असतात
एकाच इच्छेत की जगात पोलीस नसावेत

तुरळक रहदारीच्या रस्त्यांवर
हरणे मोर आणि माकडे
चैनीत बागडतात
पक्ष्यांनाही आकाश
जरा अधिकच मोकळे वाटते

मास्क घातलेली माणसे
भोके पाडू पाहतात मनांना
श्वासोच्छवासासाठी भीती आवरत

चार वस्तू घेऊन पुन्हा घरी परतणे आता
भागच असते हेच नॉर्मल समजून जग
--- ००० ---

झोपेवर

ऍलर्जीने जगाला खाज सुटते
जग घेते लोरिटिडीन
आणि नकळत हळूहळू
झोपी जाते

जागे झाल्यावर
तोल सावरण्यासाठी
जग घेते स्टुजेरॉन
आणि पुन्हा झोपी जाते

झोपेत जग
झोपेवर घेते स्वप्न
आणि हळूहळू जागे होते
जागेपणात ते झोप टाळत राहते
--- ००० ---

हात

वीस लाखांचा मोबाईल
सोन्याचा आणि सात हिऱ्यांनी मढवलेला
कसा आला होता माझ्या हातात ते नका विचारू
आकाशात उडालेले गंजलेले पत्र्याचे डबे
पक्षी समजून उड्या मारत मी
अद्वैत तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला होता
आहाराचे काही नियम पाळत

तरीही पोट दुखले तरी मी हवालदिल होत
शास्त्रीय संगीत ऐकण्याचा हट्ट धरून बसे
कारण त्याने बरे वाटते असा माझा अनुभव होता

तर माझ्या याच उजव्या हातात आला होता तो
अडीच मिनिटे म्हणून मी रोज
संध्याकाळी माझ्या या हाताला सजवून
त्याला लोकांच्या दर्शनासाठी ठेवू लागलो
तो हात शुभ आहे असे सगळीकडे पसरले
लोकांच्या अनुभवांचा एक ग्रंथच झाला

तो हात मस्तीमुळे कधी कधी माझ्याशीही
मग्रुरीने वागू लागला पण आता मला माघार घेता येई ना
खूप फायद्यासाठी थोडा त्याग करावाच लागतो ना

हे सगळे कळले एका भूखंडप्रिय राजकीय पुढाऱ्याला
तेव्हा मी हादरलो कारण निरोपच आला ना
" ये हाथ मुझे दे दे ठाकूर ये हाथ मुझे दे दे "
--- ००० ---

गुरुत्वाकर्षण

मी काही मांडणीशिल्पे केली
चित्रे तर खूपच काढली
माझ्या प्रत्येक कलाकृतीत मी
गुरुत्वाकर्षणाचे बारा वाजवले

मन म्हणजे अमुकच हे खोटे असते
हेच मला दाखवायचे होते

बघताना काहीजण तिरके होत
काहीजण जमिनीवर पडून पाहात
काहींचा तर तोलच जाई
काही म्हणत भोवळ येते हे पाहून
कहर म्हणजे काहींना
बेशुद्ध पडायचीच भीती वाटे

अभिप्राय आणि प्रतिक्रिया अनेक येत
अचंबित झालो दिङमूढ झालो
मला माझी पहिली प्रसूती आठवली
हे आरोग्यविघातक आहे
निसर्ग नाकारणे हे लोकांना
वेडे करण्याचे पहिले पाऊल आहे

काहीजण तर म्हणाले की त्यांच्या भावना दुखावल्या
मग दंगली करण्यापेक्षा जा कोर्टात मी म्हणालो
तुम्ही कलेच्या वाऱ्यालाही नका येऊ
असा त्यांना सल्लाही दिला
--- ००० ---

शिल्प

अनावश्यक वाटणाऱ्या
कपच्या उडवून
मनाचे शिल्प साकारले
हे सुंदर कसे वाटणार सर्वांना
जे स्वतःच उडवले गेलेत
त्यांना वाटणाऱ्या माझ्या माणूसघाणेपणातून

हे जग काही मी घडवलेले नाही
मग माझ्या निर्णयांना जबाबदार मीच कसा

आता शिल्प म्हणून जे काही उरले आहे
तेही जडच आहे आणि कंगोरे असलेले
कधी अक्राळविक्राळ कधी अचकटविचकट
आणि कधी लोभस सुखदेवघेवी

फक्त प्रमाण खाली आणलेय जगाचे
आधी गरीब व्हा मग सत्याचे बघा
हे पटल्याने किंवा समजल्याने

आणि अंतिम म्हणजे हे शिल्पही
नष्ट होऊ शकते पूर्ण ताणशून्यतेत
हे माहीत झाल्याने मी व्यक्त करतो
व्यक्तिशून्यतेचे स्वातंत्र्य

पण लोक मला अमुक एक कवी समजतात
--- ००० ---

घट्ट वाफ

आपल्या घरात घट्ट वाफ
जगून झालेल्या वर्षांना झाकून टाकणारी
आणि गुदमरवणारी अनुभवाच्या भाषेला
अशा क्षणाची कल्पनाही
नात्यांचे जंजाळ करते
संशयास्पद

आपण पाहिलेली तीर्थक्षेत्रे
हात जोडून उभी असल्याप्रमाणे
पराभूत आणि केविलवाणी
पण स्मृती सोडून जायला घाबरणारी

दुःखावेग आणि भीती असह्य झालेला धोंडा
स्वतःहून पडत असणार नदीत
मृत्यूत स्मृती नष्ट होणारच या खात्रीत

प्रेमाचे उत्तेजक प्रवाह
जे कधी ओलांडून गेले होते
काळाच्या सीमा
आता फक्त झालेले
एक जुने मातकट कोळिष्टक

असा क्षण घडवण्यासाठी
पूर्ण विश्वाने कामाला लागावे

इतके आपण महत्त्वाचे आहोत की काय
--- ००० ---

परका

खरे तर मी बाहेरचा परका आहे
माझ्या असण्यातली फॉरेन बॉडी
हे मी पाहिलेले असूनही
मी व्यापतोय हे घर मालक म्हणून

मालक असण्याचे ताण
व्यापतात माझे शरीर
आणि दुखू लागतात हाडे

तेव्हा मी तयार होतो
मालकी सोडायला

मला वाटते की
मालकी सोडून मी होईन
खुशाल मालक
ताजातवाना

यापेक्षा माझे परकेपण
दिसलेच नव्हते
तेच बरे होते
असे स्पष्ट कळावे
अशी होते तडफड

मी परका होण्याची नसावी ही भीती
जगच नाहीसे होण्याची असावी
--- ००० ---

कविता आणि कवी

नेहमी
कवीच देतो कवितेला शब्द
असेच असते कवितेचे अवतरणे
पण अचानक कधीतरी
लहर लागल्याप्रमाणे
कविता फक्त खूण करते कवीला
आणि स्वतःच देऊ लागते शब्द

कवी काहीसा चकित होत
कवितेचे हे प्रेम येऊ देतो
हे तर अधिकच अर्थपूर्ण
असे म्हणत
येणाऱ्या अर्थावर
मुळीच ताबा न ठेवता

आता कविताच कवीचा
ताबा घेत असली तरी
अनपेक्षितपणे
किंवा खरे तर अपेक्षेप्रमाणे
कवीला हवे तेच अर्थ
आकार घेत राहतात

अंतिमतः ताबाहीनपणे
निरर्थकतेच्या बिंदूवर
स्फोट पावणारे
नेमके
--- ००० ---

मोजूनमापून

मला हवे ते भाषेचे रूप
ते हेच हे कळते तेव्हा
मी कमी बोलतो
आणि तिलाच उद्युक्त करतो
तिचा शब्दकोश खोलायला

तिच्याकडे असतो
अजब आत्मविश्वास
माझे कोणते शब्द जाऊ द्यायचे
आऊटसाईड द ऑफ स्टंप
हे तिला सहज कळते आणि तरीही
वेगळ्याच विषयावर बोलताना नंतर
तिने माझ्या आधीच्या शब्दांवरचे
तिचे सखोल अबोल निरूपण
म्हटले तर नकळत
देऊन टाकलेले असते

भाषेचे हे रूप घडता घडताच
सहजच हे असे परिपक्व झालेय
हे येते लक्षात
तरीही मीही नम्र आणि सौम्यच
असायला हवे असे ती म्हणत नाही

मग मला कळते माझे शब्द कोणतेही असोत
मोजूनमापून असाच सूचकपणा असणार आहे
भाषेच्या या रूपात
--- ००० ---

त्वचा

पृथ्वीच्या त्वचेला
मुळीच इजा न करता
मी करतो हे विचार
कारण ते असतात
प्रत्यक्षात अस्तित्वातच नसलेल्या
आभासी सुखाचे

आभासी सुख सोलत राहते
माझ्या मनाची त्वचा
हे कळूनही मन करत राहते
पुन्हा पुन्हा पुनरावृत्ती

आभासी सत्य
हे आभासी नसतेच
ते प्रत्यक्षच देते
सुखाचे रक्तबंबाळ क्षण

आभासांची अशी
अब्जावधी कथानके
पाहिली असणार पृथ्वीने
सर्व सत्ये कदाचित
एकसमान समजून

सुखाची शिक्षा भोगणारी माणसे
तिला नवी थोडीच असतील
--- ००० ---

आदर्श जगणे

ब्रेकपच्या घटनेचे
दुःख भोगणारा नास्तिक
हसतो धार्मिकाला
तपात एका पायावर उभ्या
समाजकार्याची घट्ट भूमिकाच
आदर्श जगणे म्हणत
--- ००० ---

करियर

घरच्या घरी शांतपणे
आपली आपण कॉफी पिणे वेगळे
आणि लग्नसमारंभात मेसेजगिरी
करत बसणे वेगळे कोणत्याही कारणाने
केसगळती हा विषय निघाला
तर शाळेतले दिवस आठवणारच
पर्यायच न राहिल्याने
पडणाऱ्या सरकारप्रमाणे

बुफे जेवताना एकही डाग नाही पडत
शर्टावर असे जमत नसेल तर सरळ
आत्महत्येचे विचार घोळवत ठेवावेत
डोक्यात सूर्याची भीतीही बाळगत

तत्त्व म्हणजे एकच पाळावे
परान्न सेवन करणे रोज
हेच असावे जिवाभावाचे जंगल
वृक्षवल्ली हे गाणे म्हणत
आणि किंवा जरी मनात कण्हत
फारशी करियर न घडल्याने

अरे छोड दो क्या है जिंदगी
असे म्हणत आपले नाव छापून आलेला
कॅरम खेळल्याबाबत वीस वर्षांपूर्वीचा आपल्या
ऑफीस वार्षिकाचा अंक दाखवावा नातवंडांना
सहज बोलता बोलता तिसऱ्यांदा
--- ००० ---

जागतिक कला

इथे फुटाणेही मिळतील आणि पिझ्झाही मिळेल
जागतिक कलेच्या चर्चा आपापल्या
टोळ्यांना अनुकूल कशा होतील
याच्या युक्त्याही चघळल्या जातील
सत्ताधारी बदलण्याचे ध्येय ठेवून

हे अनुभव येऊ द्यात ते तर हवेतच
आपापले जग दुःखे हायलाईट व्हायला हवीत
मुलांना हे वाचू द्या हे शिकू द्या
लोकलमधूनच ती ग्लोबल होतील
बघा ना नोबेल भाषणे
ते साले संपूर्ण जागतिक इतिहास
आणि स्वतःच्या देशाचे इत्थंभूत कल्चर आणि समस्या
यांना कसे भिडतात माणुसकीने

ना तत्त्वज्ञान ना खुला इतिहास ना करुणा
अभ्यासक्रमात मुलांच्या माथी बसलेले सम्राट
महान मान्यतांची वर्गवारी आणि वाटप
यांवर पोसलेले आत्ममग्न शिलेदार
मावळे वारकरी भक्त क्रांतिकारक मूल्यचक्र
फिरवणारे भांडल्याशिवाय कसली जाण
या तत्त्वाचे अभिमानी संघटक झेंडेवाले

माणसाच्या अवधानाचे तुकडे करून
इथल्या इथेही एकमेकांची फिकीर न करणारे तुसडे शत्रू
ज्ञान प्रेम माणुसकी न्याय स्वातंत्र्य या शब्दांचे पुरस्कर्ते
--- ००० ---

मथुरेचा बाजार

रात्रीच्या मोहात पडलेले अवडंबर एका कॅनॉलचे
हलकेच घुसते विद्यार्थ्यांच्या पुस्तकांत
जेव्हा पहाटेचे साडेपाच झालेले असतात

अजून कुणीच म्हणणार नसते शोकगीत
लुळ्यापांगळ्याअंधळ्या चित्रपटांचे
कारण आकाशात उडालेले कारखान्यांचे मुकुट
लक्ष ठेवून असतात कधी जाग्या होतात
रस्त्याकडेच्या सोनेरी टपऱ्या यावर

माणसाचे विचार जसे कधीही टपून असतात
संघर्षांच्या संधींसाठी तसेच स्वप्नांचे साठे
तिष्ठत असतात युगानुयुगे वाट पाहिलेल्या होकारांसाठी

आपले नसलेले असे असेल का काही बिनाकटकटीचे
यावर मग परिसंवाद भरवायचे ठरते पानटपऱ्यांचा
सापडले तर आता त्यांनाच काही सापडेल
असे वैचारिक अवगुंठन बाळगत नाइलाजाचे

विद्यार्थ्यांना यांतले काहीच नाही पटत
त्यांना वाहून जायचे असते
ऍसिडच्या कॅनॉलमधून
एकविसाव्या शतकातल्या
मथुरेच्या बाजाराला
सगळीकडे
गोपीच असतील स्मार्ट रिसेप्शनिस्ट या खात्रीने
--- ००० --

उदबत्ती

अव्याहत वाह्यातपणा करणारे
बारमधले पुजारी बाह्या सरसावून
जेव्हा सारवसरव करतात
पूजासाहित्यातल्या घोळाची
तेव्हा गिऱ्हाइके विचारत असतात
त्यांच्या मनांच्या बिळांतून
बाहेर पडलेले आध्यात्मिक प्रश्न
बिलांच्या पेमेंटची वाट पाहणाऱ्या वेटर्सना

बेटर लेट दॅन नेव्हर असे म्हणत
मनीसेव्हर फ्रॅन्स सरकवले जातात हातांत
बाहेर पडण्यापूर्वी कुष्ठरोगी मातांच्या
पिऊन तर्र झालेल्या हसतमुख

प्रश्न असतातच आध्यात्मिक
हे सगळेच स्वीकारतात
पण त्यात किती वेळ घालवणार
म्हणून सगळे कुरकुरतात

दुःखाने मेलो तरी बेहत्तर असे म्हणायची
सवयच लावतात सगळे आपापल्या मुलांना
आणि यावर बारमालक खुश असतात

हातोहात मिळणारे तहहयात गिऱ्हाईक
ही या सगळ्यात त्यांची कमाई असते
उदबत्ती लावून नम्र होता होता
--- ००० ---

समाधी

कुणी डोळे मिटले म्हणजे
सगळे जग समाधीत गेले असे नाही
वाटाण्याच्या अक्षता
जेव्हा लपूनछपून लावल्या जातात
विवाहाची शक्यताच नसलेल्या
पावसाला
तेव्हा साहजिकच पाऊस विचारणारच

पावसाला अनुभव असतो पोकळीचा
याचे ना उत्तर येणार असते ना कबुली
पत्र्यांवर खूप आवाज केला
तरी खोट्या समाधीपुढे काही नाही चालत
हे त्याला माहीत असते

त्याला हेही माहीत असते की
अशा समस्येवर विचार करणेही
असते त्या समस्येपासून पळून जाणे

तो फक्त एक वाटाणा
हवेत उडवून दाखवतो
आणि पुढच्या मुक्कामाला निघून जातो

खोट्या समाध्या न लावणाऱ्या व्यक्तीही
असतात त्याच्या खुल्या जगण्यात

स्वतःच्या पोकळीतून बाहेर पडणे त्याला माहीत असते
--- ००० ---

सूर्याला येतो ताप

कोणतेच आडपडदे नसलेला सूर्य
विचार करकरून काळवंडतो
रात्रीच्या सुखाचे

खरे तर घड्याळ पुढे नेणे
हे असते त्याचे काम
तर तो राहतो थांबून साकळून

निसर्गात कुठेच नसते
हे विचारांचे लफडे ही कसली
बाधा हे कुणालाच कळत नाही

सूर्याला येतो ताप त्याचे अंग
दुखू लागते तेव्हा मात्र तो
शहाणा होऊन वर्तमानात येतो
--- ०००---

जळमटे

हरलेले लोक जिंकलेल्यांवर
दुगाण्या झाडत बसतात
आणि अधिकच थकत जात
भविष्यातल्या शक्यताही
कमकुवत करतात

हे तिला पटत नसे
ती म्हणे मानवी जगणे
जुन्या जळमटांसारखे असते
त्याला एकच अशी पद्धत नसते

तिचा प्रश्न ब्रेकपचा होता
त्याने दिलेल्या दुःखाचा
तिला बदला घ्यायचा होता
आणि तो तर म्हणत होता
की ब्रेकपने तो दुःखीबिःखी होणार नाही

मग उपयोग काय तो धक्का देऊन
हा जास्त विचार करत बसावे
तर उलट त्यालाच मिळू शकते संधी
धक्का देण्याची आणि मग तिलाच उलट
दुःखही होऊ शकते आणि अपमानितही
वाटू शकते आणि निर्णयविलंबाची खंतही

जळमटे हाच असतो सारांश हे ज्ञान काही
शांतता देणारे नसते हे ज्ञान तिला आता होत होते
--- ००० ---

विजय

यात विजयबिजय कसला --
माझा पराभव स्वीकारण्याचा डाव
तुला कळलाच नाही
असे दाखवण्याचा डाव
तू खेळलीस
मनातून माझा विजय स्वीकारत
इतकेच

मीही मग माझ्या
पराभवाचे ताणून नाही धरले
--- ००० ---

बहिरा विदूषक

नर्तकीच्या नखाची
सर नाही येणार
दुभंगलेल्या विचारांच्या विदूषकाला
-- नर्तकीला नसते माहीत तिची गती
आणि विदूषक असतो मूढ
त्याच्या स्थितीबाबत

ढग येणे जाणे
ही काही घटना नसते नर्तकीला --
दुभंगलेला विदूषक येतो दबावाखाली

विदूषक थांबलेला असतो
त्याच्या चापल्यासह
त्याच्या स्वभावात
नर्तकीला असते फक्त नृत्य
तिच्या आरशातून बाहेर पडलेले

विदूषक समजून घेऊ पाहतो
नेमकी कशाने आली घटस्फोटाची वेळ
पण त्याचा स्वभाव
सर्वच सत्यांचे करतो तुकडे

समजणे म्हणजे घटनाच नसणे
हे सांगतेय नर्तकी बहिऱ्या विदूषकाला
--- ००० ---

तू माझी वाट पाहा

तू माझी वाट पाहा
मी आलोच माझ्या नशिबाला हसून

तू माझी वाट पाहा
मी आलोच माझ्या आठवणींची वाट लावून

तू माझी वाट पाहा
पण आता मी तोच नाही येणार

तू माझी वाट पाहा
मी येण्याची शक्यता मावळेपर्यंत

तू माझी वाट पाहा
वाट पाहणे निरर्थक आहे हे कळेपर्यंत
--- ००० ---

एकच सत्य

तुझे इतके शब्द
आश्वासकतेत ओसंडणारे
त्यांचे तुझ्या मनातले अर्थ
माझ्या मनातले अर्थ
वेगवेगळे
असे काही नव्हतेच
होते फक्त तू बोलणे
आणि मी ऐकणे

दुतर्फी अर्थहीन
असण्याचे एकच सत्य
दुतर्फी व्यापून
दुतर्फी अर्थपूर्ण
गूढ आणि स्पष्ट
जणू दोघांनाही
माहीतच नसणारे

आणि दुतर्फी हवेसे
जाणीवपूर्वक
--- ००० ---

रस्त्यांच्या सावल्या

तो माणूस होता हुशार
त्याला एक तत्त्व सापडले होते
की बाबा रस्त्यांना सावल्या नसतात
मग हा एक नवाच विचार पाहून
पक्ष्यांनी आणि उंदरांनी त्यात भर घातली
ती अशी की समुद्रालाही नसते सावली
आणि इंद्रधनुष्यालाही

मुंग्यांना हे काहीच पटत नव्हते
त्या म्हणत होत्या की हे तत्त्व मान्य आहे
पण यावर आधारित पूर्ण
जगण्याची व्यवस्था नका लावू
इतर हजारो लाखो गोष्टी
यात कशा मावतील

तो माणूस म्हणाला
इथे स्वर्ग आणायला
आहेच काय दुसरे साधन
विचारांनीच तर दिशा ठरवून
ग्रहणे टाळावी लागतील
विचाराला टोक असू शकते वा धार
पण तो अमर्याद म्हणजे काहीच नसणे
नाही होऊ शकत हे समजूनच जायचे पुढे

मग मुंग्यांनी नाद सोडून दिला आणि होईल
ते होईल म्हणून त्या गेल्या ऑफिसात
--- ००० ---

समता

शरीर आकार शक्ती मेंदूचा आकार
त्यातली रसायने त्यातले वायरिंग
आकलनाची आणि निर्णय घेण्याची पद्धत
या सगळ्यांतच असतो फरक
स्त्री आणि पुरुष यांत
तरीही हवी असते समता

कवीला एक स्त्रीच विचारते
तुला कसे कळते स्त्रीचे मन
इतके कसे ते माझेच वाटते

कवी म्हणतो
मी प्रेम करतो स्त्रीवर
म्हणजे लोपच पावतो
मग फक्त तीच उरते

कवी म्हणतो लवचिकता हवी
मुलायमता नाजुकता हवी
भोवतीच्या भिंती वितळवून टाकणारी

जगण्यात समता नाही येऊ शकत
प्रेम येऊ शकते

तू तुझ्या वेगळेपणाच्या समृद्धीत राहा
मी त्याच्या बाहेरून तुझ्याकडे पाहीन
--- ००० ---

वॅलेस स्टिव्हेन्स

वॅलेस स्टिव्हेन्स हा २० व्या शतकातला अमेरिकेतला एक महत्त्वाचा कवी मानला जातो. १८७९ ते १९५५ हा त्याचा जीवनकाल होता. तत्त्वज्ञान, मानवी कल्पनेची परिवर्तनक्षमता, वास्तव आणि सत्य यांचे चिंतन, विलक्षण प्रतिमा आणि गूढता ही त्याच्या कवितेची वैशिष्ट्ये होती. मला आवडलेल्या त्याच्या दोन कवितांचे मीच केलेले अनुवाद खाली देत आहे --

१. घर होते मूक आणि जग होते शांत (The House Was Quiet and the World Was Calm)

घर होते मूक आणि जग होते शांत
वाचक झाला पुस्तक; आणि उन्हाळी रात्र

होती जणू सभान असणे त्या पुस्तकाचे.
घर होते मूक आणि जग होते शांत.

शब्द असे उच्चारले जात होते की जणू पुस्तक नव्हतेच तिथे,
पुस्तकाच्या पानावर वाकला होता वाचक हे वगळता,

वाकण्याची इच्छाच होती त्याची, अधिकच अधिकतम असण्याची
एक अभ्यासक ज्याला होते त्याचे पुस्तक सत्य आणि ज्याला

ती उन्हाळी रात्र अशी की एक विचाराची परिपूर्णताच.
घर मूक होते कारण त्याला तसे असणे भागच होते.

ती मूकता होती अर्थाचा एक भाग, त्याच्या मनाचा एक भाग :
त्या पानाकडे जाणारा परिपूर्णतेचा मार्ग.

आणि जग शांत होते. सत्य त्या शांत जगातले,
ज्यात त्याव्यतिरिक्त कोणताच नाही अर्थ, जे स्वतःच

आहे शांत, जे स्वतःच आहे उन्हाळा आणि रात्र आणि स्वतःच
आहे तो वाचक जागत वाकलेला आणि वाचत असलेला.
--- ००० ---

२. नुसते असण्याची कविता (Of Mere Being)

मनाच्या शेवटाशी ताडीचे झाड,
अंतिम विचाराच्या पल्याड, उद्भवते
कांस्य सजावटीचे,

एक सोनपंखी पक्षी
गातो त्या झाडात, मानवी अर्थांशिवाय,
मानवी भावांशिवाय, एक दूरदेशी गाणे.

मग कळतेय ना तुम्हाला की ते नाहीय कारण
आपल्याला खुश वा नाराज करणारे.
तो पक्षी गातोय. त्याचे पंख झळकताहेत.

ते ताडीचे झाड उभे आहे अवकाशाच्या शेवटाला.
वारा वाहतोय हळुवारपणे त्याच्या फांद्यांतून.
त्या पक्ष्याचे अग्निझळाळ पंख झुकलेले खाली.
--- ००० ---

चंद्र

वस्तूंच्या जगात राहतोयस
तर वस्तूंच्या भाषेत बोल
माणसाच्या मनातून येणाऱ्या
घुसमटीला इहवादात अर्थ नाही
असे चंद्र म्हणाला तेव्हा
घराच्या भिंती पाहात होत्या
दयाळूपणे आणि चिंतेने

आता काय घडेल याची
रात्रीला मुळीच उत्सुकता नव्हती
इहवादाची बकवास करणारा हा प्राणी
प्रेम करणेच विसरत चालला होता

समुद्राच्या वाळूत इतस्ततः
बागडणारे खेकडे
आपण फार आनंदात आहोत
असेही सत्य नव्हते माजवत

वाळूवर पडलेल्या चांदण्याने
ना वाळू रोमँटिक होत होती
ना खेकड्यांना हवा होता
रात्रीचा अमरपणा

वस्तूंच्या भाषेत कसे बोलायचे
इहवादी मौनातून की वस्तुरूप घुसमटीतून
या प्रश्नावर चंद्र फक्त हसला
--- ००० ---

मूड

पावसामुळे माझा एक मूड तयार होतो
मग सर्दी होते मग घसा पकडतो
म्हणजेच ऍलर्जी होते
हे पाहून मला वाटले आपला तो मूड
पावसाला विरोध करतो आणि त्या लढाईत
तो मूड खूपच कमी पडतो

समजा मी तो मूड तयारच नाही होऊ दिला
तर माझा पावसाला विरोध असणार नाही
आणि मला ऍलर्जी नाही होणार

हे जर खरे असेल तर
या विचाराने मी घाबरलो
मग तर मनातले सगळेच विरोध
असे काही ना काही बिघाड
घडवतच असणार आणि मला ते
कळत नसणार ते अजून व्यक्त न झाल्याने

वाईटाला विरोध करावाच लागणार ना
माझे मन एक साधे सत्य सांगते

च्यायला म्हणजे जगण्यात
ऍलर्जी
ही कंपल्सरीच असेल का काय

आता या विचाराचा मूड नको तयार व्हायला
--- ००० ---

पुस्तके

त्याने कचरा डेपो पाहिला होता
इथे तर पुस्तके होती
नवी जुनी अनेक विषय
अनेक भाषा हारीने लावलेली
काही पडलेली इतस्ततः
म्हणजे ज्ञान तर किती अमर्याद
ढिगारलेले होते तिथे
काही ठिकाणी वाळवीने फस्त केलेले
नेमकी पुस्तके शोधा निवडा वाचा
याच्या कल्पनेनेच
त्याला प्रचंड ताण आला
आणि त्याला तर हवे होते
ताण घालवायचे ज्ञान
जेवढे वाचू तेवढाच थोडाथोडा जाईल ताण
ही कल्पनाच त्याला भयानक वाटली
आपले आपल्यालाच पूर्ण सापडायला हवे
या विचाराने त्याने आधी
वादळाची वाट पाहायचे ठरवले
वादळ आणि पाऊस
एकत्र आले तर बेश्टच होईल म्हणत
--- ००० ---

रथ

वीसेक वर्षांपूर्वीची गोष्ट आहे
असे म्हणत त्याने पीठ
कसे चांदणे म्हणून उधळले होते ते सांगितले
त्याचे म्हणणे आपण ज्या अर्थी श्वास घेतो
त्या अर्थी याआधीच्या जगाची
आपल्याला माहिती असायला हवी
आधी कोण कसे जगून गेले
ते माहीतच नसेल तर आपण तेच तेच
पुन्हा पुन्हा नवे तत्त्व समजत राहू
उदाहरणे जितकी अधिक माहीत
तितके आपण
अचूक असण्याची शक्यता अधिक
असे तो म्हणे वर्गात
विद्यार्थ्यांना जेवू घालताना
आणि त्यांच्याशी हास्यविनोद करतानाही
जणू त्याला ते फारच महत्त्वाचे वाटे
मग तो त्याच्या एका आनंदी स्वप्नाबद्दल सांगे
आकाशातून एक महाआकर्षक रथ महाप्रचंड
येताना दिसला त्याला कसे काय शक्य आहे
हे असे दृश्य शूट करणे या विचारासह
त्या आनंदातच तो जागा झाला
त्याच्या भविष्याबाबतचे ते एक शुभचिन्हच होते
असे गेली कित्येक वर्षे तो मानत आलेला आहे
--- ००० ---

तो आणि पक्षी

त्याला वाटे पक्ष्यांनी
आपल्याला घाबरू नये
आपल्या अवतीभवती
निर्झर होऊन आपण इथे नाहीच
इतके साधे असावे
पण पक्षी जवळ येताच
तो स्वतःच दचके आणि लगेच
उडून जात पक्षी कारण
त्यांना उपजतच असे समज
की भीती हे हिंसेचेच एक रूप असते
त्यांचे मेंदू कितीही
छोटे आणि अविकसित असले तरी
दचकणे म्हणजे संवेदनशीलता
की निर्भयपणा म्हणजे प्रेम
यावर विचार करत तो
दाणे टाकत राही पक्ष्यांना
त्यांना ते दाणे तर हवेच असत
त्यांना तो प्रेमळही वाटे
पण ते अंदाज घेत पळण्याच्या तयारीतच
त्याच्याकडे पाहात दाणे वेचत
प्रेमळ आणि निर्भय होता न आल्याने
त्याला असंवेदनशील वाटत राही
--- ००० ---

कला आणि भवताल

गुंग केले सुन्न केले
हसवले रडवले
हसवत हसवत अस्वस्थ केले
दिङ्मूढ केले गोंधळात पाडले
चकित केले नवीनच
दृष्टिकोण दिला दिशा दिली
विचारप्रवृत्त केले
त्यांचे हे चुकले
या ऐवजी ते तसे करायला हवे होते
तुम्हाला आत्ता नाही कळणार
याची फळे पाच वर्षांनंतर दिसतील
पण हे डावपेचात कमी पडतात
चांगला वक्ता नाहीय
फूट पडतेय म्हणतात
यांनी असे केले तर
ते मर्डरच करतील
खरे काही नाहीय
खोट्या प्रचाराचा भडिमार आहे
वाहिन्या फसवताहेत
गरिबांना वालीच नाहीय
तुम्हाला काही तत्त्वच नाहीय
मग तुम्ही पंच्याण्णव साली काय केले होते
कला आणि भवताल गुंग सुन्न चकित
दिङ्मूढ करताहेत – ग्रेट !
--- ००० ---

वावर

माझा आवाज इतका
जाड निबर आणि घोगरा कसा
आणि माझा चेहरा
इतका मोठा आणि प्रचंड अनुभवी
माझ्यातून दुसरेच कुणी
वावरतेय की मीच
कुठेही वावरतोय फ्रीली
क्षणात माझे व्यक्तिमत्व
विरून जाऊ शकते
हे दिसल्यापासून
कधीही होतेय साक्षात
हे विश्वचि माझे घर
सगळी माणसे एकत्रच तर
भोगताहेत सुखदुःखे जगाचे नकाशे
बेफिकिरीने भरलेले निर्दय आणि क्रूर
साधे ऊन पडलेले दिसणे
हेही आपापल्या भ्रमाचे का असते
हा प्रश्न विचारताच बंधुभावाने
भस्मसात होतोय सगळेच
एकमेकांच्या अस्तित्वांत
एकत्रितपणे आणि
बुद्धीच्या टोकापलिकडे
--- ००० ---

प्रभावी विचार

दोघांचीही व्यक्तिमत्वे सेम हवीत
बुद्धी एकसारखी हवी तब्येत सेम हवी
पटवून देण्याची हातोटी आणि कपडे
सेम हवेत सजावटीचे सामान
पौष्टिक अन्न आरामदायी प्रवास
हवा आणि हवे सुसज्ज संदर्भग्रंथालय
स्मार्ट सहकाऱ्यांसह आणि आधी
झालेला हवा दोघांचाही सेम प्रचार
आणि गर्दी सेम तेवढीच जमायला हवी
तरच कळेल खरे प्रभावी विचार कुणाचे आहेत
आणि हो दोघांचेही भाषण एकाच मुहूर्तावर
नेमक्या समान वेळात व्हायला हवे प्रत्येक वेळी
आणि विनोद आणि शायरी यांची पखरणही
सेम असायला हवी शिवाय लोकांना
खुश करण्याची सर्व साधने सेम हवीत
तरच कळेल खरे हितकारक कोण ते
लोकशाही नीट चालावी स्वातंत्र्य
सर्वांना सेम असावे न्याय असावा
म्हणून मग दोन्ही बाजूंचे लोक
यज्ञांचे घाट घालतात आणि उपलब्ध
असणाऱ्या सर्व सावल्यांना बोलवतात
दोन्हीकडे पन्नास पन्नास आरसे लावतात
पण दोघांच्याही श्रोत्यांचे मूड मात्र कधीच सेम नसतात
--- ००० ---

मुक्ती

रंग आणि स्वर यांप्रमाणे शब्द
ओघळावे फटकारले जावे घरंगळावे
फिरावे सहज सरळ जावे विनाअडथळा
सवयींच्या विचारांचे संसर्ग टाळत
नव्या शक्यतांच्या अज्ञात जगात
ताणांच्या डोंगरांना वळसे घालत
शब्द अखंड उलटेपालटे
भेदक ओबडधोबड खरखरीत पोताचे
कधी रखरखीत कधी ओलेचिंब
सर्व आकारांचा फील देणारे
अवाजवी म्हणावे असे काहीच नसलेले
फुकटच्या उपद्यापांत मश्गूल असणारे
नकळत धोके पत्करत वाचणाऱ्यांच्या टोप्या उडवणारे
हलकल्लोळ नुसता जाणिवांचा समोर
अर्थच नसल्याने मूर्तिमंत मुक्ती देणारे
बालपणीच्या पावसातले छोटे रेनकोट
तारुण्यात लॉटरी लागलेले हुलकावण्या
देणाऱ्या आकर्षणांची इडली खात
दाक्षिणात्य सौंदर्याची वाखाणणी करणारे
फुलांचे शौकीन भरगच्च भावनांचे
शब्दांबाहेर नेणारे वाचकांना स्वतःचे
असणेनसणे सारखेच करत
--- ००० ---

आता काय

तू सांगितलेले अंतर राखले
तू सांगितलेले शब्द वर्ज्य केले
तुझ्या आज्ञेने व्यसने सोडली
मनातले विचार आटोक्यात ठेवले
आता काय
तुझ्या कृपेची वाट पाहणे
हाच तर अडथळा होत नाहीय ना
--- ००० ---

कलेचे दिवस

मुंग्या लागून मेले की वाळवी लागून
असा श्रेयाचा सामना रंगणार हे दिसताच
अनेक चित्रकार हजर झाले
आधी सत्य पाहून मग ते अमूर्त करायला --
नुसते अमूर्तही आपल्याला माहीत असलेल्या
झुंबरांच्या आणि कोळिष्टकांच्या आपल्या
मनांतूनच येते हे त्यांना माहीत होते
पण हाती असलेल्या कौशल्यातून
त्यांना मसिहा म्हणून गाजायचेच होते
आणि जगाच्या संस्कृतीचा व्हायचे होते
एक अविभाज्य पाणीपुरवठा डबल फिल्टर्ड
वाचनसंस्कृतीचे उपटसुंभ भक्त गौरव माजवत
आपल्या प्रगल्भ डबक्यांचा प्रसंगी
हजार सर्प पोसून धाक निर्माण करणाऱ्या
होते हजर त्यांचेही आत्मसंवर्धन साधायला
रात्रीच्या अपॉइंटमेंटसपूर्वी प्रेयसींशी ठरलेल्या
ज्या त्यांच्या प्रगल्भतेच्या जाहिरातींत
हमखास असत अर्धनग्न आकर्षक हुशार मॉडेल्स
हल्ली लोक वाचत नाहीत दृश्यकला तर
फक्त लिलावांतच दिसतात काळ्या
पैशांच्या उत्तुंग आणि सखोल व्यवहारांत
संपले दिवस एकूणच कलेचे
हे समजून काहीजण शांतपणे पाहात वेफर्स खात होते
--- ००० ---

मुलाखती

माझा मित्र लाकडावर रंधा मारत होता
मी कवी असल्याचे त्याला माहीत असल्याने
त्याने मला विचारले – वाचली असेलच आजची मुलाखत
मी हो म्हणालो आणि पुढे कशी वाटली म्हणालो
एवढा मोठा प्रदेश हिंदू आणि हिंदू हा धर्म नाही
हे काही नाही पटले तो म्हणाला पण असू दे मी म्हणालो
विचाराला चालना तर घे सध्या असे म्हणून पुढे गेलो
न्हाव्याच्या दुकानातला कर्तनकलाकार मला ओळखत होता
कवी म्हणून म्हणाला वाचली ती समीक्षकाची मुलाखत
आपल्या परंपरेतून आपण वाढत न आल्याने आपण खुजे झालो
हे नाही पटले खुजे झालो हे बरोबर असले तरी
आता जगभराचे वास्तव आहे आपल्या जगण्यात
ते परंपरेतून म्हणजे कसे बघायचे आणि इकडे तर
दोन लेखक म्हणताहेत की वास्तव सारखे बदलतेय
त्यामुळे लिहीत असलेले सारखे बदलत राहावे लागते
तरी लिहून प्रसिद्ध झाल्यावरही खूप बदलतच जाते ते साले
कितीही प्रयत्न केला तरी आपले साहित्य अगदी आजचे
ताजे तडक प्रस्तुत नाहीच असू शकत
तिथे एक हिंदुत्ववादी पुढारी दाढी करून घेत होता
तो म्हणाला मीही तिन्ही वाचल्यात मुलाखती
त्यांतल्या दोघांना आम्ही खुश केलेय आमचेच आहेत ते
कोण ते परंपरावाले आणि हिंदूवाले का मी सरळच विचारले
करेक्ट तो म्हणाला मला नाही पटत मी म्हणालो
आख्खे आयुष्य घातलेय त्यांनी यात पटण्याचा प्रश्न नाही
जे कुणी नुसती ही कुजबूज सुरू करतील त्यांनाही आम्ही खुश करू
नुसते एवढेच बोला आपले लोक कल्पक आहेत स्टोरीज आपोआप
वाढत जातील त्यांनी नाकारले तरी आम्ही फायदा करून घेऊच
तिकडे ते परंपरेतून वास्तव बघा म्हणताहेत आणि इकडे
या दोन लेखकांच्या हातून वास्तव सारखे निसटून पुढे पळतेय
न्हावी पुढाऱ्याच्या दाढीसाठी फेस फुलवत म्हणाला
आम्ही तिघेही हसलो पण खूप लोक म्हणताहेत की खूप
खूप दिवसांनी इतके जिवंत वाचायला मिळाले
पण तुम्हीही लेखक कवी आहात तुम्हालाही काही कळत असेलच की
मला हसून ओळख देत पुढारी म्हणाला अहो म्हटले
मी स्वतःही ॲब्सर्ड आहे आणि लिहितोही ॲब्सर्ड
बघता बघता संपूनच जाते सगळे मला म्हणायचेच नसते काही
वास्तव ही माझ्यासाठी किस झाडकी पत्ती असते

ते सापडायचा आणि कळायचा मला प्रश्नच नाही येत
जे ऍब्सर्डच आहे ते कालचे काय आणि आजचे काय
माझे वास्तव जुनेबिने नाही होत ते निरर्थक होत राहते
त्यामुळे मी खुशीत असतो असलेले वा नसलेले वा भ्रामक
किंवा माझ्या मताच्या पुरचुंडीत पकडलेले वास्तव
सगळेच मी लिहितालिहिताच नष्ट होेत जाते
न्हावी म्हणाला ही पळवाट झाली पुढारी तेच म्हणाला
एकाचेही खरे नसेल तर सगळ्यांनाच पळवाटावाले का नाही म्हणत
मी विचारले हे छोटे छोटे डास का नाही घाबरत तुम्हाला
तर ते म्हणाले वेगवेगळ्या कारणांनी आधी वापरून पाहा मग विश्वास ठेवा
मी म्हणालो जाऊ द्या ते सगळे
दाममे कम काममे दम असे काहीतरी बघू या
--- ००० ---

डरना नही

खिडकीतून दिसणाऱ्या रस्त्याकडे
वा आकाशाच्या तुकड्याकडे पाहात
दुसऱ्याच विचारात गढलेले असणे
असे तो कधीच करत नसे कधीच
उदास निराश वा एकाकी टाईप
व्हायचे नाही ही त्याची जिद्द होती
तो अधिकारी होता सगळीकडे आणि नेहमीच
उत्साहात असे चारचौघात तो नेहमी
हास्यविनोद चेष्टामस्करी करे काही
विनोद सपक असल्याचे त्याला मित्र सांगत
त्यावरही तो हसून आणखी एक विनोद करे
त्याच्या अशा आनंदी पेहरावामुळे त्याच्या
बायकोलाही आनंदीच राहावे लागे
नाही तर तीच का अशी उदास असे होईल
याची तिला भीती वाटे
तो अशाने थकतोय मरगळतोय
हे घरातल्या घरात तिच्या लक्षात येई
व्हा ना एखादा तास उदासीन वा डल
चाराठ दिवससुद्धा झालात
तरी आपल्याला काय कमी आहे
ती म्हणे तो हसून तिला डरना नही म्हणे
आनंदाचा प्रचंड ताण येत राही
--- ००० ---

सुधारक

अहो म्हणावे की ए
याच्या मधल्या संधिकाळात तिचे लग्न झाले.
ती सुंदर होती आणि उत्तम नोकरीवाली
तिने ए निवडले त्यालाही ती
प्रेमाची आपुलकी वाटली
त्यांच्या लग्नाला सगळे छत्र्या आणि रेनकोट
घेऊन आले होते धुंद पावसाची ही रोमँटिक
आठवण त्यांच्या आल्बममध्येही
प्रतिबिंबित झाली ओलेते
मंगलाष्टक होऊन फुलांच्या सजावटीचे
त्याची आईही आधुनिक होती
पटले नाही तरी उदार होती
वडील बरेचसे व्यवहारी होते
ते लक्ष नसत घालत बारीकसारीक
अहो म्हणजे कित्ती जुने आणि का म्हणून
ती काय बोझ म्हणून थोडीच आलीय इथे
तिने मुद्दाम एका स्त्रीमुक्तीच्या
मासिकाची वर्गणी भरलेली होती
ज्याला जे पाहिजे ते ते जो तो वाचे
हळूहळू ते एकूण घरच सुधारक होत गेले
--- ००० ---

प्रेमबीम

त्याला रोमँटिसिझमच नाकारायचा होता
त्यामुळे हे पावसाळ्यातच बोलणे योग्य होते
तीच मधून मधून म्हणे की तिला प्रेमबीम
हे दिखावू आणि मतलबी वाटते अनुभवावरून
त्याला धरूनच तो तिला सरळ म्हणाला
उदात्त प्लॅटॉनिक शुद्धबिद्ध
त्याला नाही समजत प्रेम म्हणजे
सुखाची मागणी देवघेवीचे दुतर्फी आश्वासन
सशर्त आणि कोणत्याही गॅरंटीशिवाय
ना भावनिक गुंता ना जबाबदारी
मनांचे तोल ज्याचे त्याने संभाळायचे
गैरसमज होणारच नाहीत असे काही नाही
प्रतारणेच्या संशयांना पूर्ण वाव असणार
अंधश्रद्धेला वा मानीव एकात्मतेला
सशर्त असणार वाव
अचानक घडू शकणार बेबनाव
होय असेच असते प्रेम आणि हेच
त्याचे खरे स्वरूप ती म्हणाली
तिच्या अनुभवावरून तेवढ्यात पाऊस
आल्याने ते एकाच छत्रीत बिलगले
पण ती म्हणाली हे असे खरे बोलण्यात
तुझा डाव तर नाही असू शकतो तो म्हणाला
--- ००० ---

यात्रा

ते असतात परंपरागत श्रावणबाळ
मातापित्यांना सत्याची यात्रा घडवणारे
कारण परिणाम कारण परिणाम
असा सुबोध सुलभ बाळबोध
इतिहास सांगत
आता काय होईल वा व्हायला हवे
हेही सांगू शकणारे
कोट्यवधी प्रभावांच्या विश्वात
सगळे कळल्याचा
आत्मविश्वास बाळगत
गधडे असतात ते
माझ्या कवितेच्या दृष्टीने
जी गूढ नाही नाकारत
आणि सदोदित साजरा करते
न कळण्याचा उत्सव
माझ्या कवितेतून ओसंडणारे
सर्व शब्द शिव्या खातील
अर्थ लावू जाणाऱ्यांच्या
माझी कविता नाही रोखत
कुणावरही बाण
सर्व बाळांना आपलीच समजून
ती देते निरोप म्हणत
तुमची यात्रा सुखाची होवो
--- ००० ---

पडदा

दूरीसाठी हा एक
पारदर्शक का असे ना
पडदा राहील मधे
तोही एका अटीसह
पडद्याचीच फक्त चर्चा नको
यासाठीच तो पांढराच ठेवलाय
रंगांमुळे नुसते
अर्थच चिकटतील असे नाही
भावनाही सचेत होऊ शकतील
हा अडथळा सतत
जाणवतच राहणार
हे मान्य पण
आपोआप
तो नाहीसा होईपर्यंत
तो हवाच आधीच
तो नाहीच वा नव्हताच
असे नको
काळाचा ओघ मान्य
निसर्ग मान्य
अनिश्चितता मान्य
पण आत्ताच एवढ्यातच
पडदाच नसणे नको
--- ००० ---

टॉम ग्रीनिंग

हा मला अलिकडे विशेष आवडलेला एक कवी. तो मानसशास्त्राचा प्राध्यापक होता. ' मानवी मानसशास्त्र ' या नियतकालिकाचा काही वर्षे तो संपादक होता. एक नामांकित अस्तित्ववादी मानसशास्त्रज्ञ होता. त्याची मते मात्र जरा चाकोरीबाह्य म्हणावीत अशी होती. ' मानसिक आजार ' ही संज्ञाच चुकीची आहे, असे त्याचे मत होते. मन कधीच आजारी नसते, असे तो म्हणे. नमून्यादाखल त्याच्या चार कवितांचे अनुवाद खाली देत आहे. या काही त्याच्या सर्वोत्तम कविता असतील असे नाही.

मागणीखोर मन

अरेरे, कधी कधी माझे मन भरकटते होत दुःखकाळे आणि घाणेरडे
आणि ते कहर म्हणजे कृष्णमूर्तींबद्दलही दुष्ट विचार करू शकते.
पण बुद्ध असे कधीच नाही म्हणाला की आपण संतासम असले पाहिजे,
जे आहे त्याचे फक्त भान बाळगणारे असे मग ते किती का अस्पष्ट असे ना.
त्यामुळे, जेव्हा वाटते मला माझ्या गुरूच्या लैंगिक जीवनाबद्दल नाराजी,
किंवा वाटते चिंता तो पुढील जन्मात कसा काय वागू शकेल याची,
तेव्हा मी बसून राहतो माझा उत्सुक अहंकार नाहीसा होईपर्यंत
मी येऊ शकावे झटक्यात अनंत वर्तमानात या हेतूने.

--- ००० ---

मादक द्रव्यांचे भय

ही आहे माझी तक्रार आणि हे आहे माझे अतीव दुःख
जेव्हा मला सांगितले जाते की दे तुझी लेखी संमती
आम्हाला तुला औषधद्रव्ये देण्यासाठी गोळ्यांतून
माझ्या सर्व अस्तित्ववादी आजारांवर :
त्यांचे रासायनिक थांबून राहणे आवाहन करते
माझ्यासारख्या एखाद्याला ज्याला सखेद वाटत असते
की जगणे हे दुःखे आणि तणाव यांनी भरलेले आहे,
ज्याचे सांदीकोपरे म्हणजे नुसते खूप गोंधळ आहेत.
पण थांबा, माझा हा एकमेव उपलब्ध मेंदू आहे,
आणि जेव्हा त्याच्यातले राक्षस मारले जातील
किंवा समजा नुसतीच त्यांना थोडी गुंगी आणली जाईल
तेव्हा त्यानंतर माझी थोडी तरी विचारशक्ती राहील का शिल्लक ?
ते डॉक्टर म्हणतात की त्यांना खूप ज्ञान आहे,
पण त्या साल्यांची सगळी मते विकत आणलेली आहेत.
ते जेव्हा मला माझ्या काळज्यांतून मुक्त करतील तेव्हा
मला एकच भीती आहे की माझा मेंदू त्यांच्यासारखा तर नाही होणार ? !

--- ००० ---

वेळच नाहीय काही जाणवायला

मी अशाच प्रकारे योजलेय माझे जगणे
की त्यात काही जाणवायला वेळच ठेवलेला नाहीय.
हे सौंदर्यशास्त्र इतके छान करतेय काम
की मी कधीच दिसू नाही देत
माझ्या जाणिवा खुद्द मलाही
किंवा अगदी माझ्या निकटवर्तियांनाही.
सतत कामात व्यग्र राहून
मी मोकळा असल्याचे दाखवतो,
आणि उरलाच समजा काही वेळ तर
मी तो ताबडतोब भरून टाकतो
आणि प्रार्थना करतो की हे बधीर करणारे गुंगीचे औषध
हे काहीही करून खूप टिको.
जेव्हा नाक खुपसणारे मला काही विचारतात
तेव्हा घाईने मी देतो स्पष्टीकरण
की हा माझा मी ठरवलेला आराखडा आहे
जगण्यातली वेदना न्यूनतम ठेवण्याचा,
आणि तरीही काही वेळी मी जागाच राहतो
अचानक अनेक विचारांनी आणि संशयाने पछाडलेला –
मी मूर्ख तर नसेन अशा काळजीत गुंतणारा
या ना त्या प्रकारे स्वतःलाच हरवणारा.
खरे तर मला जगायची अशी आशाच नाहीय,
मला नुसतेच जिवंत राहायचेय,
पण मी शोक करेन का जेव्हा मृत्यू येईल समीप
तेव्हा मी जगलोच नाही म्हणून ?
--- ००० ---

अनुपस्थिती

माझ्या झटापटी जेव्हा फारच सखोल होतात
तेव्हा मला कळते माझा कल झोपी जाण्याकडे आहे.
मला हे समजतच नाही की असे काय असू शकेल
जे खरोखर मला जागे राहायला प्रवृत्त करेल.
हल्ली जगणे जे जसे आहे
ते चकित करायचे कधीच थांबत नाही
मला हे पाहात की काही लोक राहू शकतात सावध
धोका पत्करत जखमी होण्याचा.
त्यामुळे मी पेंगत पडतो, त्यात मला सुरक्षित वाटते

आणि फार क्वचितच मला वाटते आकर्षण
स्वतःच्या आयुष्यात उपस्थित असण्याचे
आणि सबोधतेचा आणि संघर्षाचा धोका पत्करण्याचे.
हा माझा उद्धट आविर्भाव नका समजू –
माफ करा मी फारच परखड वाटलो तर.
मी याचना करतो तुमच्या सहानुभूतीची
मी मी स्वतः असण्याचाच मला त्रास आहे.
--- ००० ---

रूटीन

उठाबशा काढण्याचे रूटीन सोडले तर
नव्या विचारभावनांचेही रूटीन माजवले
मधेच अनपेक्षित झटका देत रूटीन
अर्थांचे रोमांच फुलवले
सर्वच कवितांच्या शेवटी पूर्णविरामच आले
त्यामुळे सर्वांनाच हात झटकण्याचे रूटीन जमून गेले
दुसरे काही अपेक्षितही नव्हते वाचकांना
त्यांच्या मुलांचे जगणे आता महत्त्वाचे होते
मुलांचे आयुष्य अधिकच हास्यविनोद सुखदुःखे
भल्याबुऱ्या घटना यांचे छान रूटीन होणे गरजेचे होते
उगीच वाचले कृष्णमूर्ती त्या प्रभावातून काही घडले तर न जाणो
वाचकांची खात्री जाईल ताबा सुटेल सूर्यही ओळखू नाही येणार
--- ००० ---

जादू

समोरच्या बैठ्या इमारतीत राहायचा
हिंदी पौराणिक सिनेमांचा एक गीतकार
लोकांना हे माहीत होते तेव्हा
पतंगांचा उत्सव खूप मोठा चाले
काय पोचे म्हणत खूप भटजी पळत
काटलेले मांजे पकडायला
तीच सगळी माणसे सव्वीस
जानेवारीला ट्रकमधून जात
रोषणाई बघायला वडे खात भजी
खात भोंगे वाजवत पतंगांच्या
रंगांच्या आठवणी काढत
बरे मग काय म्हणायचेय काय
कुठे काय
नाही तरी म्हणून तरी काय घडते
सत्यनारायणाला भटजी लागतातच
मग ते कोणत्याही जातीचे का असेनात
मिट्ट अंधार आणि दिपवणारे दिवे
ही काय जबरदस्त जादू सापडलीय
माणसाला श्रेय द्यावेच लागेल
माणसात माणुसकी असायलाच हवी
--- ००० ---

शेवाळे

सूर्यप्रकाशाचे गवत
आणि गुलाबजामचे मांजर
अचानक काळवंडतात
आणि सुरू होतो
धुवांधार पाऊस दुःखाचा
कपबशांचा भयप्रद आवाज
पुन्हा जागवतो कल्पना
की वर कुठेतरी असतात देव
इथून परतणार तरी कुठे
बघता बघता चपला
अदृश्य होतात
आणि अनवाणी जिभा
कापू लागतात
हातातले शिफारसपत्र
जमिनीवर अथांग
शेवाळे पाहून बुजतो घोडा
त्याची नजर सारखी घसरते
त्याच्या आवडत्या नटीवरून
आता स्वस्थ राहा
काहीच नाही करायचे
म्हणजे घसरण्याचा प्रश्नच मिटेल
--- ००० ---

फाटक

असे तर खूप आहे सरधोपट
उतारावरून घरंगळत जाणारे नारळ
शुभस्य शीघ्रम म्हणत थेट
गाठतात दुधाची डेअरी
तरीही मुख्य मुद्दा असतो फाटकाचा
जे कधीच नाही लावले जात
बारा सदनिकांच्या बाजारामुळे
ते लोखंडी दार आहे मजबूत
सतत उभे उन्हापावसात
तब्येत न बिघडता दुपारी
जेवण झाल्यावर त्याच्यावर
पडते त्याच्या प्रिय झाडाची
नशेमान सावली तेवढेच
बाकी ते तडफदार वफादारच असते
नुसतीच वाहने असोत की प्रेतयात्रा
ते सदोदित ओथंबलेले असते
निर्विकार संवेदनशीलतेने
कधी मुले त्याच्यावर उभी राहून
खेळतात फास्ट उघडझाप
तेव्हा ते प्रत्येक मुलाला म्हणते
मोठा हो अमेरिकेला जा आणि
व्हाईट हाऊसच्या फाटकावर खेळ
--- ००० ---

नशा

प्रेमाचे राहू द्या हो जग कधीही
एका विषयाला धरून नाही चालत
हे आधी समजायला हवे कवितेला
म्हणजे भावनिक टोक गाठून
झरे कारंजे नाही अवतरणार
-- नाही तर कसला
तुमचा वास्तववाद
जग विदीर्णबिदीर्ण नाही
ते एकसंध आहे आपल्या बुद्धीचे
तुकडे मासलेवाईक उधाणलेल्या
हिरवाळीत टाकून नंतर
शोधत कुठे बसणार
आणि काय शोधणार
कुठलाही पक्षी राजकीय
काहीही बडबडत नाही उत्तेजित होत
झाडे तोडणारे नसावे सरकार
एवढे तो बघतो
आणि त्याच्या शापाने
कुणाला अपशकून होईल
असेही तो मानत नाही
एकच री ओढत राहणे
हे वास्तववादाच्या विरोधातच असते
मग मतभेदांची नशा कितीही असो
--- ००० ---

तुरुंग

तुझ्या डोळ्यांत
मी सतत प्रतिबिंबित राहण्यासाठी
तुला व्हावे लागेल एक पुतळा
संवेदनशील संगमरवराचा
तुझे जगणे तर मला
संपवायचे नाहीय
तुझे स्वातंत्र्य तर
ठेवायचेय अबाधित
आणि तरीही
तुझ्या इच्छा भावना विचार
हवेयत मला गोठलेले
माझ्या जिवंतपणात
याचे तुला खूप सुख व्हायला हवेय
तुझ्या इच्छेच्या आतुरतेने
तुझ्यावर कोसळणारा पाऊस
असायला हवाय
फक्त माझ्या आसक्तीचा
असेलही हा तुरुंग
पण हाच असायला हवाय
तुझे स्वातंत्र्य
तू अधीन होत मला अर्पिलेले
तू हो माझा तुरुंग क्षणोक्षणी मनमुक्तपणे
--- ००० ---

नाटक

वेळेत पोचून खुर्चीवर स्थानापन्न होतानाच
तुला माहीत असते की तू नाटकाला आलायस
त्यात कुणी प्रख्यात स्टार्स असले तर
किमान छान थोडेफार हसण्यारडण्याची
तुला खात्री असते तसे नसेल तर
तू करतोस विचार की नाटक चंप्रंचे आहे
डोके हलवणारे असणारच यात काही ना काही
नेपथ्य प्रकाश संगीत अभिनय हे सगळे
असतेच ना थोडेफार आणि मुख्य म्हणजे
महिन्यादोनमहिन्यांच्या तालमी असतात
त्या मेहनतीचे चीज केल्याचे पुण्य तरी मिळेलच
नाटक कसेही असो ते चांगले होणे म्हणजे काय
याचा केलायस कधी विचार की तू रमलास
की झाले असे असते की ती पात्रे ते प्रसंग
खरोखर तुझ्यासमोर घडले असे तुला वाटले
की झाले की दिग्दर्शकाने दाखवलेली
मानसशास्त्राची समज की एखादा नट की नटी
विरुद्धलिंगी तरुणतरुणी निदान
मोहक तरी असायलाच हव्यात ना
पण नाटक घडते ते हे सगळे मिळून एकसंधपणे
आणि असा एकसंधपणा हा नाटकात समोर नसतो
तो उगवतो नाटकाबाहेर तुझ्या मनात आणि त्याच्याही बाहेर
--- ००० ---

शांतता

अंबा अंबिका आणि अंबालिका
या कोण होत्या या प्रश्नावर
त्याच्या महाभारताचे
जाहीर धिंडवडे निघाले
हिटलरने मुळात ज्यूंचा इतका द्वेष
केलाच का इथेही तो गडगडला पहिल्या वा
दुसऱ्या महायुद्धाची नेमकी कारणे कोणती
यावरही तो नंगा झाला भर चौकात
अमुक साली तुम्ही तसे वागला होता
मग आज आम्ही असे का वागू नये
बाकी सगळे द्वेष वाईट
मग तुम्ही बाळगलेलाच चांगला कसा
आस्तिकही दुःखी आणि हिंसक असतात आणि
नास्तिकही मग अधिक चांगले कोण हे कसे सांगणार
धर्माचे अवडंबर वा उत्सव वाईट मग तुमच्या विजयाचे
उत्सव चांगले कसे आणि सर्वांनीच आपापल्या जाहीर
विचारसरण्यांविरुद्ध वागल्याची उदाहरणे आहेत
मग त्यांतले तरतम वा गुणावगुण कसे ठरवणार
अशा असंख्य प्रश्नांवर सगळ्यांच्याच दांड्या उडतात
हे पाहून त्याला जरा समाधान वाटले
एकसंधता ही ना कुठल्या माहितीवर अवलंबून असते
ना माणसाच्या विचारावर ना एखाद्या गुणावर हे पाहून
त्याला शांतता वाटली
--- ००० ---

नदी (The River)

-- पॉल एल्युआर्ड, अनु० चं. प्र. देशपांडे.

माझ्या जिभेखाली आहे ती अथांग नदी
अकल्पनीय पाण्याची, तीत माझी छोटी नाव,
आणि पडदे ओढून घेतलेले खाली,
चल, आता बोलू या आपण.
--- ००० ---

खिसे मोकळे

अंथरुणावर पडल्या पडल्या
श्वासाचे दृश्य साकार झाले
दुनियेला कडीकुलुपात ठेवणे शक्यच नव्हते
हे ओळखून सर्वांना दिले
आपापली जमीन नांगरण्याचे स्वातंत्र्य
त्यालाच मतभिन्नतेतली सहिष्णुता
वा अभिव्यक्तिस्वातंत्र्याचे सरोवर
म्हणून मान्यता देत जगात आपल्या
मनाविरुद्ध काहीच नसावे
हा आग्रह सोडून दिला
त्यामुळे अन्यायाचा प्रश्न
होणार होता तंगड्यांचा गुंता
आणि कोणाचेच अवयव न कापता
अहिंसकपणे कसे खाणार कलिंगड
या प्रश्नाकडे दुर्लक्षच करावे लागणार
याचे खूप वाईट वाटले
त्यामुळे साहजिकच जगण्यात
कत्तलखाना अटळ बनणार
हे दिसल्याने वाहतूक पोलिसांवर
भिस्त ठेवून सर्वांनी आपापल्या
संस्थांच्या घटनांप्रमाणे पण टक्करी होऊ नयेत
म्हणून खिसे मोकळे ठेवावेत असा ठराव पास केला
शेवटी सामोपचार बंधुभाव नाकारता थोडेच येतील
--- ००० ---

उच्छृंखल

उच्छृंखल हा शब्द एके दिवशी
मला खूप आवडल्याने मी तो
अनेक ठिकाणी वापरू लागलो
म्हणजे खरे तर मला ते
सुखावहच वाटत गेले
पण एका ठिकाणी ठरला तो
असंसदीय किंबहुना शिवीच
कारण सहाशे वर्षांपूर्वी
एका विराणीत त्याचा झाला होता
तसा वापर हा घसघशीत पुरावाच होता
घरावर मोर्चा काढणे पुतळ्याची
प्रेतयात्रा काढणे फोटोला जोडे
हे सर्व पाहून नको पोराबाळांना त्रास
म्हणून मी माफी मागून टाकली
मी होतो थोडाफार लेखक हे खरे
पण अगदीच क्रांतिकारक वा
जिवावर उदार टाईप नव्हे
काहीजण म्हणाले खरे तर
तुम्हाला हुतात्माच काय अगदी
महात्माही व्हायची संधी होती
पण माफी मागून तुम्ही
उच्छृंखलपणा केलात
ते जरी सोडले तरी वाईट वाटत राहिलेच
निष्कारणच माफी मागावी लागल्याचे
--- ००० ---

कागद

आठवणीसाठी कधीही मी
लिहून ठेवतो एका कागदावर
एकेका ओळीत कामे
आता तो भरला म्हणून
फाडून टाकावा म्हटले तर
किती महत्त्वाचे होते हे सगळे
त्या त्या वेळी म्हणून मी मायेने
हात फिरवला त्याच्यावरून
आणि या कृतीसह तो कागद
मायाच आहे सगळी असे म्हणत
बिनदिक्कतपणे फाडला
ऑफिसातही असाच असे
माझा एक कागद ड्रॉवर उघडताच
लगेच दिसावा दिवस
सुरू होतानाच असा
रोज बदलता कित्येक वर्षे
आता घेतलाय मी नवीन कागद
त्याचा नाहीय विश्वास
नियतिबियतीवर किंवा मग मीच
माझी नियती असेही तो समजत असेल
मी कोणता कागद घेईन या कामासाठी
हे मला तरी कुठे माहीत असते उलट तो
कागद घेतल्यावर मीच होतो त्याला माहीत
--- ००० ---

असे दोघेही म्हणत

द्वेषाने अंधळे झालेत ते
असे ते दोघेही एकमेकांबद्दल म्हणत
दोघांकडेही बाराबारा पुरावे असत
आमचे पुरावे अधिक वजनदार आहेत
असे दोघेही म्हणत
बोलू देत कितीही खरे काय
ते कळेलच लोकांना असे दोघेही म्हणत
दोघेही कुत्सित हसत आणि पुन्हा कामाला लागत
यात पूर्ण आयुष्य वाया जाणार आहे भोसडीच्यांचे
असे दोघेही म्हणत
जास्त संख्येचा गैरफायदा घेत
ते अन्याय करताहेत आमच्यावर कमी संख्यावाले
म्हणत त्यांनी मोकळेपणाने वाढू द्यायला हवे आम्हाला
च्युत्ते समजला काय आम्हाला जास्त संख्यावाले म्हणत
भोगतील त्यांच्या पापांची फळे
असे दोघेही म्हणत
सततच्या द्वेषाने पित्त आणि बीपी हे विकार
लागलेत त्यांना माजल्यामुळे ब्रेनट्यूमर होईल साल्यांना
असेच कोपऱ्यात सडून मरतील युद्धाचा माज गाजवत
सगळ्यांना घेऊन मरतील भडवे
स्वतःच्या द्वेषासाठी देशविघातकही विचार करतील नालायक
असे दोघेही म्हणत
--- ००० ---

अष्टग्रही

खरे तर मला नकोच होती पॉलिसी
पण नवीन गाव नवीन ओळख
म्हणून जरा भिडस्त होतो
एजंटला म्हणालो ही एवढी
अष्टग्रही होऊन जाऊ द्या
मग बघू खलासच होणार आहे म्हणतात जग
तुमचा विश्वास आहे यावर या त्याच्या
प्रश्नावर मी हो म्हणालो
समोरच एस्टी स्टँड होता
थोड्या वेळाने तो एजंट तिथे डुलत चालत
आलेला दिसला मग गेला एस्टीने दुसऱ्या गावी
थोड्या दिवसांनी पुन्हा आला होऊन गेली ती
आहे जग अजून घेणार का आता त्याने विचारले
कसले काय अगदी खलास व्हायच्या ऐवजी
दुसराच दिलाय तिने दणका जरा खाजगी
असल्याने सांगू नाही शकत मी म्हणालो
पुन्हा जरा वेळाने तो स्टँडवर डुलत येताना दिसला
शंका आली असली तरी माझ्यावर विश्वास
ठेवणे भागच होते त्याला नंतर तो अनेकदा
स्टँडवर डुलत असलेला दिसला पण माझ्याकडे
आला नाही अष्टग्रही पावली म्हणायची न् काय
--- ००० ---

इंग्लंड

माझी आई आणि आम्ही दोघे पतिपत्नी
मुलगी-जावई आणि त्यांचा मुलगा आणि मुलगी
अशा चार पिढ्या एकत्र खेळायचो आम्ही क्रिकेट
हिरव्यागार मैदानावर संध्याकाळी इंग्लंडमध्ये
तेव्हा जातायेता गोरे स्त्री-पुरुष कौतुकाने हसत
थांबायचे पाहात आमच्याकडे कोणत्याही
वस्तुसंग्रहालयात न सापडणारे दृश्य म्हणून
आम्हालाही हसत वाटायचे
किती छान आहेत ही माणसे
कोहिनूर हिरा पाहताना तिथला एक गोरा बाप
त्याच्या छोट्या मुलीला सांगत होता या इंडियावर
कित्येक वर्षे राज्य केलेय आपण एवढा तर
असणारच ना त्यांना अभिमान हे वाटले मनात
तरी नाही म्हटले तरी ते जरा हिणवणेच वाटले
आम्ही रस्ता ओलांडत असताना ते पाहून लांब
थांबवत ते गोरे कार्स आम्हाला आधी जाऊ देत अशी प्रेमळ
माणसे आपल्याकडे का नाही निपजू शकत असे तेव्हा वाटे
हाईड पार्कमध्ये टीनेजर्स करू लागले जेव्हा आमचा पाठलाग
तेव्हा जरा भीतीच वाटली हा त्यांचा गंभीर प्रश्न आम्ही
पाहिला होता टीव्हीवर पोरांमधल्या व्यसनांचा आणि हिंसेचा
त्या मानाने आपल्याकडची पोरे खूपच छान गरीब असतात
याने हायसे वाटले आणि त्या गरीबपणाचे वाईटही वाटले
--- ००० ---

संग्राम

दातदुखी अशी की
अंधारातून चालून आलेले
भाले तलवारी आणि खंजीर
आणि आपण निहत्ते
किती वेळ चालेल हा संग्राम
आणि किती होईल तीव्र
आणि निकराचा हे अज्ञात
आपले मानसिक प्रयत्न
निरुपयोगी ठरत वाढवणारे ताण
हाच तो आदिमानवी काळ
बघवत तर नाहीय निकटच्यांना
पण निरुपाय नुसतेच अस्वस्थ
कुणी अंगारा देतोय
कुणी करतोय जप
काही करावेसे तर वाटणारच ना
सध्या एक वेदनाशामक
घेऊन झोपता येईल
झोपण्याच्या प्रयत्नात
शहराचे दिवे चालू
घरे बंद – आणि थांबलेला एक क्षण
--- ००० ---

खिम्याचा इच्छादबाव लेप

पाय मुरगळला म्हणून
खिम्याचा इच्छादबाव लेप आणला
या जगातले वेदनेव्यतिरिक्त
काहीही चालणार होते
म्हणून बाहेर पाहिले
तर एका घराच्या
गच्चीच्या कठड्यावर
ओळीने बसले होते
कबूतर कावळा आणि पोपट
सहज कोणत्याही शत्रुत्वाशिवाय
याने क्षणभर मुक्तच झालो मग
माझ्या मनाला माझ्याच मनाने
शिव्या घालत एका ग्रेट
कादंबरीच्या आठवणी
काढू लागलो पण त्या
वेदनेपेक्षा ग्रेट होऊच नाही शकल्या
आता एकच पर्याय होता वेदनेला
मनाने विरोध करत सहन करणे की
जो भी है असे म्हणत हे ठरवणे
मी रहने दो लेट गो
असा घेतला निर्णय
पण तो खरा नव्हता आणि
वेदनेने ते ओळखले होते
--- ००० ---

नियतिवाद

आपली काही चूक व्हावी
आणि तिच्यामुळे आपल्याला
पकडावे कोरोनाने
असेच घडायचे असेल
तर तसेच घडेलच हा तर
नियतिवादच होईल --
आणि मी तर हजारदा सांगत असतो
की मी नाहीय नियतिवादी
त्यापेक्षा कारणपरिणाम
यांची साखळीच इहवादी
आणि हेच खरे बौद्धिक सत्य
असे म्हणत हेच का घडावे
कारणपरिणाम हा प्रश्न निरर्थक
ठरवायचे ठरवले
त्यातही होणारा मनाचा
गोंधळ दिसला
आणि काही ठरवणे हे
मूर्खपणाचेच ठरेल
हे पाहून काही
ठरवायचेच नाही असे ठरवले
शेवटी आपोआप काहीच न ठरवता
गप्पच होणे घडले आणि आता मात्र नीटच
गळूनच पडला माझा नियतिवाद अचानक
--- ००० ---

उगीचच फुगवून

उगीचच फुगवून
घरंगळत सोडलेले घड्याळ
जेव्हा टच झाले तळेगावला
तेव्हा खरे तर
भरतीची वेळ होती
आणि झाडे बुडत होती
समुद्रात म्हणत पक्ष्यांना
जा उडून पटकन
विझत चाललेला सूर्य
क्षितिजावर पाहात
वाढदिवसाचा केक खात
शेवटची इच्छा कोणती करावी
याचा विचार करणारा
-- असे घडणे
आणि सध्या जे घडतेय
असे दिसते
त्यांत कोणता असा मूलभूत
फरक सांगता येईल
व्यावहारिक सत्याच्या नादात
कवितांचा त्याग करणे काय
आणि अंघोळीच्या आधी
खून करणे काय
या सगळ्याला पवित्रही म्हणता येते
आणि अपवित्रही
--- ००० ---

अर्थ नको

वेगाने परतलेले
कापसाचे हात
दारुण रात्रीला बोल लावत
होत्याचे नव्हते करतात
चांदण्यांचे मनोरथ
एखाद्या अचानक
सुचलेल्या लकेरीप्रमाणे
मैफिलीत पसरतात
वाहवा वाहवा म्हणत
रेसचे घोडे
करायचे काहीच नसते
आपोआप होणार असते
क्षितिज अदृश्य
अंधार तिखट
आणि पोपट जांभळा
बऱ्या बोलाने
समजायला हवेत शब्द
पण एका अटीवर
अर्थ नको कवितेला
ती फक्त बागडावी
--- ००० ---

गुलाल

कधीही घडू शकेल
अशी एक गोष्ट
होलसेल बाजारात
करते पुकारा
ऐतिहासिक पराक्रमांचा
मने अडकवायला
ही एक मस्तच खुंटी मिळते
नवरसांची आयतीच
खाण असलेली
मॅकेन्नाज गोल्डसारखी
दशके काय की रौप्य काय
दिलवाले दुल्हनिया
नेतच राहतात
थियेटरबाहेर प्रेमभंग
झालेले ब्रम्हचारी जमवत
महाल होतात रिकामे
घराणीच्या घराणी
होतात जमीनदोस्त
निव्वळ तलवार खाली पाडली
म्हणून होतात दंगली
उपासमार झाली तरी
उधळतात गुलाल पाण्याबाहेर मगरी
--- ००० ---

नेपथ्य

आधीच अंधारलेले
त्यात संध्याकाळ
आणि पावसाळी गारठा
स्मृती म्हणतेय
हेच तर होते गेल्या वर्षी
आजारी पडण्याचे नेपथ्य
स्मृती वितळणे
असेल शक्य तरच आता
पुढचे नाटक टळू शकेल
--- ००० ---

सुखासुखी

सुखासुखी कुणी दगडाला
भात नाही म्हणणार
कितीही आग्रह केला तरीही
हिंदी सिनेमातला हीरो
मराठीत कशाला कडमडेल
तेही देवाच्या रोलमध्ये
नैवेद्य म्हणून
आख्खा देहच मागणे
हे म्हणजे फुटक्या
नशिबात अंगारेच म्हणायचे
तुम्हाला न जमणाऱ्या
कामाचे खापर तुम्ही फोडा
तुमच्या पाळलेल्या मांजरीवर
कारण तिला फरकच नाही पडणार
कशीही टाकलीत तरी ती पायांवरच पडणार
राहता राहतो प्रश्न
तुमच्या दुःखाचा
तो द्या सोडून कारण
कोण झालेय दुःखमुक्त
बुद्धानंतर किंवा चार संतांनंतर
सुटसुटीत पण मजेत पण दुःखात
तळत राहायचे आपले विचार की झाले
--- ००० ---

विभ्रम आणि आविर्भाव

भेटायचे ठरलेच होते
एका अगाध सिनेमात
रोमान्स सीनमध्ये गाता गाता
अचानक काही आठवल्यामुळे
संभाषणाला विराम देत
अशा पद्धतीने तर
एक पाऊलही नाही पुढे सरकणार
हे नर-मादी प्रकरण
एखादी मोठी बागच जाळावी लागेल
शिव्या देत होळीत
कुणीही यावे आणि प्रेम करावे
इतके कुणीच नसते समाजविरोधी
मुख्य म्हणजे वेळच नसतो कुणाला
एकदा आईस्क्रीम एकदा भेळ
आणि एकदा चंद्राचा तुकडा खायला
जो तो किंवा जी ती नेमक्या हव्या तेवढ्याच
चिंचा पाडत पाहून दुर्लक्ष करतात
कुत्र्यांचे मीलन आणि जणू गीताच आठवल्याप्रमाणे
पवित्र शब्दांत म्हणतात मजहब नही सिखाता
जगात काय काय चाललेय
आणि त्या त्या घटनाप्रवाहाची कारणे काय आहेत
हे सांगणारे निघालेय एक ॲप ज्यावर आपले
बीपी शुगर हिमोग्लोबिन ऑक्सिजन आणि ताप
हे सगळेही कळू शकते आणि मुख्य म्हणजे आपण
ॲटॅकच्या वा स्ट्रोकच्या जवळ आहोत का तेही
काहीही कसेही असले जग तरीही
प्रेयसी हे असणारच एक अजब रसायन पुरुषाला
आणि अर्थात प्रियकरही स्त्रीला तर मुख्य म्हणजे
त्या रसायनाचे परिणाम हुबेहूब देणारेही
ॲप आलेय एक बाजारात पण अजून तरी
अंदाजे अगदी साळढाळ सगळा खर्च धरूनही
प्रत्यक्षच स्वस्त पडेल असेच म्हटले जातेय
या हवेत गप्पा नाहीत एका ॲपवर
जर पूर्ण संसारच होत असेल तर
असे ना का कितीही महाग असेही म्हणताहेत
काही उडाणटप्पू विद्वान कारण त्यांना
आता अभ्यासापेक्षा आरामच अधिक आवडेल

असे त्यांना वाटतेय
हलगर्जीपणा न करता सध्या तरी
वेळा पाळणे आणि उशीर होणार असल्यास कळवणे
एवढे तरी करावेच लागणार आहे आणि आपल्यावर
सोपवलेले काम न झाल्यास कळवणेही प्रत्येक वेळी
हजरजबाबीपणाचे तमाशे कसे जमतील
हा काळच असा आहे शून्य सहनशक्तीचा
हे ओळखून बोलणे बंदच करावे आणि ऐकणेही
पाहात राहावे फक्त सौंदर्याचे विभ्रम
आणि कुणालाच कुणाचीच गरज नसल्याचे आविर्भाव
--- ००० ---

नकविता

संगीत अलंकार विरह दुःख
हे असले काही नसते नकवितेत
असेल तेव्हा प्रेम असते
नसेल तेव्हा काहीच नसते
आता स्वतःला गोंजारत किती बसणार
गेला तो कविता पाठ करत अंधाधुंद होण्याचा
गोंडस काळ प्रेमही मोडते आता
देवाणघेवाणीच्या खेळातच
उदात्तबिदात्त काहीही न बडबडता
तुटले एखादे तर छोड दो
बहुत तारे रहते हैं आकाशमें
असे खोटे उदात्त बोलायला बंदी नसते
असेल तेव्हा तलाव नद्या समुद्र
यांचे सर्व रोमँटिक पाणी
उपभोगता येते पण क्षणिक असणे
म्हणजे खोटे वा वाईट असे न समजता
खुद्द जगण्याप्रमाणेच नकविता ही ना व्याकरण
पाळण्याची जबाबदारी घेते ना सलग वाक्यांची
ना बौद्धिक अर्थांची ना समजणाऱ्या निवेदनांची
नकविता ही बांधील नसते सवयीच्या नियमांना
ती मोकळी खुशाल अनेकनिष्ठ आणि बेफिकीर असते
--- ००० ---

एखादी सुपर नकविता

आधी कोण कुणाला लुटतेय हे न कळणे
आणि नंतर दोघांनाही कळणे
की आपण लुटले जातोय म्हणजेच प्रेम
ही प्रेमाची व्याख्या जगण्यात आल्यावर
साहजिकच सर्व अणुबाँब ठेवलेल्या
भुयारांच्या किल्ल्या हरवल्याचे लक्षात आले
पण राजकारणी सगळे च्युत्ते असल्याने
त्यांना वाटले की करता येतील डुप्लिकेट
आपण ज्या पिढ्यांचे आयुष्य आपल्या
आणि देशाच्या भविष्यासाठी उत्स्फूर्त दान
मागतोय ते सगळेच आधीच बोंबलत चाललेय
त्यांना सत्य वाटणाऱ्या स्वर्गात नकळत
हे त्यांना कळलेच नाही त्यामुळे त्यांचे प्रवक्ते
झोडत राहिले सामिष चर्चांच्या पार्ट्या
लाजभीड न बाळगता एकमेकांना नंगे करत
तरुण पिढी नेहमीच राहात गेली
आत्ममग्न विचारवंतांच्या पुढे दोन पावले
आणि विचारवंत समजत राहिले की तेच
करणार आहेत जगाचे भले
भविष्याचे चित्र आधीच रेखाटून दाखवत
यातूनच खरे तर झाला जन्म नकवितेचा
ननायकाचा नविभूतीचा आणि नमाणसाचा
अर्थात याला अनेकजण म्हणाले की हे आहे
एक सार्थ अटळ आणि निर्णायक अवतरण प्रतिक्रियेचे
ड्रेनेजरचनेचे पुनर्निर्माण करणाऱ्या
आणि विचार हे गंजलेलेच जन्मतात या सत्याकडे
डोळे उघडून पाहणाऱ्या निद्रानाशातून
मग आता समजा या परिस्थितीतून
झाले निर्माण काही वेगळेच व्हायरस
अनपेक्षित प्रश्न आणि डोक्याचे केस उभे करणाऱ्या
थंडीचे असंख्य खेळ रक्त काढणारे
तर मग नुसतीच आणखी एक
निर्माण करणार का शुभंकर प्रतिक्रिया
हा जहाल मुद्दा आलाच समोर काही
हातावर शिर असलेल्यांच्या
मग आत्ताच नेता येईल का ही नकविता
अशा एका निर्वात पोकळीत की जिथे

गरजच नाही पडणार प्रतिक्रियेची
जगण्याचे कसेही उलटेपालटे हिंसक वा प्रेमळ
वा नव्याच काल्पनिक मूल्यांचा उद्घोष करणारे
कसलेही रूप घडत गेले तरीही
माणूस निर्भय निर्भीड आणि सर्वच बाबतींत
स्पष्टवक्ता परखड आणि अभिव्यक्तिस्वातंत्र्यवादी
होत चालला असला तरीही त्याला त्याचे किल्ले आणि कुल्ले
उघळून लावणारे प्रश्न चालणारच नव्हते
घाबरून त्यांना तो निर्बुद्ध अतार्किक अशक्य
आणि अप्रस्तुत प्रश्न म्हणू शकतच होता
तरीही यातूनच हेही न जुमानता एखादी सुपर नकविता
जन्मण्याची वेळ किंवा काळ सुरू झालेलाच होता हे मात्र नक्की
--- ००० ---

इंटरेस्ट

आधी साधा खिडकीतून घरात
खाली पडलेला छोटा साप दिसला
साप साप कुणी म्हणाले
मी काठी मागवली
मी मारेपर्यंत तो मोठा होत गेला
नागच झाला आणि प्रकाशमान
बरेच मित्र होते
त्यांच्या अडथळ्यांमुळे
माझी एकही काठी त्याला बसली नाही
तो तेजस्वी पुढे जाई आणि तसाच मागे येई
तुम्हीही घ्या ना काठी मी म्हणालो
अजून एकही त्याला लागली नव्हती
इथे मी जागा झालो जिभेला
कोरड पडली होती म्हणून
मनाने ही युक्ती वापरली होती
आधी असलेल्या स्मृतीवर आधारित
तीत काही आश्चर्यकारक बदल करत
मनाने हे काम केले होते आता यापुढे मात्र
हीच एक खास विशेष स्मृती वापरली जाईल
पुढच्या एखाद्या स्वप्नासाठी
मी पाणी प्यालो आणि समजून घेतले
आपल्या कविता वाचण्यात
फारसे इंटरेस्ट नाहीय कुणाला
--- ००० ---

जागे होण्याच्या तऱ्हा

-- रॉबर्ट डेस्नॉस (१९०० ते १९४५.) – अनु० – चं. प्र. देशपांडे.

हे एक विचित्रच असते तुम्ही कधी कधी कसे होता जागे मध्यरात्री मध्यकालात झोपेच्या कुणीतरी दारावर टकटक केल्यामुळे
आणि एका अत्यंत असामान्य अशा मध्यरात्रीच्या शहरात
अर्धजागृत आणि अर्धस्मृतीतल्या
अवजड फाटके दणाणत असताना रस्तोरस्ती
कोण आहे हा निशाचर अतिथी अपरिचित चेहऱ्याचा
काय हवेय त्याला कसली करतोय तो हेरगिरी
तो एखादा गरीब माणूस आहे का भाकरतुकडा आणि आश्रय मागणारा
की तो चोर आहे किंवा एखादा पक्षी
की तो आपलेच आहे आरशातले प्रतिबिंब
एका पारदर्शी दरीतून परतलेले
आणि पुन्हा आपल्यात शिरू पाहणारे
नंतर त्याला समजते की आपण बदललोय
आणि त्याच्याजवळची चावी खोलू शकत नाहीय कुलुपे
या रहस्यमय शरीरांच्या दारांची
जरी फक्त काही मिनिटेच तो आपल्याला सोडून गेला होता
जेव्हा आपण दिवे घालवले त्या त्रासदायक क्षणी
आता त्याचे काय होईल
तो कुठे भटकेल ? तो दुःखी होईल का ?
हाच आहे का भुतांचा उगम ?
स्वप्नांचा उगम ?
उपरतींचे जन्मस्थान ?
नको करूस टकटक यापुढे माझ्या दारावर हे पाहुण्या
जागाच नाहीय माझ्या शेकोटीजवळ वा माझ्या हृदयात आता
माझ्याच जुन्या प्रतिमांसाठीही
कदाचित तू ओळखलेयस मला
पण तू स्वतःला कसा ओळखतोस ते मात्र कधीच नाही कळणार मला
--- ००० ---

एका ठिकाणी डेस्नॉस म्हणतो –

‘ मी तुझी इतकी स्वप्ने पाहिलेली आहेत
की तू आता सत्य राहिलेलीच नाहीस ‘
त्याच्या आणखी काही ओळी –
‘ तुला फक्त कळायला हवेय मी तुझ्यावर किती प्रेम करतो ते, तू माझ्यावर नसलीस करत तरी

मी किती आनंदी आहे, किती दणकट आणि किती अभिमानी, तुझी प्रतिमा माझ्या मनात असण्याचा, विश्व सोडून देण्याचा.
त्यासाठी मरायलाही मी किती आनंदाने तयार आहे.
तुला फक्त कळायला हवेय हे पूर्ण जग कसे मला शरण आलेय ते.
आणि तू एक सुंदर अशरण स्त्री, तूही आहेस माझी कैदी कशी ते.
हे प्रिये – जी खूप दूर माझ्यापासून आणि जिला मी आहे शरण.
हे फक्त कळायला हवेय तुला. '
आणि या –
' एका भुतासारख्या सीगलने मला सांगितले की तिचे माझ्यावर तितकेच प्रेम आहे जितके माझे तिच्यावर
आणि हे की ही भयानक शांतता हे माझे प्रेमच आहे.
आणि हे की हा वारा वाहून नेणारा आवाज आहे एक जागतिक क्रांती.
आणि हे की तो आवाज माझ्याकडे दयेने पाहील. '
--- ००० ---

मी तसा एक ढोंगीच आहे

सहसा मी ते सांगत नाही
पण आज सांगतोच आहे मी तसा एक ढोंगीच आहे
तुम्ही म्हणाल त्यात काय सगळेच असतात
तर तसे नाही जरा फरक आहे
मी काहीच नाहीय हे मला माहीत आहे
पण ते मी कधीच कुणालाही सांगत नाही
म्हणजे असे की समजा मला सर्दी झाली
आणि मी काहीच नाहीय असे झाले तर
सर्दी जाते कोणतेही औषध न घेता
किंवा एकाकीपणाही पण हे मी सांगत नाही कारण
एक म्हणजे मला गुरूबाजी नको असते
आणि दुसरे म्हणजे मला सगळ्यांसारखेच सद्गुणदुर्गुण
असे दोन्ही जगण्याचे स्वातंत्र्य हवे असते
मी काहीच नाहीय तर हे असे कसे
किंवा हा अमुक एक दुर्गुण कसा
असे ढोंग उघडे पडणे मला नको असते
त्या बदल्यात मी माझ्या भल्याबुऱ्या
वागण्याची फळे भोगायलाही तयार असतो
तशी फळे फारशी भोगावी लागू नयेत
यासाठी लागणारे ढोंग कमीअधिक प्रमाणात
मी सगळ्यांप्रमाणेच जमवतो त्यात यशापयशीही होतो
मी काही नाहीच आहे असे जाहीर केले तर माझे
सर्दी होण्याचे आणि दुर्गुणी वागण्याचे आणि एकाकीपणाचे
स्वातंत्र्य जाईल म्हणून मी इतरांसारखाच आणि तसाच
आहे असे दाखवत दोन्हीकडचे फायदे घेत राहतो
अर्थात काही तोट्यांसह हे मात्र मी खरेपणाने सांगतोय
--- ००० ---

तारे

कोट्यवधी आहेत तारे आकाशात
काहीच उपयोग नसलेले
पण असण्यानसण्याचा निरर्थक चमत्कार
चमकवत राहणारे
मनांच्या गल्लीबोळांत
तशाच या कविता निरुपयोगी
त्या असणे हाच चमत्कार असणाऱ्या
निरर्थक प्रत्येक संबंधाच्या
मोकळ्या पोकळीत
मनांचे शब्द नसलेल्या
तारे आणि शब्द यांच्या होतात ओळी
अचानक जमून येतात ढग अदृश्य
आणि पडतो पाऊस
प्रत्येक दोन ओळींच्या मधल्या पोकळ्यांतून
ताऱ्यांना करत शब्दहीन
--- ००० ---

शांततेचे नोबेल

माणूस हा एक वेडा प्राणी आहे
दुर्बीण घेऊन उभा राहतो सीमेवर
शत्रूचा हल्ला तर येत नाहीय ना हे पाहात
देशभक्ती धर्मभक्ती जातभक्ती घराणेभक्ती
पक्षभक्ती पुढारीभक्ती विभूतिभक्ती
प्रणालीभक्ती असा फाटलेला
शत्रू कधी बाहेरचे कधी आतले असलेला
सतत भयग्रस्त दुर्बीणधारी शूर
काही त्यातले शहाणे म्हणतात
धर्म आणि जात नको बाकीचे अटळ
फाटणे तर स्वीकारलेय
हजार कारणांनी फाटत राहणार
आणि तात्पुरती एकीही होणार
जेव्हा आरेसेसवाला होईल सभासद
कम्युनिस्ट युनियनचा
त्यांच्या संख्येला घाबरून
यंदाचे कुणाला मिळणार
शांततेचे नोबेल ते मात्र बघत राहा
--- ००० ---

जगातला एक अद्वितीय प्रयोग --

स्टिफेन ब्रिआन ब्रॅडीचे नाव नकवितेच्या संदर्भात कुठेतरी वाचले होते. एक उत्सुकता म्हणून नेटवर पाहिले. त्याच्या २५-३० कविता आहेत तिथे पण त्याची थोडीही माहिती उपलब्ध नाही. बरे, त्या कविता अशा आहेत की काहीच पोचे ना – माझ्यातून कोणताच कसलाच प्रतिसाद येई ना. हा काय प्रकार ? हेच का ते कवितेचे ' नुसते असणे ' ? कितीही वाचा, मन शून्यावरच राहू लागले. म्हटले, आता एक प्रयोग करू. अजिबातच न पोचलेल्या अशा एखाद्या कवितेचा अनुवाद करून पाहू. मग जरा धडपडतच एका कवितेचा अनुवाद केला. ' काहीच न पोचता ' केलेला हा जगातला पहिलाच अनुवाद असणार. एक वेगळाच प्रयोग म्हणून याची नोंद राहावी. तोच हा अद्वितीय अनुवाद खाली देत आहे --

सिनेमा (Cinema)
-- स्टिफेन ब्रिआन ब्रॅडी, अनु० – चं. प्र. देशपांडे.

एक चेहरा लटकतोय विलगलेल्या पडद्याजवळ
उतरण्याच्या मार्गाच्या कडेला
ठिबकतो पाऊस सुरीने केलेल्या लाल ओठांच्या कापांतून
व्रणांच्या दाराला तो फासतो
त्या कडू फळाचा रस
बाहेर रस्यावर
त्यातला थोडा तरी झिरपेल का चांदीप्रमाणे
जरी कसे का असे ना
तो जाऊ शकतो ओलांडून कुलुपातले टंबलर
त्याच्या तोंडून एक किंचाळी
आणि कसे घोट्यापर्यंतच्या
खोल त्याच्या दुःखाच्या गटारातून
गेला पळत तो चेहरा
--- ००० ---

उत्सव

हकनाक उत्सवात सामील झालेले लोक
परत नाही येत
त्यांच्या कोसळलेल्या इमारती
आणि रेल्वे डबे घसरून झालेले अपघात
त्यांना घेऊन जातात
त्यांना आधीच मान्य असलेल्या
नाइलाजाच्या कोंडीत
स्वतःच्याच विचारांनी आत्मविश्वासाने
ते कल्पना करतात अविरत संघर्षाची
आणि ऊठसूट वेध घेत राहतात
दुष्ट लोकांचा
आपण मेलो तरी चालेल
पुढच्या पिढ्यांसाठी
हे त्यांचे पिढ्या न् पिढ्या चालू असते
उत्सवातूनच मिळते अविरत
त्यांच्या मनांना ताकद
--- ००० ---

जीन हॅन्स आर्प (१८८६ – १९६६) हा एक फ्रेंच कवी, चित्रकार, शिल्पकार. दादावाद आणि अतिवास्तववाद अवलंबणारा. चित्रकला आणि शिल्पकला यांत त्याला अनेक मानसन्मान मिळाले पण कवितेसाठी फारसे काही नाही. मला आवडलेल्या त्याच्या एका कवितेचा अनुवाद खाली देतोय –

सपाटी (The Plain)
-- जीन हॅन्स आर्प – अनु० चं. प्र. देशपांडे.

मी एकटाच होतो एका खुर्चीसह एका सपाटीवर
जी हरवली होती एका रिकाम्या क्षितिजात.
ती सपाटी निष्कलंकपणे वहिवाटीची होती.
काहीच नाही अगदी काहीच नव्हते तिथे
ती खुर्ची आणि मी यांच्याशिवाय.
आकाश कायमचे निळे होते,
कोणताही सूर्य त्याला सचेत नव्हता करत.
मला असे दिसले की हा अनंत दिवस सादर झाला होता –
-- कृत्रिमपणे – एका वेगळ्याच परिसरातून.
मी कधीच झोपाळलेला वा भुकेला वा तहानेला नव्हतो,
कधीच उकाड्याने वा थंडीने ग्रस्तही नव्हतो.
काळ होता एक अनाकलनीय भुताटकी
कारण तिथे काहीच घडत वा बदलत नव्हते.
माझ्यात मात्र अजूनही होता थोडा काळ
ते मुख्यतः त्या खुर्चीमुळे.
माझ्या तिच्यात व्यग्र असण्यामुळे
माझी भूतकाळाची जाणीव पूर्ण नष्ट नव्हती झाली.
वारंवार मी जुंपायचो स्वतःला त्या खुर्चीला मी एक घोडा असल्याप्रमाणे
आणि तबडकायचो तिच्यासह इकडेतिकडे,
कधी वर्तुळाकार,
तर कधी सरळ पुढे.
मला वाटते की मी यशस्वी झालो.
मी खरेच झालो का यशस्वी ते नाही माहीत मला
कारण त्या अवकाशात नव्हते काहीच
ज्यामुळे मला माझ्या हालचाली तपासता याव्यात.
त्या खुर्चीवर बसलेला असताना मी करायचो विचार विषण्णपणाने,
पण आततायीपणाने नाही, की काय म्हणून त्या जगाचा गाभा
प्रक्षेपित करत असावा असा काळा उजेड.
--- ००० ---

सवय

तसे तर हे जगच आपटत गेले मेंदूवर
आणि त्याचा सराव होत सवय झाली
नाही तर तसे ते अपरिचितच आहे
सवयीतून वाटत गेले मी यासाठी हे सोडले
त्यासाठी तो त्याग केला जगण्यात
खूप काही राहून जात गेले एवढे आदर्श
प्रयत्न करूनही पुरेसे प्रेम नाही मिळाले
अन्याय तर होत गेलेच आणि अपमानही
निव्वळ असण्याचेच
रोज सतत काही ना काही खटकतच असते
सारखे नकोत संघर्ष म्हणून बरेच
गिळले जाते काही होतातही संघर्ष अटळपणे
दोन्हींचे परिणाम सारखेच होतात शरीरावर हे जाणवते
बुद्ध म्हणाला नीट राहायचे असेल तर आता मला
अमुक होईल त्रास अशी कल्पना नकाच करू पण
माझ्यावरही विश्वास नका ठेवू असेही तो म्हणाला
ते जास्त आवडले कारण त्रास हवाच होता
इंधनच नसेल तर जगणार तरी कसे
व्यवस्था बाहेर कुठे नसते बदलायची ती स्वतःच्या
टाळक्यात बदलायची असते हे अमान्यच करावे लागले
सवयीच्या जगाचा त्याग कसा करणार आणि
काहीच माहीत नसण्यात उडी तरी कशी मारणार
--- ००० ---

दोघांचे वास्तव

माझ्या मनाचा एक भाग
कंट्रोल करतो त्याचा दुसरा भाग
जे माझे वास्तव ज्यात तू
मला आवडण्यामुळे तेवढे
कंट्रोल न करावे लागणारे
म्हणजे मीच
आपण आपापल्या वास्तवांचे
टाकून देऊ कंट्रोल करावे लागणारे भाग
उरेल ते आपण दोघे नसून एकच काही असेल
--- ००० ---

क्षण

बरीच वर्षे झाली
तू होतीस मी होतो आणि आणखी दोघेतिघे
एकूणच कविता या विषयावर आपण बोलत होतो
पण मला काही सूक्ष्म अंतःप्रवाह जाणवत होते
एका क्षणी आपोआप तू दिसूच दिलेस
माझ्याबाबतचे तुझे सन्मानयुक्त मनभरे प्रेम
मी वा इतरांनी असे काही जाणवल्याचे
वागण्यात आणलेच नाही
तुला तर जणू त्याची जाणीवच नसावी
म्हणजे एकूणात वास्तवात
तसे काही घडलेच नाही
पण त्या क्षणाचा तो अमर्याद स्पर्श
माझ्या मनात जपला गेला
पुन्हा वारंवार भेटणे होणारच नव्हते
किंवा होऊही शकले असते पण नाही झाले
जे दिलेघेतले गेले ते होऊन गेले
आता आपण कुठेही असलो
आणि कुठेही मग्न असलो
आणि कुठेही कसेही व्यग्र असलो तरीही
समजा झाली पुन्हा भेट तरी मला नाही वाटत
की तू तो क्षण जराही बदलू पाहशील
-- तो नाही ती क्षण
--- ००० ---

गालिबची प्रेयसी

होय हे आपल्यांतलेच आहे
हजार पानांचे सविस्तर विवरण
कुणाचीच हरकत नसलेले
कारण कुणाला माहीतच नसलेले
की जगातले सगळे मार्ग बंद असले
तरी चालूच असणार आहे हा प्रवास
कुठेही न जाता न येता
प्रतिसादांचे भरघोस पराग
कधी उत्फुल्ल तर कधी नाराज
गाड्या चुकत चालल्यामुळे
काळ चालू असणे वा थांबणे
यावर जिवंतपणाची ऊब
थोडीच अवलंबून असते
घडणे वा न घडणे
ही तर निव्वळ धूळफेक
मने कुठेही असली तरी
अंतर गायब असते
आणि खरे तर आता
मनांचाही नसतो अडथळा
मी असतो गालिब
आणि तू गालिबची प्रेयसी
--- ००० ---

मायकेल पामर (१९४३ – २०१३). मला आवडलेला एक अमेरिकन कवी.
त्याच्या तीन कवितांचा अनुवाद खाली देतोय --

स्वप्नांचे प्रजासत्ताक (The Republic Of Dreams)
-- मायकेल पामर – अनु० – चं. प्र. देशपांडे.

ती इतकी निश्चल पडून होती की
ती बोलत असताना
एका कोळ्याने विणले एक शिवणविरहित
जाळे तिच्या शरीरावर
आम्ही बोलत असताना
आणि मग तिचे अवयव पडत गेले ढिले
एकेक करून
आणि तसेच माझेही
--- ००० ---

माघार (Recursus)
-- मायकेल पामर – अनु० – चं. प्र. देशपांडे.

आवाज, त्याच्या साधेपणामुळे, अनेकदा धूळ उडायला कारण ठरेल.
कुणीतरी म्हणेल, मला श्वास घेता येत नाहीय, जणू धुळीने गुदमरल्यामुळे.
शरीराबरोबर आवाजाचेही वय होत जाते.
तो म्हणेल, एका कीहोलमधून निसटलेल्या प्रकाशातून मला आकार आला.
किंवा त्या प्रकाशाचाच मी आकार आहे.
तो म्हणेल, शरीराला श्वास घेता येण्यासाठी एक थर सोलून फेकावा लागेल.
तो म्हणेल, यापुढे जे येईल ते असेल एक चित्र,
आता सर्व गोष्टी कशा आहेत माझ्या दृष्टीने, ते दाखवणारे.
तो म्हणेल, गुलाब लाल आहे, बे दुणे चार होतात जणू दुसरे काही शक्य आहे.
धूळ चक्राकार उडत राहते.
तो म्हणेल, कैरोपासूनचे कोणत्याही ठिकाणापर्यंतचे अंतर फारसे महान नाहीय.
जणू काही एखाद्याने दुर्बिणीची वेगळी जुळवणी करून घेतलीय.
किंवा त्याच्या भागांचे कार्य तपासून घेतलेय.
बहुधा ते साधन धुळीत माखलेले आणि फडताळावर विसरले गेलेले.
टोप्यांच्या पेटीजवळ आणि चामड्याच्या बूटजोडाजवळ.
उपलब्ध अवकाश भरण्यासाठी आवाज प्रसरण पावेल.
जणू काही हे म्हणण्यासाठी की हा अवकाश नाहीय अमर्याद.
हा अवकाश नाहीच आहे अमर्याद.
जेव्हा तो तुमच्या नजरेसमोर आणला जातो.
आणि असा तो कोणाता आवाज आहे जो म्हणतो (किंवा दावाच करतो)

की आदल्या रात्री मला भिंतींचे स्वप्न पडले किंवा विटांच्या रांगांचे,
किंवा आदल्या रात्री मला स्वप्न पडले अवयवांचे.
जेव्हा तुम्ही स्वप्न पाहता – नेहमीच अनिच्छेने – भिंतींनी गुदमरवलेला
वाचता न येणारा मजकूर आणि आवाज यांचे.
जणू काही हाच असावा प्रश्न : प्रेमिक, कैदी आणि अतिथी.
हा आवाज, एखाद्या शिस्तीच्या कृतीप्रमाणे वा क्रीडेप्रमाणे इतर आवाजांचे अनुकरण करेल.
मी आत्ता तेच तर करतोय.
तेच तर करतोय मी आत्ता.
माझ्या पाठीमागे असलेले घड्याळ आणि त्याची चक्रयंत्रणा.
आवाज एक ओळखून आहे कित्येक वर्षे.
कधी पाण्याखाली कधी ठिणगीने झाकलेला.
आताच्या या हिवाळ्याच्या काळजात, किंवा वसंताच्या म्हणू.
आवाज त्याच्या डोळ्यांपुढे एक इतिहास असलेला.
धुळीचा इतिहास त्याच्या डोळ्यांपुढे.
जणू आठवत असल्याप्रमाणे तो म्हणेल,
स म्हणजे सावकाश जळणारी काडेपेटीतली काडी.
माझ्या समोरच्या टेबलावर.
या घड्याळावर आकडेच नाहीत.
आणि मी एका तांबड्या घरात राहतो जे एके काळी तपकिरी होते.
एक कागदाचे घर, जणू पडत असलेल्या प्रकाराचे.
असला आहे इतिहास या घराचा.
ते तसेच दिसते.
ते अगदी तसेच दिसते.
आपण विचार करतो की हे सांगावे एखाद्या भाषेत.
--- ००० ---

गोलगट्टू माणसाचे गाणे (Song of the Round Man)
-- मायकेल पामर – अनु० – चं. प्र. देशपांडे.

(सारा जेव्हा मोठी होईल तेव्हा तिच्यासाठी)
त्या गोलगट्टू असलेल्या आणि विषण्ण डोळ्यांच्या माणसाने
सिगारचा झुरका मारला जणू काही तो जिवंतच होता. सफरचंदाच्या
डाव्या बाजूला गिलची फुले आणि उजव्या बाजूला जांभळी घंटाकार फुले
आणि पाठीमागे गवताने आच्छादलेला डोंगर.
आज मी खूप उदास आहे म्हणाला विषण्ण डोळ्यांचा माणूस
कारण माझे डोके एका जपानी पेटीत मी कुलुपात ठेवलेय
आणि त्याची किल्ली हरवून बसलोय.
मी खूप उदास आहे आज तो मला म्हणाला
कारण सफरचंदाजवळ गिलची फुले आहेत

आणि घंटाकार जांभळी फुले जी मी पाहू शकत नाहीय.
माझ्यासाठी तू बघशील का त्यांच्याकडे
त्याने विचारले, आणि सांगशील का तुला काय दिसतेय ते ?
मला नाही ते शक्य मी उत्तरलो
कारण माझी दृष्टी गुळमट आणि अंधुक झालीय
मेणबत्तीच्या उजेडातल्या दीर्घकाळच्या वाचनाने.
बरे मग तू काय वाचलेयस ते सांग मला
म्हणाला तो गोलगट्टू असलेला आणि विषण्ण डोळ्यांचा माणूस
नाही जमणार मी उत्तरलो
कारण माझी स्मरणशक्ती थकलीय आणि अस्पष्ट झालीय
ज्या गोष्टी दिसूच नाही शकत कोणत्याही उजेडात
अशा गोष्टींकडे पाहून पाहून
आणि मी तर माझे डोके त्या जपानी पेटीत कुलुपात टाकून
किल्ली भिरकावून बसलोय.
मग मी तू आहे आणि तू मी आहेस
म्हणाला तो विषण्ण डोळ्यांचा माणूस जिवंतच असल्याप्रमाणे.
मी लिहून देईन तुला की मी कुठे असायला हवे
ती गिलची फुले आणि घंटाकार जांभळी फुले यांच्या दरम्यान
आणि ते सफरचंद आणि तो डोंगर यांच्याही बाबतीत
आणि मग आपण दुपारपासून रात्रीपर्यंत सिगारचे झुरके मारत बसू
जणू काही आपण जिवंतच आहोत असे समजून.
--- ००० ---

मी खूप मागे पडलोय

सखोल गाणे न ऐकताच
मी स्वतःला विसरू शकतो
ग्रेट कविता न वाचताच
हरवून जाऊ शकतो
महान नाटक न पाहताच
माझा जन्मच रद्द करू शकतो
माझे आवडते खूप काय काय आहे
मी न वाचलेली लाखो पुस्तके आहेत
डोक्यात कचरा जमवत राहण्याचे मला अप्रूप नाही
मला काही ना काही विचारले जातेच सारखे
हे वाचले का ते पाहिले का आणि अमुकतमुकचे गाणे
मी सरळ कबूल करून टाकतो
मी खूप मागे पडलोय
ना मला कुणाला गाठायचेय
ना कुणाच्या बरोबर राहायचेय
सहज बसल्या बसल्या मी माझे मन पाहतो
आणि नाहीसाच होतो
मग असतो तेव्हा मी बऱ्याचदा
नको म्हणतो फुकटचे काबाडकष्ट
--- ००० ---

हे समजून घ्या

असा जास्त दाब नका देऊ
अशाने तुमच्या स्वप्नांचे फुगे
हातातून निसटतील
आणि तुमचा वास्तवातला
आत्मविश्वास उणावेल
पूर्वी कर्नाटकात सकाळी
तुमच्या घराजवळ आणत म्हशी
आणि समोर पिळून देत ताजे दूध
आहे ना माहीत नसणारच
तुम्ही नव्हताच ना तिकडे
हाच तर आहे प्रॉब्लेम आपल्या सगळ्या
आठवणीच वेगवेगळ्या आहेत
देवाच्या देवळाची पायरी
निसटू देऊ नका खऱ्याखोट्याचा
नाही प्रश्न विश्वास आहे तोवर
फायदे आहेतच विश्वास नसण्याच्या
शूरपणाचे हुशार फायदेही
असतातच पण ते वेगळे
बाकी आपण समदुःखीच आहोत
हाच आहे आपला जुळणारा सूर
उद्वेगाने जगता नाही येत नीट
शांत राहात जगणेच बरे पडते
हे समजून घ्या
--- ००० ---

शब्दांतून

काल मध्यरात्री कुत्री ओरडण्याचा आवाज
वाटला असा की कुणी घसादुखीसाठी
गुळण्या करतेय मिठाच्या पाण्याच्या
अजबच आहे हे सगळे कुणाला
कुत्र्यावरून मासा आठवणे
वा घारीवरून जलशुद्धीयंत्र
नुसते गाव म्हटले तरी कुणाला खडीउकडगाव
आठवेल तर कुणाला झुमरीतलैया
कुणाला कोपरगाव आठवेल तर कुणाला
नरसोबाची वाडी तर कुणाला आग्रा
कुणी म्हणेल वडगाव वा पिंपळगाव
तीही असणार शेकड्याने आणि त्यांतही
खुर्द आणि बुद्रुक किंवा कुणी म्हणेल
इंग्लंडमधले लँगले एखादा पॅरीसही म्हणेल
एखादा कधीच न पाहिलेले म्हणेल
कुरुंदवाड वा कवठेमहांकाळ वा सुगाव
ज्याचे आधीचे नाव होते थूगाव
अशा जगातले शब्द घेऊनच
लिहावी लागणार कविता प्रत्येक शब्दाला
असणार माणसागणिक वेगळा वास
शब्दांच्या जगातले काहीच नाही पोचणार
जसेच्या तसे शब्दांबाहेरचे बोला काही
शब्दांतून – तेच फक्त तडक आहे तेच पोचेल
--- ००० ---

कवितेचे जग

आपल्याला दिसते ते जग
तेच तसेच तेवढेच नाहीय
हे कवितेला माहीत असते
ती ते हवे तसे वळवू वाकवू शकते
कविता तिच्या जगण्यासाठी
फक्त भाषा नाही वापरत
ती पूर्ण जगच वापरते
प्रत्येक वेळी नव्याने
--- ००० ---

चार्लस बुकोवस्की – जर्मन-अमेरिकन कवी – १९२० ते १९९४. हा डर्टी रियालिझम चा म्हणजे वास्तववादाच्या विशेषतः समाजातल्या त्यक्त, दुर्लक्षित वा दर्जाहीन समजल्या गेलेल्या जगण्याचे चित्रण करणाऱ्या ' अस्वच्छ वास्तववाद ' या भागाचा उद्गाता होता. त्याचे निम्म्याहून अधिक लेखन मरणोत्तर प्रकाशित झाले.

संस्मरणीय स्मित (A Smile To Remember)
-- चार्लस बुकोवस्की – अनु० – चं. प्र. देशपांडे.

आमच्याकडे एका वाडग्यात काही सोनमासे होते.
त्यात ते वर्तुळाकार फिरत. तो वाडगा होता टेबलावर
जे होते रंगवलेल्या खिडकीजवळ, जड पडदे लावलेल्या.
आणि माझी आई, नेहमीच स्मित करणारी, आम्ही सगळ्यांनी
आनंदी असावे अशी इच्छा करायची, म्हणायची,
" आनंदी राहा हेन्री ! " आणि बरोबरच होते तिचे :
शक्य असेल तर आनंदी राहणे चांगलेच की.
पण माझे वडील सातत्याने तिला आणि मला
आठवड्यातून अनेकदा मारत असत. त्यांच्या
सहा फूट दोन इंची शरीरात संताप खदखदत असे
आणि त्यांना हे कळत नसे की काय आहे हे आतून धडका देणारे.
माझी आई, एक गरीब मासा,
आनंदी होता यायची वाट पाहायची मार खात,
दर आठवड्याला दोनतीनदा, मला आनंदी राहायला सांगत :
" हेन्री, हास बघू ! हसत का नाहीस तू कधी ? "
आणि कसे हसायचे ते ती मला हसून दाखवायची –
आणि इतके विषण्ण स्मित मी कधीच कुठेच नाही पाहिलेले.
एके दिवशी ते सोनमासे मेले, पाचही –
ते तरंगू लागले पाण्यावर कललेले एका बाजूला
आणि डोळे अजूनही उघडे असलेले.
आणि जेव्हा माझे वडील परतले घरी
तेव्हा त्यांनी ते फेकले मांजराला खायला
सैपाकघराच्या जमिनीवर
आणि आम्ही बघत राहिलो
माझी आई स्मित करत असताना.
--- ००० ---

निळा पक्षी (Bluebird)
-- चार्लस बुकोवस्की – अनु० – चं. प्र. देशपांडे.

माझ्या काळजात एक निळा पक्षी आहे,
त्याला बाहेर यायचे आहे,

पण मी खूपच भारी पडतोय त्याला.
मी म्हणतो, तिथेच आत राहा,
कुणालाही मी तुला पाहू देणार नाही.
माझ्या काळजात एक निळा पक्षी आहे,
त्याला बाहेर यायचे आहे,
पण मी त्याच्यावर ओततो व्हिस्की
आणि सिगारेटचा धूर घेतो ओढून त्याच्यावर,
आणि वेश्या आणि बारसेविका आणि
किराणा दुकानातले कारकून
यांना कधीच नाही कळत
की आत तो आहे.
माझ्या काळजात एक निळा पक्षी आहे,
त्याला बाहेर यायचे आहे,
पण मी खूपच भारी पडतोय त्याला,
मी म्हणतो,
गप्प बस, माझा सगळा विचका
करायचाय का तुला ?
माझ्या कामांचा नाश करायचाय का तुला ?
युरोपातला माझ्या पुस्तकांचा खप
उध्वस्त करायचाय का तुला ?
माझ्या काळजात एक निळा पक्षी आहे,
त्याला बाहेर यायचे आहे,
पण मी फारच हुशार आहे, मी त्याला
फक्त रात्रीच बाहेर पडू देतो कधी कधी
जेव्हा प्रत्येकजण झोपलेला असतो.
मी म्हणतो, मला माहिती आहे
तू आत आहेस ते,
त्यामुळे, कष्टी नको होऊस.
आणि मग मी त्याला परत आत ठेवतो,
पण तो काहीसा गात असतो
तिथेच आत, मी त्याला अगदीच मरू नाही देत
आणि आम्ही तसेच एकत्र झोपतो
आमच्यातल्या गुप्त करारासह.
आणि हे बऱ्यापैकी एखाद्या माणसाला
रडवणारे असते, पण मी
नाही रडत,
तुम्ही ?
--- ००० ---

माफ

समाधी असो की दर्गा
मंदिर असो की कोणतेही प्रार्थनास्थळ
येणारी प्रत्येक व्यक्ती असते अतिनम्र
म्हटले तर गांजलेली गरीब
वाहून टाकू इच्छिणारी सर्वस्व
काही इच्छित मिळवण्यासाठी
कुणीही ही रचना
बिघडवून नाही चालणार
वा विरोधाचा वा चेष्टेचा
एक शब्दही नाही चालणार
या नम्रांचे एकमेकांना क्षुद्र समजणे
हसणे वा अमुकांनीच केला नाश म्हणणे
आदर्शांची वा विचारसरण्यांची
नसतात मंतरलेली खिडक्यादारे
ते तर फुल मुक्त या सर्वांचीच रेवडी
उडवायला अकलेचा धुरळा
विरोध केल्यास हिंसक होणारा
सर्वांचाच विश्वास असतो
आपापल्या टाळक्यांवर असीम
अंधश्रद्धानिर्मूलनवाले माफ करतात
हा मानवी दोष सहानुभूतीने त्याच नावेत बसून
--- ००० ---

पाब्लो नेरुदा – चिलियन कवी – १९०४ ते १९७३ – कम्युनिस्ट विचारसरणीचा पुरस्कर्ता – १९७१ साली नोबेल पारितोषिकाने सन्मानित.

तू मला विसरलीस तर (If You Forget Me)
-- पाब्लो नेरुदा – अनु० – चं. प्र. देशपांडे.

मला वाटते हे एक
तुला समजायला हवे.
हे कसे आहे ते तू जाणतेस :
जर मी पाहिले
चंद्राच्या स्फटिकाकडे,
माझ्या खिडकीशी असणाऱ्या
मंद पानगळीतल्या लाल फांदीकडे,
जर मी स्पर्श केला
शेकोटीजवळच्या अगम्य राखेला
किंवा सुरकुतल्या शरीराच्या लाकडाला
तर हे सगळे मला तुझ्याकडेच नेते
जणू काही जे जे अस्तित्वात आहे ते ते,
सुगंध, प्रकाश, धातू,
या सगळ्या छोट्या छोट्या नावा आहेत
ज्या जातात तरंगत तुझ्या बेटाकडे
माझ्या प्रतीक्षेत असणाऱ्या.
ते ठीक, पण आता
जर हळूहळू तू माझ्यावर प्रेम करणे
बंद करत गेलीस तर
मीही हळूहळू तुझ्यावर प्रेम करणे बंद करेन.
अचानक तू जर विसरलीस मला
तर माझा कानोसा नको घेऊस,
कारण आधीच मी तुला विसरलेलो असेन.
माझ्या जगण्यातून फिरणारे
निशाणांचे वारे जर तुला पाल्हाळिक आणि वेडे
वाटत असतील आणि तुझा निर्णय झाला असेल
की द्यावे मला सोडून त्या हृदयाच्या किनाऱ्यावर
जिथे आहेत माझी मुळे,
तर लक्षात ठेव
त्याच दिवशी, त्याच वेळी,
मी माझे खांदे उडवेन
आणि माझी मुळे निघतील
दुसऱ्या प्रदेशाच्या शोधात.

पण प्रत्येक दिवशी,
प्रत्येक घटकेला,
जर तुला वाटले दुर्लभ गोडव्याने
की तुझी नियती माझ्यासोबतच आहे जोडलेली,
जर प्रत्येक दिवशी एखादे फूल
स्वार होऊ लागले तुझ्या ओठांवर माझ्या शोधात,
आहा, माझ्या प्रिये, माझीच माझीच असलेल्या प्रिये,
तर पूर्वीच्याच अग्नीचे माझ्यात पुनर्निर्माण होईल,
माझ्यात काहीच विझलेले वा विस्मृतीत गेलेले नसेल,
माझे प्रेम तुझ्या प्रेमावरच तर पोसले जाते, हे प्रिये,
आणि जोवर तू जिवंत आहेस तोवर ते
तुझ्याच आलिंगनात असेल,
माझ्या आलिंगनासह.
--- ००० ---

सागराच्या त्या म्हाताऱ्या (The Old Women Of The ocean)
-- पाब्लो नेरुदा – अनु० – चं. प्र. देशपांडे.

गंभीर सागराकडे येतात त्या म्हाताऱ्या
त्यांच्या गळ्यांत त्यांच्या शाली बांधलेल्या
त्यांची नाजुक पावले करकरवत
त्या एकट्याच बसतात किनाऱ्यावर
ना त्यांची नजर हलू देता वा ना त्यांचे हातही
ना ढग बदलता ना शांतता.
तो अश्लील सागर फुटतो आणि पंजे उभारतो
उतारावरून वेगात जातो बिगुल वाजवत
आणि त्याची सांडाची दाढी हलवतो.
त्या सौम्य म्हाताऱ्या बसलेल्या असतात
जणू एखाद्या पारदर्शक नावेत आणि
त्या पाहतात त्या दहशती लाटांकडे.
कुठे जातील त्या म्हाताऱ्या आणि होत्या तरी कुठे त्या ?
त्या प्रत्येक कानाकोपऱ्यातून येतात
त्या आपल्याच स्वतःच्या आयुष्यांतून येतात.
आता त्यांच्याकडे तो सागर म्हणजे आहे
थंड आणि धगधगती रिकामीक
ज्वालांनी भरलेला एकांत.
त्या येतात सर्व गतकाळांतून
त्या काळी सुगंधी असलेल्या घरांतून
विझून गेलेल्या संध्याकाळींतून.

त्या पाहतात किंवा नाहीही पाहात सागराकडे
त्यांच्या आधाराच्या काठ्यांनी त्या काही चिन्हे काढतात वाळूत
आणि तो सागर पुसून टाकतो त्यांची ती अक्षरकला.
त्या म्हाताऱ्या उठतात आणि निघून जातात
त्यांच्या ठिसूळ पक्षीपावलांनी
लाटा फुसांडत आत येत असताना
तिथल्या वाऱ्यात नग्न हुंदडत.
--- ००० ---

दागिन्यांनी नटलेले घोडे

सिनेमागृहांच्या आधी
टाकली जायला हवीत
इतिहासाची पुस्तके
फळांच्या भट्टीत
आपले जगणे आहे अवलंबून इथल्या
झुरळांच्या लांबच्या नातेवाईकांवर
जे परदेशांतून शिकून आलेत
हेयरकटिंगचे अनेक प्रकार
उदास डायनिंग टेबलावर
पडलेले अनेक शहरांचे नकाशे
प्रदीप्त करतात निर्दयपणे
भूतकाळातले भुकेचे कावळे
इथे कुणाला हवेयत
दागिन्यांनी नटलेले घोडे
जे जागचे हलू नाही शकत
आहे त्या स्वभावात अडल्याने
--- ००० ---

ऑक्टाव्हिओ पाझ – मेक्सिकन कवी – १९१४ ते १९९८ – अतिवास्तववाद, अस्तित्ववाद, बौद्ध धर्म आणि हिंदू धर्म यांचा प्रभाव – १९६२ ते १९६८ भारतात मेक्सिकोचे राजदूत – १९९० ला नोबेल पारितोषिकाने सन्मानित.

रस्ता (The Street)
-- ऑक्टाव्हिओ पाझ – अनु० – चं. प्र. देशपांडे.

हा एक लांबलचक आणि शांत रस्ता आहे.
मी चालतो अंधाऱ्या काळेपणात धडपडतो आणि पडतो
आणि उठतो, आणि मी चालतो अंधपणे, माझी पाऊले
तुडवतात शांत दगड आणि वाळलेली पाने.
माझ्या मागूनही कुणितरी तुडवतोय दगड, पाने :
माझी गती कमी झाली तर त्याचीही कमी होते;
मी धावू लागलो तर तोही धावू लागतो, मी वळतो : कुणीच नाहीय.
सगळेच अंधारलेले आणि द्वारहीन,
माझी पाऊलेच फक्त माझे भान असलेली,
मी वळतो आणि पुन्हा पुन्हा वळतो या कानाकोपऱ्यांत,
जे सातत्याने नेतात मला त्या रस्याकडे
जिथे कुणीच माझ्यासाठी थांबलेले वा माझ्यामागे येणारे नाहीय,
जिथे मी अनुसरतो एका माणसाला जो धडपडतो,
उठतो आणि मला पाहिल्यावर म्हणतो : कुणीच नाहीय.
--- ००० ---

पलीकडे (Across)
-- ऑक्टाव्हिओ पाझ – अनु० – चं. प्र. देशपांडे.

मी उलटतो हे दिवसाचे पान,
लिहिताना मला सांगितले गेलेले
तुझ्या पापण्यांच्या गतीकडून.
मी प्रवेशतो तुझ्यात,
काळोखाची सत्यता असलेल्या.
मला काळोखाचा पुरावा हवाय, हवीय
प्राशन करायला काळी दारू :
घे माझे डोळे आणि चिरड ते.
एक निशाबिंदू
तुझ्या स्तनाग्रावर :
महकत्या गुलाबाचे गूढ.
माझे डोळे मिटत मिटत
मी ते उघडतो तुझ्या डोळ्यांत.
सतत जागी

तिच्या रक्तरंगी रत्नशय्येवर :
तुझी ओली जीभ.
वाहते झरे आहेत
तुझ्या धमन्यांच्या उद्यानात.
रक्ताचा मुखवटा धारण करून
मी ओलांडतो तुझे विचार कोरेपणाने :
स्मृतिभ्रंश दाखवतो मला मार्ग
जगण्याच्या दुसऱ्या बाजूचा.
--- ००० ---

जाण्याच्या आणि थांबण्याच्या मध्ये (Between Going and Staying))
-- ऑक्टाव्हिओ पाझ – अनु० – चं. प्र. देशपांडे.

जाण्याच्या आणि थांबण्याच्या मध्ये
दिवस होतो दोलायमान,
प्रेमात त्याच्या स्वतःच्या पारदर्शीपणाने.
ही वर्तुळाकार दुपार आता आहे एक उपसागर
जिथे निश्चलपणातले जग हिंदोळते.
सर्वच आहे प्रत्यक्ष आणि सर्वच अप्राप्य,
सगळेच आहे समीप आणि तरीही स्पर्शाबाहेर.
कागद, पुस्तक, पेन्सिल, ग्लास,
विसावतात त्यांच्या नावांच्या सावल्यांत.
माझ्या कानशिलांत धडधडणारा काळ गिरवतो
तेच अपरिवर्तनीय रक्ताचे व्यंजन.
तटस्थ भिंतीचे रूपांतर करतो प्रकाश
प्रतिबिंबांच्या प्रेक्षागृहात भुताटकीसमान.
मी दिसतो स्वतःला मध्यावर एका डोळ्याच्या
निरखणाऱ्या मला त्याच्या शून्य नजरेने.
तो क्षण होतो विस्कळित. अचल,
मी थांबतो आणि जातो : मी आहे एक विराम.
--- ००० ---

पहिली इच्छा

शिल्प पूर्ण होत आल्यावर
शिल्पकाराने पुतळ्याला
त्याची पहिली इच्छा विचारली
पुतळा म्हणाला एकच आहे
माझ्यात प्राण घालू नकोस
का असे शिल्पकाराने विचारले
पुतळा म्हणाला मला नाही व्हायचे
पश्चात्तापदग्ध सूडदग्ध वासनाविकारदग्ध
भीतीदग्ध प्रेमदग्ध सहानुभूतिदग्ध
आणि यातच कुणी नष्ट करणे वा होणे
मला निर्जीव शांत दगड म्हणूनच जगू दे
शिल्पकार हसला दगडच आहे म्हणाला मनात
असंख्य युद्धांत सूडाचा किती उपयोग होऊन गेला आहे
तो कसा नाकारणार
फक्त एखाद्याचा खून इतका निर्घृण नको होता व्हायला
एवढे फार तर आपण म्हणू शकतो
आणि तरीही असे आहे तर तुम्हाला ते कसे चालले
त्या वेळी तुम्ही कसे गप्प राहिलात
हे होऊ शकणारच
माणसे कशी शिल्पे होऊन जगू शकतील
असे म्हणून त्याने तो पुतळा
प्रदर्शनात मांडला
पुनःप्रत्ययाच्या अनुभवाने माणसे आनंदली
--- ००० ---

नाटक

मित्रवर्य काळ आहे तो
जाजम नाहीय ते
तुमच्या मनातले
उद्या कुणी ठेवले निखारे
कुणाच्या पावलांवर
तर तो मी नसेन
उगीचच वाळत टाकायचे
आपल्या शब्दांचे गंजिफ्रॉक
जणू कवितांचे शौकीनच
कोण इंटरेस्ट घेणार
तुमच्या उरल्यासुरल्या कहाणीत
लग्नाच्या कार्यालयात
आवरते घ्या तुमचे नाटक
आणि करा सरळ कबूल
तुम्ही जिवंत आहात ते
--- ००० ---

वास्को पोपा – सर्बियन कवी – १९२२ ते १९९१ – तत्त्वज्ञानाचा पदवीधर -- अतिवास्तववाद आणि सर्बियन लोकपरंपरा यांच्या प्रभावांतून स्वतःची एक वेगळीच शैली विकसित केली.

बदक (Duck)
-- वास्को पोपा – अनु० – चं. प्र. देशपांडे.

ती चालते डुलत डुलत धुळीतून
त्या धुळीत नसतात हसरे मासे
तिच्या दोन्ही बाजूंतून ती नेते
पाण्याचा अस्वस्थपणा वाहून
ओबडधोबड
ती डुलत चालते हळू हळू
तिच्या विचारात असलेल्या
लव्हाळ्यांपर्यंत ती कशी ना कशी पोचेलच
कदापि
कदापि नाही जमणार तिला
चालायला
जसे जमायचे तिला
नांगरणे तिचे आरसे
--- ००० ---

आत आत आपल्यांत (Far Within Us)
-- वास्को पोपा – अनु० – चं. प्र. देशपांडे

१.
आपण उचलतो आपले हात
हा रस्ता चढतो वर आकाशात
आपण खाली पाडतो आपले डोळे
ही छप्परे उतरतात खाली शिरत जमिनीत
आपण उल्लेख न केलेल्या
आपल्या प्रत्येक वेदनेतून
उगवते एक चेस्टनटचे झाड
आणि राहते एक गूढ बनून आपल्या मागे
आपण बाळगलेल्या
प्रत्येक आकांक्षेतून
उगवतो एक तारा
आणि अप्राप्य हलत राहतो आपल्या समोर
येतोय का ऐकू तुला हा गोळीबार
आपल्या डोक्याभोवती उडणारा

आणि येतोय का ऐकू हा गोळीबार
जो करतोय रक्षण आपल्या चुंबनाचे
२.
तुझ्या कटाक्षांच्या रस्त्यांना
नाहीय अंत
तुझ्या डोळ्यांतून आलेले स्वॅलोपक्षी
नाही करत स्थलांतर दक्षिणेला
तुझ्या छातीतल्या ऍस्पन झाडांवरून
त्यांची पाने नाही पडत
तुझ्या शब्दांच्या स्वर्गात
नाही मावळत सूर्य
३.
आपला दिवस आहे एक हिरवे सफरचंद
दोन फोडी केलेले
मी पाहतो तुझ्याकडे
तुला नाही मी दिसत
आपल्या दोघांमध्ये आहे हा अंध सूर्य
या पायऱ्यांवर
आपली फाटलेली मिठी
मला तू साद घालतेस
मला ती नाही ऐकू येत
आपल्यांमध्ये आहे ही बहिरी हवा
दुकानांच्या खिडक्यांतून
शोधताहेत माझे ओठ
तुझे स्मित
या छेदरस्त्यांवर
आपले तुडवले गेलेले चुंबन
मी दिलाय तुला माझा हात
तुला ते जाणवत नाहीय
शून्यतेने घेतलेय तुला मिठीत
चौकाचौकांतून
शोधतोय तुझा अश्रू
माझे डोळे
या संध्याकाळी माझा मृत दिवस
भेटतोय तुझ्या मृत दिवसाला
झोपेतच फक्त
चालतो आपण समान रस्ते
४.
हे आहेत तुझे ओठ

जे मी आता परत करतोय
तुझ्या मानेला
हे आहे माझे चांदणे
जे मी उतरवून घेतोय
तुझ्या खांद्यांवरून
आपण हरवून बसलोय एकमेकांना
अभेद्य झाडीत
आपल्या भेटीच्या
माझ्या हातांत
तुझी मोहाची सफरचंदे
मावळतात आणि पहाटतात
तुझ्या घशात
भडकतात आणि विझतात
माझ्या अधीर वासनांचे तारे
आपण प्राप्त झालोय एकमेकांना
या सोनेरी पठारावर
आत आत आपल्यांत
--- ००० ---

एका गोष्टीची गोष्ट (The Story Of A story)
-- वास्को पोपा – अनु० – चं. प्र. देशपांडे

कोणे एके काळी एक होती गोष्ट
तिचा शेवट यायचा
तिच्या सुरुवातीआधी
आणि तिची सुरुवात यायची
तिच्या शेवटानंतर
तिचे नायक तिच्यात प्रवेशत
त्यांच्या मृत्यूनंतर
आणि सोडून जात तिला
त्यांच्या जन्मापूर्वी
तिचे नायक बोलत
कोणा पृथ्वीबद्दल कोणा स्वर्गाबद्दल
ते सर्व प्रकारच्या बाबींबद्दल बोलत
फक्त ते एका गोष्टीवर बोलत नसत
त्यांनाच माहीत नसलेल्या
की ते फक्त एका गोष्टीतले नायक आहेत
अशी गोष्ट की जिचा शेवट येई
तिच्या सुरुवातीपूर्वी

आणि जिची सुरुवात येई
तिच्या शेवटानंतर
--- ००० ---

रिकामीक (Nothingness)
-- वास्को पोपा – अनु० – चं. प्र. देशपांडे

हे रिकामिके तू झोपलेली होतीस
आणि तू स्वप्न पाहिलेस की तू काही आहेस
कशालातरी लागली आग
तिच्या ज्वाला पिरगाळल्या गेल्या
अंध वेदनांमध्ये
तू जागी झालीस हे रिकामिके
आणि तुझी पाठ घेतलीस तू शेकून
त्या स्वप्नातल्या ज्वालेवर
तुला त्या ज्वालेच्या वेदना नाही दिसल्या
जगभरच्या म्हणाव्यात अशा वेदना
तुझी पाठ ऱ्हस्वदृष्टीची होती
हे रिकामिके तू पुन्हा झोपी गेलीस
आणि स्वप्नात तू पाहिलेस की तू रिकामीक आहेस
ज्वाला विझून गेली
तिच्या वेदनांना त्यांची दृष्टी मिळाली
आणि त्याही गेल्या निघून प्रसन्नतेत
--- ००० ---

माझे आवडते कवी

मीही एक आहे
माझ्या आवडत्या कवींत
आम्ही आहोत जगाचे भाग
विभिन्न असंबद्ध तुकडे
आम्ही पूर्ण जगाला देतो वाव
आमच्या असण्यात
आमच्या शब्दांनी केलेला असतो त्याग
आमच्या उद्दीपनांचा आणि तिरस्कारांचा
आमच्या संकुचितपणाची आमची भीती
गेलेली असते जगामुळे
कोणतेही दुखणे नसलेले क्षण
असतात आमच्या कविता
या कविता
आमच्यापैकी कुणीही लिहिल्या
तरी फरक नाही पडत
--- ००० ---

सुटका

संकटांतून सुटका असावी
म्हणून त्याने सूट नाकारली
आणि चालत सुटला
त्याला हवे होते सुटसुटीत जगणे
टायसुटाचे बंधन नसलेले
सूऽऽट म्हणणारे प्रत्येक संबंधाला
सुट्टीत फक्त चैन करावी
एरवी जमवत राहावे
फायद्याचे सुटे सुटे पैसे
त्याच्यासाठी गाडी सुटायची थांबलीय
याचे त्याला समाधान वाटले
पहिला शो सुटण्यापूर्वी
शाळा सुटल्यावर होणारा आनंद
आता शक्य नव्हता
पोट खूपच सुटल्यामुळे
आता कोणतीही ग्रहणे
सुटणारच नव्हती
याच्या भीतीने चड्ड्या सुटत होत्या
--- ००० ---

टी. एस. एलियट – अमेरिकेत जन्मलेला इंग्लिश कवी – १८८८ ते १९६५ – १९४८ च्या नोबेल पारितोषिकाने सन्मानित. " कविता म्हणजे भावनेला मोकाट सोडणे नव्हे, कविता म्हणजे केवळ व्यक्तिमत्वाची अभिव्यक्तीही नव्हे, पण, कविता म्हणजे व्यक्तिमत्वापासून सुटका होणे. परंतु, भावना आणि व्यक्तिमत्व असलेल्यांनाच हे समजू शकते की त्यांपासून सुटका म्हणजे काय. " असे म्हणणारा कवी.

हेलन मावशी (Aunt Helen)
-- टी. एस. एलियट – अनु० – चं. प्र. देशपांडे.

कुमारी हेलन ही माझी अविवाहित मावशी होती
आणि ती राहायची एका छोट्या घरात एका फॅशन चौकाजवळ
आणि तिची काळजी घ्यायला होते चार सेवक.
आता ती वारल्यावर होती शांतता स्वर्गात
आणि ती असलेल्या रस्त्याच्या शेवटाला.
शटर्स खाली ओढून घेण्यात आलेली होती
आणि अंत्यसंस्कार व्यवस्थापकाने पाय पुसले होते
त्याला जाणीव होती की अशा गोष्टी यापूर्वीही घडलेल्या आहेत.
कुत्र्यांची अत्युत्तम व्यवस्था केलेली होती,
पण यानंतर लौकरच पोपटही मरण पावला होता.
शेकोटीवरच्या शेल्फवर ड्रेस्डेनचे घड्याळ सातत्याने टिकटिकत होते,
आणि हरकाम्या सेवक बसला होता डायनिंग टेबलवर
मांडीवर घेऊन दोन नंबरच्या सेविकेला –
जी खूप काळजी घ्यायची तिची मालकीण जिवंत असताना.
--- ००० ---

पोकळ माणसे (Hollow Men)
-- टी. एस. एलियट – अनु० – चं. प्र. देशपांडे.

मिस्ता कुर्त्झ – मेलाय तो *
त्या वृद्ध माणसाला एक पैसा
१.
आम्ही आहोत पोकळ माणसे
आम्ही आहोत भुस्सा भरलेली माणसे
एकत्र कललेली
मस्तकाचा भाग पेंढ्याने भरलेली. अरेरे !
आमचे रुक्ष आवाज, जेव्हा
आम्ही एकत्र कुजबुजतो तेव्हाचे
आहेत शांत आणि अर्थहीन
सुकलेल्या गवतातल्या वाऱ्यासारखे
किंवा उंदरांचे पाय फिरावेत फुटक्या काचांवरून

आमच्या शुष्क तळघरात तसे.
घाटाशिवाय आकार, रंगाशिवाय छटा,
गलितगात्र जोर, हालचालीशिवाय आविर्भाव;
थेट डोळ्यांनी इथले असणे ओलांडलेय ज्यांनी
मृत्यूच्या पलिकडच्या राज्याकडे जात
ते ठेवतात आमची आठवण – ठेवलीच तर – गमावलेले
हिंसक आत्मे म्हणून नव्हे तर फक्त
पोकळ माणसे म्हणून
भुस्सा भरलेली माणसे म्हणून.
२.
डोळ्यांना सामोरे जाण्याची हिंमत नाहीय माझ्यात
स्वप्नांतही, मृत्यूच्या स्वप्नराज्यातल्या,
हे डोळे अवतरतच नाहीत :
तिथे, ते डोळे असतात
मोडकळलेल्या स्तंभावरचा सूर्यप्रकाश
तिथे, असते एक झुलणाचे झाड
आणि आवाज असतात
वाऱ्याच्या गाण्यात
अधिकच दूर आणि अधिकच गंभीर
एखाद्या पुसटत्या ताऱ्याहून.
मृत्यूच्या स्वप्नराज्याच्या जवळ
यायचे नाहीय मला
आणि आता परिधानही करू द्या मला
उंदराचा कोट, कावळ्याची त्वचा, शेतात
एकमेकांवर पडलेले दांडे
वागू द्या मला वाऱ्यासारखे
अधिक जवळीक न साधता –
ही काही अंतिम भेट नव्हे
संधिप्रकाशाच्या राज्यातली.
३.
हा मृत प्रदेश आहे
हा काटेरी झाडांचा प्रदेश आहे
इथे उभारल्या जातात
दगडाच्या प्रतिमा, इथेच त्यांना प्राप्त होतात
मयताच्या हाताने केलेल्या प्रार्थना
पुसटत्या ताऱ्याच्या चमकण्यात.
ते असे तर नाहीय की
मृत्यूच्या दुसऱ्या राज्यात
एकट्यानेच जागे होताना

आपण नाजुकपणाने
थरथरण्याच्या वेळी
ज्या ओठांनी घेतले असते चुंबन
तेच साकारताहेत प्रार्थना फुटक्या दगडांसमोर.
४.
ते डोळे इथे नाहीयत
इथे कोणतेच डोळे नाहीयत
या मृत्यू पावणाऱ्या ताऱ्यांच्या दरीत
या पोकळ दरीत
आमच्या गमावलेल्या राज्याचा जणू
मोडका जबडा असलेल्या
या शेवटच्या अशा भेटीच्या जागांमध्ये
आम्ही चाचपडतो एकत्र
आणि टाळतो बोलणे
जमून या किनाऱ्यावर सुजलेल्या नदीच्या
दृष्टिहीन, पुन्हा डोळे दिसण्याच्या अभावी
त्या सातत्ययुक्त ताऱ्याप्रमाणे
अनेकांगांनी फुलत्या गुलाबाप्रमाणे
मृत्यूच्या संधिप्रकाशी राज्यातल्या
तेच फक्त आशा असलेल्या
या रिक्त माणसांची.
५.
हे आपण चाललोय निवडुंगाभोवती
काटेरी झाड काटेरी झाड
हे आपण चाललोय निवडुंगाभोवती
पहाटे बरोबर पाच वाजता
कल्पना आणि वास्तव
यांच्या मध्ये
गती आणि कृती
यांच्यामध्ये
पडते सावली
कारण राज्य तुझे आहे
संभव आणि सर्जन
यांच्यामध्ये
भावना आणि प्रतिसाद
यांच्यामध्ये
पडते सावली
जगणे खूप दीर्घ आहे
इच्छा आणि उबळ

यांच्यामध्ये
कुवत आणि अस्तित्व
यांच्यामध्ये
अर्क आणि पाडाव
यांच्यामध्ये
पडते सावली
कारण राज्य तुझे आहे
कारण तुझे आहे
जगणे आहे
कारण तुझे आहे हे
अशी होते जगाची समाप्ती
अशी होते जगाची समाप्ती
अशी होते जगाची समाप्ती
घणाघाताने नव्हे तर कण्हत कण्हत

--- ००० ---

* मिस्टा कुर्त्झ हे जोसेफ कॉनराडच्या ' द हार्ट ऑफ डार्कनेस ' या लघुकादंबरीतले पात्र आहे. आफ्रिकन जंगलातल्या लोकांना सुसंस्कृत करणे या उद्दिष्टाच्या उदार मुखवट्याखाली असणारे त्याचे गुन्हेगारी क्रौर्य हे त्याचे वैशिष्ट्य होते. आणखीही काही संदर्भ दिले जातात – पण ते सगळे डोक्यात न घेताही ही कविता थेट पोचते.

--- ००० ---

घोळ

हवा खराब आहे
म्हणून मी खराब आहे
मीच नसेन तर खराब हवाही नसेल
पण खराब हवा नसण्यासाठी
मी नसण्याचे प्रयत्न मलाच सातत्य देतील
हाच आहे बुद्धीचा घोळ
म्हणजेच तिची अटळ समस्या
बुद्धीने सगळे कळते हो
पण जगण्यात नाही येऊ शकत
ऍब्सर्डिटीच म्हणायची ही
--- ००० ---

फ्रँक ओ' हारा – अमेरिकन चित्रकार, लेखक, कवी – १९२६ ते १९६६ – अमूर्ततेचा आणि अतिवास्तववादाचा प्रभाव – दैनंदिन जगण्यातल्या घटना व संवाद यांनाही कवितेत वेगळेच स्थान – त्या काळातल्या कवींच्या ' न्यू यॉर्क स्कूल ' या समूहाचा नेता – एका टॅक्सीखाली सापडून त्याचा मृत्यू झाला.

उदास न्याहारी (Melancholy Breakfast)
-- फ्रँक ओ'हारा – अनु० – चं. प्र. देशपांडे.

उदास न्याहारी
वरती निळे खालती निळे
मूक अंडे विचारात
आणि टोस्टरचा वीजकान प्रतीक्षेत
चांदण्या या ओळीत --
' लपलाय तो ढग '
अविश्वासाची मूलद्रव्ये असतात
फारच जोरकस सकाळी
--- ००० ---

माझे हृदय (My heart)
-- फ्रँक ओ'हारा – अनु० – चं. प्र. देशपांडे.

सततच मी रडत नाही राहणार
ना मी सतत हसत राहणार,
यांतला कोणताही 'ताण '
मला दुसऱ्यापेक्षा आवडीचा असे काही नसते.
मला एखाद्या फालतू पिक्चरची तातडी आवडेल,
म्हणजे नुसता झोप आणणारा नव्हे, पण बडाही,
अतिखर्चिक, पहिला टप्पा टाईप. मला हवे असते
निदान ग्राम्य असण्या एवढे तरी जिवंत असणे, आणि जर
माझ्या गोंधळाचा एखादा तज्ञ म्हणाला की, " हा काही
फ्रँक नव्हे ! " फारच छान ! मी काही
सततच तपकिरी किंवा राखाडी सूट नाही वापरत,
वापरतो का ? नाहीच. मी ऑपेराला जातानाही
साधे कामावरचे शर्ट वापरतो बहुतेकदा. मला
माझे पाय अनवाणीच हवे असतात,
माझा चेहरा मला दाढी केलेलाच हवा असतो, आणि माझे हृदय –
त्याबाबत खरे तर आधी काही ठरवताच नाही येत, पण
त्यातल्या त्यात बरे हे की, माझ्या कविता खुल्या असतात.
--- ००० ---

मी चित्रकार का नाहीय (Why I Am Not A Painter)
-- फ्रँक ओ'हारा – अनु० – चं. प्र. देशपांडे.

मी चित्रकार नाहीय, मी कवी आहे
का ? खरे तर मला आवडले असते
चित्रकार असणे, पण नाहीय मी, ठीक आहे,
उदाहरणार्थ, माईक गोल्डबर्ग
हा सुरू करतोय एक चित्र. मी सहज तिथे जातो.
" बस आणि घे एखादी दारू " तो
म्हणतो. मी पितो; आम्ही पितो. मी पाहतो
वर चित्राकडे. " तू त्यात ' सार्डीन्स ' हा शब्द घेतलायस. "
" होय, त्याला तिथे होती गरज काहीतरी. "
" अच्छा. " मी जातो आणि काही दिवस जातात
आणि मी पुन्हा सहज तिथे जातो. ते चित्र
चालूच असते, आणि मी परत जातो, आणि दिवस
जात राहतात. पुन्हा मी सहज जातो. ते चित्र
पूर्ण झालेले असते. " कुठाय तो ' सार्डिन्स ' शब्द ? "
जे काय राहिलेय ते असते फक्त
अक्षरे, " ते जास्तच झाले होते, " माईक म्हणतो.
आणि मी ? एक दिवशी मी विचार करत असतो
एका रंगाचा : नारिंगी. मी लिहितो एक ओळ
नारिंगी रंगाबद्दल. अगदी लौकरच ते होते
एक पूर्ण पान शब्दांनी भरलेले, ओळी नसलेले.
नंतर आणखी एक पान. त्यात हवे असते
अजून खूप काही, नारिंगी रंगाचे नव्हे, तर
शब्दांचे, किती भयानक असतो नारिंगी
आणि जगणेही. दिवस जात राहतात. तसे
ते गद्यातही असते, मी खरा कवी आहे. माझी कविता
पूर्ण होते आणि मी उल्लेखही केलेला नसतो
अजून नारिंगीचा. त्या असतात बारा कविता, मी म्हणतो
त्यांना, नारिंगी कविता. आणि एक दिवशी एका गॅलरीत
मी पाहतो माईकचे चित्र, नाव असलेले ' सार्डिन्स '.
--- ००० ---
(सार्डिन्स नावाचे मासे असतात.)

पॉल व्हर्लेन – फ्रेंच कवी – १८४४ ते १८९६ – प्रतिमावादी – तो विषण्णतेचा बळी असून कवितेत शांतता शोधणारा होता. त्यानेच म्हटल्याप्रमाणे, तो पूर्णत्वाच्या शोधात होता.

कवितेची कला (Ars Poetica)
-- पॉल व्हर्लेन – अनु० – चं. प्र. देशपांडे.

सर्वात उच्च संगीत,
त्यातला विषमतोल महत्त्वाचा
हवेमध्ये अधिक सहज विरघळणारी अस्पष्टता
त्यात काहीच अवजड वा स्थिर नसलेली.
शब्दांची निवड नका करत बसू
दृष्टीत काही गोंधळ असल्याशिवाय :
छायांच्या कवितेइतके प्रिय काहीच नाही
जिथे अचूकता वरते अनिर्णायकतेला.
पडद्यांनी झाकलेले डोळे सुंदर असतात,
मोठा असतो तो दिवस माध्यान्ही कंप पावणारा,
तेजस्वी ताऱ्यांची निळी बेशिस्त कधीही चांगली
पानगळीच्या आकाशात, थंड, चंद्राशिवाय.
आपल्याला नेहमी हवे असतात बारकावे,
रंग नव्हे, बारकावेच सततच सारखे !
बारकावेच फक्त मिळवू शकतात
स्वप्नाशी स्वप्न, बिगुलाशी बासरी !
पळा खुनी सुभाषितांपासून,
क्रूर हुशारी आणि कलुषित विनोदापासून
असे सगळे जे उच्च निळाईच्या डोळ्यांत आणते अश्रू,
आणि टाळा तेही सगळे लसुणाचे भडक अन्न !
वक्तृत्व घ्या आणि त्याची मुंडी मुरगाळा !
तुम्ही प्रवाही असाल तेव्हाच चांगले असाल,
यमक कदाचित अधिक शहाणे योजाल.
आपण जर लक्ष नाही दिले तर ते जाईल कुठे ?
यमकाचे दोष कोण सांगणार ?
कुठल्या एखाद्या वेड्या मागासाने वा स्वरबधीर बालकाने
घडवलाय हा गुन्हा आणि हे कवडीमोल रत्न
जे कसावर खोटे पडते आणि वाजू नाही शकत खणखणीत ?
पुन्हा संगीत आणि नेहमीच संगीत !
तुमच्या कवितेची ओळ इतकी तरल आणि हलकी असावी
की असे वाटावे की आत्माच उंच विहरत तरंगतोय
नव्या नभांच्या शोधात आणि टवटवीत प्रेमिकांच्या.
तुमची ओळ असू द्या एक सर्वात नामी धाडस

पहाटेच्या तणावग्रस्त वाऱ्यावर तरंगणारे
जे जागे करत जाते सगळे सनसनाटी मामले …
बाकी सगळे आपले नुसतेच असते – साहित्य !
--- ००० ---

माझे ओळखीचे स्वप्न (Oft Do I Dream)
-- पॉल व्हर्लेन – अनु० – चं. प्र. देशपांडे.

अनेकदा मला हे स्वप्न पडते, विचित्र आणि भेदक,
एका स्त्रीचे, अज्ञात, जिच्यावर माझे प्रेम आहे आणि जिचे माझ्यावर
आणि जी कधीच, वेळोवेळी, तीच तशीच नसते,
किंवा नसते अगदीच वेगळीही : ओळखते ती मला आणि प्रेमही करते.
खरेच किती छान ओळखते ती मला आणि माझ्या हृदयाला
तिच्यासाठीच असलेल्या अधिकाधिक स्पष्टपणे, तो काही प्रश्नच नाहीय,
तिच्यासाठीच फक्त, तीच फक्त हे ओळखते, मग,
कसा निववावा माझ्या भुवईवरचा घाम तिच्या रडण्याने ?
ती काळी आहे की गोरी की तांबूस – हे मला नाही माहीत.
तिचे नाव ? मला इतकेच आठवतेय की ते चुळबुळे आणि खूप आवडणारे आहे
जशी होती इतर प्रेमाच्या व्यक्तींची ज्यांना जगण्याने हद्दपार केलेय.
तिचे डोळे तसेच आहेत जसे असावेत एखाद्या शिल्पाचे,
आणि तिच्या दूरस्थ, गंभीर, सौम्य आवाजात आहे
आभास त्या प्रेमाच्या आवाजांचा जे मृत्यू पावलेले आहेत.
--- ००० ---

जबाबदारी

उदार दगड
सुधारू पाहतात
कमी वेळात बेडकांना
स्वतः वाचलेली पुस्तके वाचा म्हणत
सांस्कृतिक कट्ट्यावर
जातात सगळे सुधारलेले सुधारक
सहिष्णुतेच्या सरावासाठी
एवढा अभ्यास केलेल्या
विद्वानांना वाटते
भूलथापांना बळी पडतात सगळे बिनडोक
सत्य समजत असल्याचा दावा करणारे
म्हणतात आम्ही बोलत नाही
कारण आम्ही बोललो की दगड हल्ला करतात
बाकी खूप बोलणारे म्हणतात
समजले पाहिजे बोलले पाहिजे
सुधारले पाहिजे
जबाबदारी न घेता
जगणे ते कसले
--- ००० ---

भूमिका आणि शोध

लेखकांनो आणि कलावंतांनो
भूमिका घ्या थोर व्हायचे असेल तर
शोध घ्या कशाचा घेणार ते आधी ठरवावे लागेल का
याचा आधी शोध घ्या भूमिका नसणे हीही एक भूमिकाच
याचप्रमाणे भूमिका असणे म्हणजे भूमिका नसणेच
असे होईल का याचाही शोध घ्या आपल्या स्वभावाने
जे सापडेल त्याला शोध म्हणता येईल का
याचाही घ्या शोध आधी पोटाची सोय हीच खरी भूमिका
शोध घेता घेता भूमिका तयार होईलच राहू द्या शोध
नुसत्या दोन दिशा सुचवा शोधाच्या तेवढे पुरे
भूमिकेचा आणि वास्तवाचा संबंधच नसतो
हे कळून घ्यावा शोध भूमिका घेतल्यावर कला मरते
त्यापेक्षा शोध घेणे हीच एक भूमिका आहे
हे का नाही पाहात जाऊ द्या शोध थांबणार नाही
आणि भूमिका बदलत राहणार हे सत्यच पाहावे
आणि शोधाच्या अस्तराशिवाय भूमिका कसली
पण भूमिका राजकीय हवी की सामाजिक
की व्यक्तिगत की सर्वसमावेशक
ते ठरवायला नको का उगीचच शोध म्हणून
भूमिका धोपटण्यात काय अर्थ आहे
त्यापेक्षा यातले कळणाऱ्याचा घेऊ आधी शोध
तो म्हणेल त्या मार्गाने जाऊ अहो याच बाबतीत
तर आहेत ना शेकडो भूमिका
आणि आपण गुरुबाजी का स्वीकारावी
गरिबी विषमता जावी एवढे पाहा म्हणजे झाले
सर्वांच्याच हिताचा शोध शक्य आहे का त्याचाही शोध घ्यावा
--- ००० ---

फिलिप लार्किन – इंग्लिश कवी – १९२२ ते १९८५ – सामान्य जगण्यातल्या दैनंदिन आणि कंटाळवाण्या तपशीलांतून कसदार आणि संस्मरणीय कविता लिहिल्या – त्या काळातली नवस्वच्छंदी – निओ-रोमँटिक – शैली नाकारणाऱ्या काहींच्या ' चळवळ ' नामक समूहाचा नेता – औदासीन्य, मर्त्यपणा, वैश्विकता, प्रेम आणि एकाकीपणा हे त्याचे कवितेचे विषय होते – जन्मभर अविवाहित राहिला – मुले जन्माला घालणे थांबवले पाहिजे यावर त्याची एक कविता आहे. " लैंगिक समागमाला सुरुवात झाली त्रेसष्ट साली ! " अशी त्याची अनेक उद्धृते प्रसिद्ध आहेत. त्याला लिंगवादी आणि वंशवादी म्हणून हेटाळणारेही काही आहेत.

शय्यासंवाद (Talking In Bed)
-- फिलिप लार्किन – अनु० – चं. प्र. देशपांडे.

शय्येतले बोलणे खरे तर सर्वात सोपे असायला हवे
एकत्र पडून असणे हे इतके असते असे की एक
प्रतीकच असते ते दोन माणसे निष्ठावान असण्याचे.
तरीही अधिकाधिक वेळ जात राहतो शांततेत.
बाहेरच्या वाऱ्याची अपूर्णतेची अस्वस्थता
वाढवते आणि पांगवते ढगांना इतस्ततः आकाशात.
आणि काळी शहरे ढिगाने जमतात क्षितिजावर.
यांतल्या कशालाच आमचे काही घेणे नसते. यांतले काहीही नाही
दाखवत की का या एकाकीपणापासून दूर असण्याच्या अद्वितीय वेळी
उलट अधिकच होते कठीण सापडणे
शब्द एकाच वेळी सत्य आणि दयार्द्र असणारे
किंवा असत्य नसणारे किंवा निर्दय नसणारे.
--- ००० ---

काल मी का पाहिले तुझे स्वप्न (Why did I dream of you last night ?)
-- फिलिप लार्किन – अनु० – चं. प्र. देशपांडे.

काल मी का पाहिले तुझे स्वप्न ?
आता सकाळ मागे ढकलतेय केस करड्या प्रकाशाने
आठवणी खाडकन परततात मुस्काड फोडल्याप्रमाणे;
उठून बसून मी पाहतो एकटक मलूल धुक्याकडे
खिडकीपल्याडच्या.
कित्येक गोष्टी ज्या गेल्यात विस्मृतीत असे मी समजत होतो
त्या परततात माझ्या मनात अधिकच विचित्र वेदनेने
-- जणू खूप पत्रे यावीत अशा एखाद्याच्या नावाने
ज्याने कित्येक वर्षांपूर्वीच सोडलेले असावे हे घर.
--- ००० ---

श्रद्धेचे उपचार (Faith Healing)
-- फिलिप लार्किन – अनु० – चं. प्र. देशपांडे.

सावकाशपणे त्या स्त्रिया रांगेत येतात तो उभा आहे तिथे
रुबाबदारपणे विनाफ्रेन चष्मा घातलेला, रुपेरी केसांचा,
काळा सूट घातलेला, शुभ्र कॉलरचा. सेवक अथकपणे
त्यांना विनवतात पुढे चलण्यासाठी त्याचा आवाज आणि हात यांच्याकडे,
ज्याच्या ऊबदार प्रेमळ आस्थेच्या उत्फुल्ल पावसात
राहता येते प्रत्येकीला सुमारे वीस सेकंद. हं, माझ्या प्रिय मुली,
काय आहे त्रास तुला, विचारतो तो खोल अमेरिकन आवाज,
आणि वाट न पाहता, जातो प्रार्थनेत
देवाला सांगत कुणाच्या डोळ्याबद्दल, कुणाच्या गुडघ्याबद्दल.
त्यांची डोकी अचानक घेतली जातात ओंजळीत; नंतर सोडली जातात.
विचार हरवल्याप्रमाणे, त्या जातात शांततेत; काही
झोपेत असल्याप्रमाणे भरकटतात, स्वतःच्या नेहमीच्या जगण्यात
न परतलेल्या अजून; पण काही राहतात ताठर गदगदत आणि फारच
भावनिक होत त्यांच्या सखोल घोगऱ्या अश्रूंनी जणू काही त्यांच्यांतले
एक प्रकारचे मुके आणि मूर्ख बालक अजून आहे जिवंत
दयेच्या स्पर्शाने पुन्हा जागे होणारे विचार करत की शेवटी
एक आवाज त्यांना एकटीला बोलावतोय, आणि ते हात आले आहेत
त्यांना सावरायला आणि हलके करायला; आणि असा आनंद येतोय
की त्यांच्या जड जिभांवरून गळतेय लाळ, डोळे पिळवटून टाकतायत दुःख,
कधी न ऐकलेल्या उत्तरांची प्रचंड गर्दी कोंदाटत आणि प्रफुल्लित होत –
काय आहे त्रास तुला ! मिशांचा आवाज – फुलाफुलांच्या फ्रॉक्समध्ये त्या
सद्गदित होतात, आतापर्यंत, सगळा त्रासच तर घडलाय, प्रत्येकीमध्ये आहे
निद्रिस्त एक भावना प्रेमाप्रमाणे जगता येण्याची.
काही जणींच्या बाबतीत तो आहे अभाव त्यांनी कुणावर प्रेम करत जगण्याचा
पण झाडून उरलेल्या सर्वजणींमधे तो आहे भाव त्यांनी काय काय केले असते
त्यांच्यावर कुणी प्रेम केले असते तर याच्या खंतीचा.
ते काहीच नाही बरे होत. एक प्रचंड गलितगात्र करणारी वेदना,
जणू पावले जड करणारी ते कडक दृश्य ढाळत असताना अश्रू,
पसरते सावकाशपणे त्यांच्यांत – ते तसे आणि उंचावरचा आवाज
प्रिय बाळ म्हणणारा, आणि काळाने सगळे खोटे ठरवलेला.
--- ००० ---

झेस्लॉ मिलोझ – पोलिश कवी – १९११ ते २०१४ – जगाचा नाश आणि हुकुमशाही राजवटी हे त्याचे चिंतनाचे विषय होते -- त्याने कविता, कादंबऱ्या आणि निबंध लिहिले – १९८० ला नोबेल पारितोषिकाने तो सन्मानित झाला – त्याच्या बऱ्याच कविता मी वाचल्या पण त्या खिश्चन श्रद्धेच्या कोंदणातल्या असल्यामुळे ' आधीच कळणे ' असे होत गेले. तरीही दोन नमूने म्हणून खालील अनुवाद देत आहे –

प्रेम (Love)
-- झेस्लॉ मिलोझ – अनु० – चं. प्र. देशपांडे.

प्रेम म्हणजे स्वतःकडे पाहायला शिकणे
लांबच्या वस्तूंकडे पाहावे तसे
कारण तुम्ही असंख्य गोष्टींतली एक गोष्ट आहात.
आणि जो कुणी असे पाहू शकतो तो निरामय करतो त्याचे हृदय
त्याची जाणीवही न होता असंख्य रोगांतून मुक्त –
एखादा पक्षी वा एखादे झाड म्हणते त्याला : मित्र.
नंतर त्याला वाटते आपला आणि वस्तूंचा करावा उपयोग
ज्यामुळे त्यांना लाभेल परिपक्वतेचे तेज.
आपण कोणती सेवा देतोय हे त्याला कळणे महत्त्वाचे नसते :
जो सर्वोत्तम सेवा देतो त्याला नेहमीच ते समजतेच असे नाही.
--- ००० ---

अर्थ (Meaning)
-- झेस्लॉ मिलोझ – अनु० – चं. प्र. देशपांडे.

मी जेव्हा मृत्यू पावेन तेव्हा मी जगाची किनार पाहीन.
दुसरी बाजू, पक्षी, डोंगर, सूर्यास्त यांच्या पलिकडची.
खरा अर्थ जगाचा उकलला जाण्यास तयार असलेला.
जे कधीच नाही जमा झालेले ते जमा होईल,
जे समजण्याच्या पलिकडे होते ते समजू शकेल.
-- आणि अशी काही किनार नसेलच जगाला तर ?
एखाद्या फांदीवरचा गाणारा पक्षी हा चिन्ह नसून
फक्त एक गाणारा पक्षीच असेल तर ? जर रात्र आणि दिवस
यांनी एकामागोमाग एक येण्यात काही योजनाच नसेल तर ?
आणि या पृथ्वीवर फक्त पृथ्वीशिवाय दुसरे काहीच नसेल तर ?
-- तसे जरी असले तरी असेलच एक शब्द
नष्ट होणाऱ्या ओठांनी जागवलेला,
एक अथक दूत जो धावत आणि धावत असेल
प्रदेशातून चांदण्यांच्या आंतर-संबंधांच्या, भ्रमण करणाऱ्या
आकाशगंगांच्या, आणि मोठ्याने उच्चारत असेल निषेध आणि किंचाळत असेल.
--- ००० ---

आधीचे

होय तेच
हे तेच आहेत मुद्दे
तिथल्या विद्वानांनी
आपापल्या टोप्या घातल्या नाहीत
म्हणून ते तिथून परागंदा झाले
आणि पुरात सापडले आणि
इतक्या लांब वाहात आल्यावर
ते इथल्या एका कासाराला सापडले
ते मजलदरमजल करत पोचले
इथल्या हॉटेलमॅनेजमेंटच्या प्राचार्यांकडे
टोप्यांच्या अभावामुळे हे घडल्याची बातमी
सगळ्या चॅनेलवर होती
त्या विचारांत धुगधुगी होती
पण तेच तसेच वापरायचे
तर पुन्हा टोप्यांचा प्रश्न आला असता
हे ओळखून ते आता वेगळ्याच रूपात
मांडायचे ठरले आणि हे आताचे रूप
क्रांतिकारक ठरणार होते
आता हे सगळे प्राचार्यांचेच मंथन
म्हणून येणार होते पण मग
आधीच्या विद्वानांच्या श्रेयाचे काय
हे विचारल्यावर प्राचार्य
कुत्सित हसून म्हणाले कोणते आधीचे
--- ००० ---

गाईचे दात

योगायोगाने गाईच्या दातांचा विषय निघाला
तिच्या जबड्यात समोर वरचे दात नसतातच
हा मुद्दा इंटरेस्टिंग ठरला
त्याच्याबद्दल आकर्षणच तयार झाले
मग त्यावरच आपण रिसर्च करावा
आणि मराठीत शोधनिबंध लिहावा
असे आपण ठरवले
हे एकमत दुतर्फी खूपच उत्तेजक ठरले
आपल्याला शेवट गाठून पदवी नकोच होती
नुसताच शोध घेत राहायचे होते
मराठीतले लेखक कवी घेतात तसा आयुष्यभर
त्यांना ते शोध कशाचा घेताहेत ते माहीतच नसते
त्यामुळे त्यांचा शोध कधी संपतच नाही
आपण कशाचा शोध घेतोय
हे आपल्याला पहिल्या क्षणापासून माहीत होते
म्हणून आपलाही शोध कधीच नाही संपणार
नुसते गाईचे खालचे दात एवढा संकेतशब्दसमूह
बास असतो आपल्याला प्रत्येक वेळी मग
शोध पूर्ण केल्याशिवाय समाधानच नाही होत
आपले त्यामुळे आपण आपला हा शाकाहारी खुराक
सतत चालू ठेवतो यावरच्या विनोदांना मात्र सगळे
मांसाहारी विनोद म्हणतात म्हणजेच
नॉन-व्हेज ज्योक्स समजले ना
--- ००० ---

लॉरेन्स फर्लिंघेट्टी – अमेरिकन कवी, नाटककार, चित्रकार – जन्म १९१९ – कविता ही फक्त हुशार अकादेमिक लोकांसाठी न राहता ती सर्वांसाठी असावी, असे त्याचे मत होते – उपरोध आणि विनोद ही त्याची वैशेष्ट्ये दिसतात. त्याच्या दोन साळढाळ कवितांचे अनुवाद देतोय –

कुत्रा (Dog)
-- लॉरेन्स फर्लिंघेट्टी – अनु० चं. प्र. देशपांडे.

कुत्रा दुडकतो मुक्तपणे रस्त्यात
आणि पाहतो वास्तव
आणि तो ज्या गोष्टी पाहतो
त्या असतात त्याच्याहून मोठ्या
आणि तो ज्या गोष्टी पाहतो
तेच असते त्याचे वास्तव
दारादारांतून बेवडे
झाडांवरचे चंद्र
कुत्रा दुडकतो मुक्तपणे रस्त्यातून आरपार
आणि तो ज्या गोष्टी पाहतो
त्या त्याच्याहून असतात लहान
मासे वा रद्दीचे कागद
भोकांतल्या मुंग्या
चायनाटाऊन खिडक्यांतल्या कोंबड्या
अंतराअंतरावर त्यांची मुंडकी
कुत्रा दुडकतो मुक्तपणे रस्त्यात
साठलेल्या पाण्याचे खड्डे आणि पोरे ओलांडत
मांजरे आणि सिगार्स
बिलियर्डचे हॉल्स आणि पोलीस
तो द्वेष नाही करत पोलिसांचा
त्याचा त्यांना काही उपयोग नसतो एवढेच
आणि तो त्यांना ओलांडून पुढे जातो
आणि वर टांगलेल्या सॅन फ्रान्सिस्कोच्या
मटण मार्केटातल्या मेलेल्या पूर्ण बोकडांना ओलांडून
त्याला बोकडाचे मऊ मास आवडेल खायला
राकट पोलिसापेक्षा
आणि तसे तर दोन्हींतले काहीही चालेल
आणि आता तो रोमियो फॅक्टरीवरून पुढे जातो
आणि कोईट स्तंभावरून पुढे मग डॉयल काँग्रसवाल्यावरून
तो कोईय स्तंभाला घाबरतो
पण तो डॉयल काँग्रेसवाल्याला नाही घाबरत जरी
त्याच्याबद्दल जे कानावर येते ते फारच निरुत्साही करणारे

असते विषण्ण करणारे असते
बिनडोकपणाचेही
त्याच्यासारख्या तरुण दुःखी कुत्र्याच्या दृष्टीने
त्याच्यासारख्या गंभीर कुत्र्याच्याही दृष्टीने
पण त्याला त्याचे स्वतःचे असे एक स्वतंत्र जग असते
खाण्यासाठी त्याच्या स्वतःच्या अशा माशा
त्याला कुणी प्रतिबंध नाही करणार
डॉयल काँग्रेसवाला हा फक्त
आणखी एक अग्निशामक नळकांडा असतो
त्याच्यासाठी
कुत्रा दुडकतो मुक्तपणे रस्त्यात
आणि त्याला जगायला स्वतःचे असे कुत्र्याचे जगणे असते
आणि त्याचा विचार करायला
आणि त्यावर चिंतन करायलाही
स्पर्श करत चव घेत पडताळत सगळेच
कसून शोध घेत सगळ्याचा
बनावटपणाच्या फायद्याची गरज नसलेले
एक खरा वास्तवतावादी
सांगायला एक खरी गोष्ट असलेला
आणि जिच्या मदतीने ती सांगावी अशी शेपूट असलेला
एक खरोखरचा जिवंत
भुंकणारा
लोकशाहीवादी कुत्रा
गुंतलेला खरोखरच्या
खुल्या उद्योगधंद्यात
जवळ सांगण्यासारखे काही असलेला
वास्तवाबद्दल
आणि ते कसे पाहावे याबद्दल
आणि ते कसे ऐकावे याबद्दल
त्याचे डोके कलणारे इकडेतिकडे
रस्त्याच्या कानाकोपऱ्यात
जणू काही तो लगेचच काढून घेणार आहे
स्वतःचा फोटो
व्हिक्टर रेकॉर्डसाठी
तंद्रीत ऐकत
त्याच्या मालकाचा आवाज
आणि पाहात
एखाद्या जिवंत प्रश्नचिन्हाप्रमाणे
त्या अद्वितीय

महान ग्रामोफोनमध्ये
गोंधळात पाडणाऱ्या अस्तित्वाच्या
त्याच्या चकित करणाऱ्या कर्ण्यासह
जो नेहमीच वाटतो असा
की आता एवढ्यातच हा
उडवेल बाहेर जोरात फवारत
काही विजयी उत्तर
सर्वच बाबतीत
--- ००० ---

अंडरवेयर (Underwear)
-- लॉरेन्स फर्लिंघेट्टी – अनु० चं. प्र. देशपांडे.

काल रात्री मला फारशी झोप लागली नाही
अंडरवेयरच्या विचारात
तुम्ही कधीतरी थांबवलेयत का अंडरवेयरचा
विचार करणे अमूर्तात
तुम्ही खरोखर जेव्हा खणता ना त्यात
तेव्हा धक्कादायक प्रश्न समोर येतात
अंडरवेयरशी आपल्याला प्रत्येकालाच सामना करावा लागतो
प्रत्येकजण परिधान करतो
कोणत्या ना कोणत्या प्रकारची अंडरवेयर
अगदी क्यूबन असोत की इंडियन लोकसुद्धा
अंडरवेयर वापरतात
पोपलासुद्धा मोप गरज असते तिची
लुशियानाचा गव्हर्नर घ्या त्यालाही ती लागतेच
मी पाहिलेय त्याला टीव्हीवर
त्याची अंडरवेयर खूप टाईट असणार
तो सारखा चुळबुळत होता
अंडरवेयर तुम्हाला खरोखर अडचणीत आणू शकते
तुम्ही जाहिराती पाहिल्या असतीलच अंडरवेयरच्या
स्त्रियांच्या आणि पुरुषांच्या
किती एकसारख्या आणि तरीही किती वेगवेगळ्या
स्त्रियांच्या अंडरवेयर वस्तू वर धरतात
पुरुषांच्या अंडरवेयर वस्तू खाली धरतात
अंडरवेयर ही एक गोष्ट अशी आहे
की स्त्रिया आणि पुरुष दोघांनाही लागतेच
अंडरवेयरच तर आहे जी आपल्या दोघांतही आहे समान
तुम्ही ती तिरंगी चित्रे पाहिली असतील ना

जांघांना घातलेली वेढे
अधिक मजबुतीचे भाग दाखवणारे
मोकळ्या हालचालींची ग्वाही देणारे
फसू नका
ते सगळे बेतलेले असते द्विपक्षीय व्यवस्थेवर
जी फारसे स्वातंत्र्य नाही देत निवडीचे
गोष्टी कशा रचलेल्या आहेत ते पाहिले तर
अमेरिकेचा रात्रभर चालू असतो झगडा
तिच्या अंडरवेयरशी
शेवटी अंडरवेयरच कब्जा करते सर्व गोष्टींवर
शरीराला आकार देणारे कपडे घ्या उदाहरणार्थ
खरे तर त्या असतात मुळात फॅसिस्ट रचना
भूमिगत शासनाच्या
लोकांना विश्वास ठेवायला भाग पाडणाऱ्या
सत्य सोडून कशावरही
तुम्ही काय करू शकता आणि काय नाही हे सांगणाऱ्या
तुम्ही कधी कमरपट्टा पाहिलाय का वापरून
कदाचित अहिंसक कृतीचे महत्त्व
हेच असेल एकमेव उत्तर होकार वा नकारासाठी
गांधींनी वापरला होता का कमरपट्टा ?
लेडी मॅक्बेथने वापरला होता का कमरपट्टा ?
त्याच कारणाने मॅक्बेथने झोपेचा खून केला का ?
आणि ती सारखे जिथे घासत होती
ती वस्तुतः तिची अंडरवेयरच होती का ?
आधुनिक अँग्लोसॅक्सन स्त्रियांमध्ये
एक प्रचंड अपराधी भाव असणार आहे
तीच डागाची जागा
सतत धुवत धुवत आणि धुवत असतात
डागयुक्त अंडरवेयर फारच संशयास्पद
फुगवटेयुक्त अंडरवेयर फारच धक्कादायक
वाळत टाकलेल्या अंडरवेयर तर निशाणच असतात स्वातंत्र्याचे
अंडरवेयरमधून कुणी मुक्त झाला असावा
कुठेतरी नग्न अवस्थेत
धावा धावा !
पण काळजी नका करू
प्रत्येकजण अजूनही तीत बद्ध आहे
तशी खरी क्रांतिबिंती होणारच नाहीय
कविता अजूनही आत्म्याची अंडरवेयर आहे
आणि अंडरवेयर अजूनही झाकते

असंख्य दोष
भूशास्त्रीय दृष्टिकोणातून
विचित्र क्षारांचे दगड, न दिसणाऱ्या भेगा !
तुमच्या ठिकाणी मी असेन तर मी बाजूला तयारच ठेवेन
एक गरजेहून मोठ्या आकाराची अंडरवेयरची हिवाळी जोडी
तशा रात्री नंगे नका राहू
आणि दरम्यानच्या काळात
शांत ऊबदार आणि कोरडे राहा
काही घडायच्या आधीच स्वतःची चाळवाचाळव
करून उपयोग नाही ' उगीचच '
जाकिटात हात घालून प्रतिष्ठितपणे पुढे व्हा
भावनिक नका होऊ
आणि मृत्यूला एवढ्यात वाव नाही मिळणार
अजून खूप वेळ आहे मित्रांनो
अजून आपण तरुण आणि निश्चितच आहोत ना ?
ओरडू नका.
--- ००० ---

Clyde Gilman Doyle हा तिकडचा कुणी राजकारणी होता -- त्याचा हा उल्लेख आहे, अशी माहिती नेटवर मिळते –
लुईझी ग्लक – अमेरिकन स्त्री-कवी – जन्म १९४३ –अमेरिकेतल्या समकालीन कवितेत ही महत्त्वाची समजली जाते – एकाकीपणा, दुरावा, मृत्यू हे तिच्या चिंतनाचे प्रमुख विषय असतात – यंदाचे म्हणजे २०२० चे नोबेल पारितोषिक देऊन तिला सन्मानित करण्यात आलेले आहे. तिच्या दोन कविता --

बंधकांची बोधकथा (Parable of Hostages)
-- लुईझी ग्लक – अनु० – चं. प्र. देशपांडे.

(ट्रॉय मध्ये लढत असलेल्या ग्रीक सैनिकांचे हे विचार आहेत – ही कविता समजायला त्या युद्धाची पूर्ण कथा माहीत असायची गरज नाही – ट्रॉय आणि इथाका मधले अंतर फक्त २३२ किमी आहे, एवढी माहिती पुरे.)
ग्रीक सैनिक बसलेले आहेत समुद्रकिनाऱ्यावर
विचार करत की युद्ध संपल्यावर करायचे काय. एकालाही
आपल्या घरी परतायचे नाहीय
बोनी बेटावरच्या; प्रत्येकाला आणखी हवेय
जे ट्रॉयमध्ये मिळतेय ते
निकराचे जगणे, जाणीव प्रत्येक दिवस असल्याची
अनपेक्षिततेने भरलेला. पण कसे समजावणार हे
घरी असलेल्यांना कारण युद्ध लढणे हे असू शकते
एक स्वीकार्य समर्थन घरी नसण्याचे, पण
जगण्याचा मार्ग बदलण्याचा शोध घेण्याचे सामर्थ्य
हे नाही. पण ठीक आहे, याला सामोरे जाता येईल
नंतर; ही माणसे आहेत
कृतीवर भर देणारी, मर्मदृष्टी वगैरे सोडून द्यायला
तयार असलेली बायकामुलांवर.
स्वच्छ उन्हात हे विचार करत, आनंदित झालेले
बाहूंत संचारलेल्या नव्या शक्तीच्या जाणिवेने, जी
वाटत होती अधिक सोनेरी घरी असण्यापेक्षा, तरीही, काहींना मात्र
कुटुंबापासूनचा दुरावा संपावा असे काहीसे वाटू लागलेले,
आपल्या बायकांना भेटावे, आणि हेही पाहावे की
या युद्धाने आपले वय तर वाढवलेले नाहीय. आणि काहीजण
झालेले काहीसे अस्वस्थ : युद्ध हे जर जामानिमा करण्याची
नुसतीच एक पुरुषी तऱ्हा असेल तर, एक असा खेळ असेल तर
योजलेला सखोल आध्यात्मिक प्रश्न टाळण्यासाठी ? होय,
पण ते काही फक्त युद्धामुळेच नाही होत. जग तर त्यांना
असे म्हणू लागले होते की ते म्हणजे युद्धाच्या प्रचंड
झणात्कारांनी सुरू होणारा आणि भोंग्यांच्या भरदार पदाने संपणारा ऑपेरा आहेत.
त्या किनाऱ्यावर चर्चा करताना घरी पोचण्यासाठी लागणाऱ्या दिवसांबाबत
हेच होते प्रत्येकाच्या मनात – दहा वर्षे थोडीच लागणार आहेत इथाकाला परतायला;
कुणालाच तो काळ निराकरणहीन समस्यांचा वाटत नव्हता – अरेरे, हे निरुत्तर करणारे
मानवी हृदयाचे दुःखमूळ : कसे विभागावे जगाचे सौंदर्य स्वीकार्य
आणि अस्वीकार्य हवेपणात ! ट्रॉयच्या किनाऱ्यावर,
कसे कळणार त्या ग्रीकांना की ते बंधक झालेलेच आहेत : जो कुणी एकदा
प्रवास करणे लांबवेल तो पडलेलाच असेल मोहात; कसे कळणार होते त्यांना
की त्यांच्या छोट्या संख्येतले

काहीजण कायमचे पकडले जातील सुखाच्या स्वप्नांनी,
काहीजण निद्रेने आणि काही गाणेबजावण्याने ?
--- ००० ---

" मी विश्वासार्ह नाही " (The Untrustworthy Speaker)
-- लुईझी ग्लक – अनु० – चं. प्र. देशपांडे.

माझे नका ऐकू; माझे हृदत भंगलेले आहे.
कुठलीही गोष्ट मला आहे तशी पाहता नाही येत.
मी ओळखते स्वतःला; मी शिकून घेतलेय मानसोपचारतज्ञाप्रमाणे ऐकणे.
मी जेव्हा खूप भावनिक तीव्रतेने बोलते,
त्या वेळी मी मुळीच विश्वासार्ह नसते.
ते खरोखर दुःखद आहे : आयुष्यभर मी वाखाणली गेलेय
माझ्या बुद्धिमत्तेसाठी, माझ्या भाषाप्रभुत्वासाठी आणि मर्मदृष्टीसाठी.
आणि शेवटी ते सगळेच वाया गेलेय –
माझे स्वतःकडे लक्षच नसते जेव्हा
मी उभी असते दर्शनी पायऱ्यांवर, माझ्या बहिणीचा हात धरून तेव्हा.
त्यामुळेच मला नाही काही सांगता येत
बाहीच्या बाहेरच्या तिच्या हातावरच्या जखमांबद्दल.
माझ्या स्वतःच्या मनात मी अदृश्यच असते : त्यामुळेच मी धोक्याची असते.
निःस्वार्थी दिसणाऱ्या लोकांना मी चांगली वाटते,
पण आम्ही पांगळे आहोत, खोटारडे आहोत;
आम्ही असे आहोत की आम्हाला वगळूनच टाकायला हवे
सत्याच्या रक्षणासाठी.
मी जेव्हा शांत असते तेव्हाच सत्य समोर येते.
स्वच्छ आकाश, शुभ्र कापसासारखे ढग.
आणि खाली छोटेसे एक राखाडी रंगाचे घर, जांभळे
लाल आणि उजळ गुलाबी असे.
तुम्हाला जर सत्य हवे असेल तर डावलावे लागेल तुम्हाला
त्या जुन्या मुलीला, बंदच करून टाकावे लागेल तिला :
एखादी जिवंत गोष्ट जेव्हा अशी जखमी झालेली असते,
तेव्हा तिची अत्यंत खोलातली कार्यकलापांची यंत्रणा
सगळी बदलून गेलेली असते.
त्यामुळेच मी विश्वासार्ह नाहीय
कारण हृदयावरचा घाव म्हणजे
मनाला झालेली जखमही असते.
--- ००० ---

उनाड

स्वप्नातले कावळे
गोरे की काळे
ते आठवत नव्हते
म्हणून उनाड
इतिहासाला हाताशी धरले
श्राद्धालाही तलवार
घेऊन येणारे
आमचे मूर्ख पूर्वज
सदोदित स्फूर्ती देणे
हे त्यांचे कामच असल्याप्रमाणे
शाळेच्या फळ्यावर
खडूने लिहीत
नाश्ता करून मगच जा युद्धावर
पराक्रमांच्या व्याख्या
बदलल्या तरी
आम्ही तुतारीप्रेमीच राहिलो
आम्हाला कायमच स्वप्ने पडत
राहिली काहीतरी हरवल्याची
खूप मोठी संख्या असल्याने
प्रचंड आत्मविश्वास होता लढाऊ
पागोटी गहाण ठेवून तळहातावर शिर
अशीही तयारी होती
पण युद्धमैदान कोणते हेच कळत नव्हते
--- ००० ---

जगणे

तुझ्या घराजवळची लाँड्री डिलक्स आहे
त्यामुळे खूप महाग आहे म्हणून तू
जात असतोस लांबच्या लाँड्रीकडे, इतके बारीक
लक्ष असते लोकांचे तुझ्याकडे आणि तुला मात्र
अझरबैजान-आर्मेनिया यांच्यांतल्या संघर्षाचे मूळ
माहीत नसावे ? आपण जगतो ज्या जगात
त्याची माहिती नको ? मग आपल्या फायद्याचे काय
हे समजून बाजू कशी घेणार ? सुशांत केसचे धागेदोरे,
बलात्कार आणि हत्यांच्या केसेस यांची माहिती नको ?
जीएसटीचे नेमके काय आहेत प्रश्न, जीडीपी म्हणजे काय मुळात,
तो किती खाली जाऊ शकतो, त्याचे परिणाम, निर्यातबंदीचे
परिणाम, खुल्या विक्रीची अवस्था, कोण कुणात भेद माजवतेय,
तंत्रज्ञानाच्या कुशल वापराने जनतेची मते कशी ' बनवता ' येतात,
साहित्य, कला क्षेत्रांत कसे आहेत जागतिक वारे, प्रचंड
बेरोजगारी झाली तर पोसणार कसे सगळ्यांना, रोबो
कोणकोणती कामे करतील, नॅनो म्हणजे काय, कोरोनावर
किती लसी तयार आहेत, आहे का त्यांचा उपयोग, मानसिक
रोग का वाढताहेत, स्त्री-पुरुष संबंध अहिंसक होण्यासाठी काय
करायला हवे, सगळ्यांना न्याय असू शकतो का, तीनशे सत्तर
चांगले की वाईट, युद्ध होण्याची शक्यता कितपत आहे, यंदा
एसएससीच्या परीक्षा होणार का वेळेवर, थियेटर्स कधी सुरू होणार,
निम्म्या संख्येने म्हटल्यावर परवडतील का, मराठी साहित्य
जागतिक का नाही होत, मार्क्सवाद अजून जिवंत आहे का,
सत्तेचा गैरवापर म्हणजे काय, मादक द्रव्ये किती प्रकारची असतात,
कशी घेतात, परिणाम काय कसे किती होतात – असे खूप ----
माहिती भरत राहा डोक्यात – दुसरे काय नाही तर जगणे म्हणजे ?
--- ००० ---

ई. ई. कमिंग्ज –अमेरिकन कवी, कादंबरीकार, नाटककार आणि चित्रकार – १८९४ ते १९६२ – कवितेचा घाट आणि भाषा यांबाबत त्याने केलेले प्रयोग विशेष लक्षणीय समजले जातात – त्याच्या प्रेमकविताही विशेष प्रसिद्ध आहेत.
(उलट्यापालट्या भाषेच्या अनुवादाचा योग्य म्हणून मान्यच करावा / वे लागणारा / रे अनुवाद --)

तुझे घरी परतणे (your homecoming will be my homecoming)
-- ई. ई. कमिंग्ज – अनु० – चं. प्र. देशपांडे.

तुझे घरी परतणे माझे घरी परतणे असेल –
माझे मी जातात तुझ्याबरोबर, फक्त मी उरतो;
एक सावली भूत पुतळा वा वाटत असलेले
(एक सुमारे कुणितरी नेहमीच कुणीच नसणारा)
एक कुणीच नसणारा जो, तुमच्या आणि त्यांच्या परतण्यापर्यंत
व्यय करतो सातत्याचा त्याच्या एकाकीपणाच्या
स्वप्नात पाहात त्यांचे डोळे उघडलेले तुझ्या सकाळीकडे
जाणवत की त्यांचे तारे उगवलेत तुझ्या खूप आकाशांतून :
तर किती दयार्द्र प्रेमाचे स्वतःचे नाव, ताटकळत
न राहता याहून जास्त आत्महीन मीच्या सहनशक्तीपलिकडे
तो क्षणच अस्तित्वात नसणे जेव्हा एक अनोळखी माणूस
घेतो त्याच्या बाहूंत माझे प्रत्यक्ष जगणे कुणाचे तुझे
-- जेव्हा सगळ्या भीती आशा श्रद्धा शंका दिसेनाशा होतात,
सगळीकडे आणि आनंदाची संपूर्ण समग्रता आम्ही आहोत
--- ००० ---

ज्या अर्थी स्वातंत्र्य असते एक नाश्ताान्न (As freedom is a breakfastfood)
-- ई. ई. कमिंग्ज – अनु० – चं. प्र. देशपांडे.

ज्या अर्थी स्वातंत्र्य असते एक नाश्ताान्न
किंवा सत्य राहू शकते बरोबर आणि चूक यांच्याबरोबर
किंवा डोंगरांपासून घडवली जातात वारुळे
-- पुरेसे लांब आणि अगदी योग्य लांबवर
दिसण्याचे भाडे असणारे देईल
आणि प्रज्ञावान तोषवतील हुशारटोळी
आणि पाणी करेल आत्यंतिक प्रोत्साहित ज्वाळेला
ज्या अर्थी टोप्यांचे रॅक उगवतात पीचच्या झाडांमध्ये
किंवा आशा करतात सर्वोत्तम नृत्य टक्कलवाल्यांच्या केसांत
आणि प्रत्येक बोट आहे एक अंगठा
आणि कोणतेही धाडस आहे एक भय
-- पुरेसे लांब आणि अगदी योग्य लांबवर
सर्व काही शुद्धच समजतील सर्व अशुद्ध लोक

आणि मुलांनी दंश केलेल्या गांधीलमाशा रडतील ओक्साबोक्षी
किंवा ज्या अर्थी बघणारे आहेत अंधळे
आणि रॉबिन पक्षी कधीच नाही करत वसंताचे स्वागत
ना फ्लॅटफोक संगीत सिद्ध करते त्यांचे जग गोल असल्याचे
ना मूर्ख माणसे मृत्यू पावतात त्यांचे बिंग फुटल्याने
आणि सामान्याचे क्वचितच आणि दगडी जाती तरंगतात
-- पुरेसे लांब आणि अगदी योग्य लांबवर
उद्या म्हणजे काही फार उशीर नाही होणार
किडे म्हणजे हे शब्द आहेत पण सर्व आनंद आवाज आहेत
खाली जाईल जे आणि वर येईल जो
स्तन हे स्तन असतील आणि मांड्या म्हणजे मांड्या
स्वप्ने काय करू शकतात याची स्वप्ने कृत्ये नाही पाहू शकत
-- काळ हे एक झाड आहे (हे आयुष्य एक पान)
पण प्रेम म्हणजे हे आकाश आहे आणि मी तुझ्यासाठी आहे
-- पुरेसे लांब आणि अगदी योग्य लांबवर
--- ००० ---

आदरणीय महिले (Lady, I will touch you with my mind)
-- ई. ई. कमिंग्ज – अनु० – चं. प्र. देशपांडे.

हे आदरणीय महिले
मी तुला माझ्या मनाने स्पर्श करेन.
स्पर्श करेन आणि स्पर्श आणि स्पर्श
जोवर अचानक तू देत नाहीस एक स्मित,
लाजत अश्लील
(महिले मी तुला स्पर्श करेन माझ्या मनाने)
स्पर्श करेन, बास एवढेच,
हळुवारपणे आणि तू आत्यंतिक होशील
अमर्याद काळजीपूर्वक
माझी कविता जी मी लिहिणार नाही.
--- ००० ---
(कमिंग्जच्या कवितांचे अनुवाद ही एक अवघड बाब आहे – त्याच्या शैलीचा मराठी वाचकांना फील यावा, असा प्रयत्न केलेला आहे. त्याच्या अति-प्रायोगिक कविता इथे घेतलेल्या नाहीत. तरीही, अनुवादकाने नम्रपणा जाहीर करणे आवश्यकच !)
--- ००० ---

प्रॉडक्ट

" आपण बोललो ते सगळे
फ्रान्समधल्या व्यक्तींबद्दल होते ना ? "
" होय – "
" पण समजा ते सगळे
आपल्याबद्दलच होते
असे आपण समजलो तर ? "
" तसे समजणे
हा बायप्रॉडक्ट असेल – "
" त्यामुळे आपले
अधिकच जवळ येणे घडले तर ? "
" तर – तर – "
" तो बायप्रॉडक्ट हाच
मेन प्रॉडक्ट होईल ? ! – "
" मला नाही कळत – "
--- ००० ---

तीन अतिवास्तववादी प्रेमकविता

ब्रालियो अरेनास – चिलियन कवी आणि लेखक – १९१३ ते १९८८ –

किती किती चंद्र (So Many Moons)
-- ब्रालियो अरेनास – अनु० – चं. प्र. देशपांडे.

किती किती चंद्र आले आणि गेले
किती किती पट्टे आणि किती किती वाघ
आणि झोपायला मस्त उंची हॉटेल
स्वप्ने आणि आणखी स्वप्ने चुंबने आणि आणखी चुंबने
राहील काय शिल्लक या इतक्या चंद्रातले
राहील काय शिल्लक इतक्या पाण्यातले इतक्या तहानेतले
पेयाच्या इतक्या पात्रातले
ही खिडकी तुझ्यासाठीच नियत आहे
त्यामुळे तू तिच्यावर अधिकच पूर्णतेने विसंबू शकतेस
तू तुझ्या सौंदर्याचे ते घडवतेस
जे इतर कुणी घडवतात आकाशाचे
--- ००० ---

फ्रेडरिको गार्सिया लोर्का – स्पॅनिश कवी, नाटककार, दिग्दर्शक – १८९८ ते १९३६ –

पहाट (Dawn)
-- फ्रेडरिको गार्सिया लोर्का – अनु० – चं. प्र. देशपांडे.

न्यूयॉर्कमधल्या पहाटेला
घाणीचे चार स्तंभ आहेत
आणि काळ्या कबूतरांचे चक्रीवादळ
फडफडणारे सडक्या पाण्यात.
न्यूयॉर्कची पहाट विव्हळते
प्रचंड जिन्यांवरून
शोधत प्रत्येक दोन कोपऱ्यांमधून
चित्रित मनस्तापाची जटामांसी
पहाट येऊन पोचते पण कुणीच नाही स्वीकारत तिला त्याच्या तोंडात
कारण ना पहाट शक्य असते ना आशा :
कधी कधी तर भयानकपणे झुंडीने घोंघावत येणारी नाणी
छिद्रे पाडून गिळंकृत करतात टाकलेल्या मुलांना.
आधी उठणाऱ्यांना कळते त्यांच्या हाडांतून
तिथे ना स्वर्ग असणार आहे ना पर्णहीन प्रेमिक :

त्यांना आकड्यांची घाण माहीत असते आणि कायदे त्यांची वाटच पाहात असतात,
साध्याभोळ्या खेळांचे आणि निष्फळ परिश्रमांचे.
उजेड गाडला गेलेला असतो साखळ्या आणि आवाजांनी
बेमुर्वतपणे आव्हान देत पायाहीन विज्ञानाला.
निद्रानाशाचे रोगी लटपटतात प्रत्येक मुलुखाच्या अवतीभवती
रक्ताच्या बोटफुटीतल्या निर्वासितांप्रमाणे.
--- ००० ---

सेझार मोरो -- फ्रेंचमध्ये लिहिणारा पेरूचा कवी आणि चित्रकार – १९०३ ते १९५६ –

सचित्र जग (The Illustrated World)
-- सेझार मोरो – अनु० – चं. प्र. देशपांडे.

अगदी तुझ्या अस्तित्वहीन खिडकीप्रमाणे
एखाद्या वेताळयंत्रात पडलेल्या हाताच्या सावली प्रमाणे
अगदी तुझ्या धमन्यांप्रमाणेच आणि तुझ्या रक्ताच्या आत्यंतिक प्रवासाप्रमाणे
त्याच समानतेसह मौलिक सातत्याच्या
मला तुझ्या अस्तित्वाची अप्रतिम ग्वाही देणाऱ्या
काही अंतरावर
त्या अंतरात
असूनही ते अंतर
तुझ्या हातासह आणि चेहऱ्यासह
आणि तुझ्या पूर्ण उपस्थितीसह माझे डोळे न मिटता
आणि हे निसर्गदृश्य उगवतेय तुझ्या उपस्थितीतून
जेव्हा हे शहर होतेय, ते जे असू शकणार होते तेच,
अत्यंत निरुपयोगी प्रतिबिंब तुझ्या कत्तलखान्याचे
पक्ष्याचे पंख जरा अधिक ओलसर करण्यासाठी
पाऊस पडतोय खूप दूरवरून
आणि मिटवून टाकतोय तो मला तुझ्यात माझा मी पूर्णपणे
तुझ्यात आणि तुझ्यापासून खूप दूरवर
एखाद्या रस्याप्रमाणे दुसऱ्याच खंडात दिसेनासा होणाऱ्या
--- ००० ---

मी तुला अनेकदा

मी तुला अनेकदा सांगितले
मला तुझे आयुष्य जगायचे नाहीय
माझेच ठीक आहे ते कसेही
असले तरी बारा गावचे निरर्थक
तुझे पॉश संताप मला झेपणार नाहीत
लघवीच्या जागा ठरलेल्या
असण्याची मला सवय नाहीय
हेवा वाटतोच मला नो डाऊट तुझा
तुझे कपडे पाहूनही माझे विचार
एक तर थरथरतात किंवा गारठतात
नेमका त्याच वेळी तू सिगरेट ओढत
असलास तरी मला ती ऊब नाही मिळत
इतक्या प्रेयस्या असणे म्हणजे
किती ही प्रतारणा असे विचार
करत मी मत्सरग्रस्त होतो
जरी मी स्त्रियांचीच बाजू घेऊन
तुझ्याच हातात निखारे ठेवायला
उत्सुक असतो
चांगले वागणे म्हणजे काय
हे माझे ठरलेले असले तरी
त्याविरुद्ध वागायला माझी ना नसते
पण गुप्त राहायला हवी माझी टूथपेस्ट
तुझ्या ऐवजी मी असणे मला चालू शकेल
--- ००० ---

हान शान या, सातव्या शतकातल्या चिनी बुद्धिस्ट संन्याशाची कविता –

समजण्याचा मार्ग
-- हान शान – अनु० – चं. प्र. देशपांडे.

एकदा मी या थंड डोंगरावर बसण्यासाठी आलो
आणि मग इथेच रेंगाळलो तीस वर्षे.
काल मी गेलो होतो माझ्या काही नातेवाईकांना आणि मित्रांना भेटायला;
निम्म्याहून अधिक गेले होते पीतवसंताकडे.
हळूहळू जगणे पुसटत जाते विझत्या दिव्याप्रमाणे,
जात राहते पुढे पुढे कधीच न विसावणाऱ्या नदीप्रमाणे.
या सकाळी मी सामोरा जातोय माझ्या एकाकी सावलीला
आणि मला कळायच्या आत ती प्रवाह फाडून टाकते.
आज मी बसलो या डोंगराच्या शिखरापुढे,
खूप वेळ बसलो सगळे धुके विरून जाईपर्यंत.
एकच धागा, हा स्वच्छ प्रवाह वाहतो थंडगार;
काही हजार फुटांवर हिरवी शिखरे उंचावतात त्यांची मस्तके.
पांढरे शुभ्र ढग – सकाळचा प्रकाश आहे निश्चल;
चंद्रोदय – निशादीप चढतो हळू हळू वर वर;
शरीर आहे धूळ आणि डाग यांच्यापासून मुक्त,
कोणत्या चिंताकाळज्या माझ्या मनाला त्रास देऊ शकतील ?
स्वच्छ पाणी चमकते स्फटिकाप्रमाणे,
तुम्ही सहज पाहू शकता त्यातून अगदी तळापर्यंत.
माझे मन कोणत्याही विचारापासून मुक्त आहे,
त्याच्या असंख्य राज्यांतले काहीच त्याला विचलित नाही करू शकत.
आता तसे ते बेलगामपणे उद्दीपित होऊ शकत नसल्याने,
सतत आणि कायमचेच ते स्थिर राहील.
तुम्हाला या मार्गाने समजून घेणे जेव्हा कळेल
तेव्हा तुम्हाला दिसेल की आता ना आत आहे ना बाहेर !
--- ००० ---

जपानच्या बाशो चा एक हायकू – मी अनुवादित केलेला --

मूळ –

Old pond
A frog jumps in –
The sound of water

या पाँडला तलाव म्हणणार की तळे की डबके ? अनेकांनी अनेक प्रकार केलेले दिसतात. त्यावर पुढे सगळा अन्वय ठरतो. काहींच्या मते पाँड म्हणजे अविचल शांत सत्य. माझ्या मते मग त्याला ओल्ड नसते म्हटले. काहींच्या मते बेडकाने त्यात उडी मारल्यावर पाण्याचा आवाज होणे म्हणजे ज्ञानाचा क्षण. मी हे माणसाच्या मनाचे चित्रण समजतो. त्यामुळे, ओल्ड – ' जुने ' हे विशेषण योग्य ठरते. ते मन जवळ जवळ डेड आहे – मृत आहे. बेडकाने त्यात उडी मारण्याची एक किरकोळ घटना घडते आणि त्या जुन्या पाण्याच्या खळबळीचा आवाज होतो. म्हणून मी त्याला डबके म्हणणार –

जुने डबके
उडी मारतो त्यात एक बेडूक –
त्यामुळे पाण्याचा आवाज

(the sound आहे, हे लक्षात घेऊन ' त्यामुळे ' योग्य आहे.)
आता काहीजण बेडकाने उडी मारल्याच्या छोट्या घटनेचे निमित्त होऊन ' ज्ञानाच्या ' पाण्याचा आवाज ऐकू येणे, असेही घेऊ शकतील. झेन हायकू गूढतेने परिपूर्ण असतात. तुम्ही घट्ट मतांचे बुद्धिप्रामाण्यवादी नसाल तर त्यांचे अर्थ समजून घ्यायचा प्रयत्न करणे प्रचंड इंटरेस्टिंग होऊ शकते. अपरिहार्यपणे मनाचे जुने डबके घेऊनच जगायचे असते असा ज्यांचा पक्का निष्कर्ष ठरलेला आहे त्यांना या हायकूंचे काही विशेष वाटणार नाही. या काही उगीच बसल्या बसल्या लिहिलेल्या निरुद्योगी काल्पनिक शब्दांचे फुलोरे उडवणाऱ्या कविता नाहीत.
--- ००० ---

तसे काही आहे का

मूळ रंगांसारखे कुठे असतात मूळ शब्द
रेषा थरथरताना दिसते
तसे शब्द थोडेच उघडे पडतात
कवितेत शब्दांचा समतोलपणा कसला
शब्दांना ना पोत ना शब्दांसह
इतर काही वस्तू वापरण्याची शक्यता
-- शब्द असतात अर्थबद्ध
शब्दांना विचारांची गुलामी असते
की विचारांची वैविध्यपूर्ण शक्ती
मूर्त वस्तू आणि विचार हेच दिसतात
जेव्हा जगाच्या तप्त नरकाचे शिल्पकार
तेव्हा कला धुंडाळू लागते इतर मार्ग
मग कला स्वीकारते एक भ्रम
शब्द नकोत शब्दच गुन्हेगार
शब्दही हवेत अर्थांपासून मुक्त
चित्र आणि संगीत (तसे असतात असे समजून)
यांच्याप्रमाणेच होऊ पाहतात शब्दही
विचारमुक्त
दिसणाऱ्या जगापासून मुक्त होतात कला
स्वीकारत भ्रम विचारमुक्ततेचा
सत्यता नाहीच येत भ्रमाला
एकूणच चित्र असो की संगीत की शब्द
दिसतात सतत
सर्वच रुतलेले विचारात
शेवटी
अमूर्त चित्रही टेकते हात
संगीतही गळाठते मनापुढे
आणि शब्दही तुकवतात मान
मुळात काहीच बदलू न शकल्याने
पराभूत होत आक्रसून बसते सगळेच
आपापल्या वैचारिक सापळ्यात
सर्जकतेची धुंदी गळून पडत
इथे खरा उभा ठाकतो
कलेपुढचा मूळ प्रश्न -- जर
वैचारिकच काही सांगितले जाणार आहे
तर कशाला हवेय एवढे कौशल्य
विचाराचेच बळ वाढवून

नरक अधिकच असह्य करणारे
या क्षणी होते एका निरुत्तर पोकळीचे दर्शन
यावर एकच अंतिम शक्यता म्हणून
उरतो समोर एकच पर्याय कलेच्या
किनारा सोडून
अमूर्ताच्याही सीमेबाहेरच्या अज्ञात वास्तवात
उडी टाकण्याचा
तसे काही आहे का हेही माहीत नसताना
--- ००० ---

लॉकडाऊन

मनांना नसते समाजदूरी
ती बिनधास्त जवळ येतात बिलगतात
कोणत्याही अटीशर्तींशिवाय
ती उडतात आकाशात एकत्र
पडतात खाली मास्कचा पाऊस होऊन
मास्क धावतात इकडेतिकडे घसटतात
धक्के देतात पडतात एकमेकांवर विसावतात
हसतात थकतात नव्या ऊर्जेने भिडतात
जगण्याला
मास्कची ऑक्सिजनलेव्हल होते शंभर
होणारच डॉक्टर म्हणतात मने
अशी आली सहवासात की ती वाढवतात
प्रतिकारक्षमता आणि प्रतिसादक्षमताही
जरी नाडीचे ठोकेही होतात उत्कट आणि जलद
पण डोंट वरी त्याने पूर्ण फ्री होतो
रक्तप्रवाह आणि दूर होतात
सगळे अडथळे
बाहेर जगाला वाटते मने
पीपीई किटमध्ये फिरताहेत
ओळखूही येत नाहीयत
उलट मनांनी तर धुडकावलेला असतो
लॉकडाऊनही आणि आहे याच प्रदूषित धोक्याच्या
जगात ती पोचलेली असतात त्यांच्या रोमांचक स्वर्गात
--- ००० ---

विमान

रडारयंत्रणा अद्ययावत सदासिद्ध कार्यक्षम हवी
बाहेर कितीही असू द्या दुर्लक्ष वा न कळणे
वा नकारच क्षणात डिकोड व्हायला हवेत
आतले सूक्ष्म होकार नुसते घडायला
सुरुवात झालेली असली तरीही हे काही
हिंदी पिक्चर नव्हे की हीरो आणि हिरॉईन
ठरलेलेच असल्याने घडणारच रोमँटिक गाणे
प्रतिपक्षावर लक्ष ठेवत संपर्कात राहात गोळा करत
राहणारी हवी यंत्रणा नेमके सिग्नल्स एक भाग
असाही हवा की प्रतिपक्षाला गाफील ठेवत
हळुवारपणे तिकडून निर्माणही केले जावेत ते सिग्नल्स
विमानावर हल्ला कधी झाला ते कळूही नये प्रतिपक्षाने
म्हणावे वाटले नव्हते असे होईल आणि यंत्रणेनेही म्हणावे
खरेच आहे हा असा प्रोग्राम फीड केलेला असेल माझ्यात
असे वाटलेच नव्हते पण यापुढे सिनल्सची गरजच नाही पडणार
हे विमान खरे तर चालले होते त्याच्या मर्जीने दुसरीकडे
कुठे दौरा असे सहज विचारत यंत्रणेने त्याला जरा थांबवले
दुसऱ्या दिवशी आज उशीर झाला वाटते असे म्हणत
विमानाच्या पंखांची स्तुती केली मग हळूच शक्य झाले तेव्हा
त्याची दिशाच त्याने बदलावी असे हवामान आणि हकीगत
घडवली आणि ते उतरवले आपल्याच विमानतळावर
मग तेलपाणी करणे पेट्रोल भरणे अशा निमित्ताने त्याच्या
सगळ्याच पार्टसचे ओव्हरहॉलिंग केले
--- ००० ---

नाकात घालायचे थेंब

अरे बाळा लाखो वर्षांची कोट्यवधी
कारणे आहेत आज हवा अशी पडायला
आणि तशीच तितकीच तुझे नाक चोंदायला
तुला काय वाटते नाकात घालायचे
थेंब खपावेत म्हणून चाललेय हे
तू स्वतःला बुद्धिमान समजावेस
तर्क आणि विज्ञान यांचा अभिमान बाळगावास
यालाही तशीच तितकीच आहेत कारणे
अशी बेरीज करून बघ अंदाजे
आजच्या असंख्य गोष्टींच्या कारणांची
आपण जी एकच गोष्ट समजतोय
ती कोट्यवधींपैकी एक असून
त्या सर्व कोट्यवधींना आहेत
प्रत्येकी कोट्यवधी कारणे एवढे तर
मान्यच व्हायला हवे तुझ्या तर्कबुद्धीला
आणि ही सर्व कारणे एकास एक अशा
एकेका साखळीची नाहीत ती एकमेकांत
मिसळलेली असून ठिकठिकाणी एकत्र
परिणाम करत जाणारी आहेत जसे की
इकडच्यातिकडच्या कारणांचे मिळून
एकत्र परिणाम आणि स्वतंत्र काहीच नसणे
तू बुद्धिमान असून त्याला ना काही अर्थ
ना त्याचा काही उपयोग
एकूण आत्ताच्या या
तुझ्या बुद्धीनेच निवडलेल्या तुकड्याचे
समर्थन कळायला
वा ते कसे चांगले वा वाईट आहे
हे सांगायला हे येतेय का लक्षात
तुला वाटते की ते मूर्ख आहेत
आणि हे शहाणे ते मूर्ख शहाणे झाले
की प्रश्न मिटतील
पण बाळा तुझ्या बुद्धीला हे नाही समजत का
की कारण-परिणामांचे लाखो वर्षांचे
एकत्रित जंजाळ
तुझ्या बुद्धीच्या आवाक्यातले नाही
तरी त्यांना हरवून मग जग
सुंदर होईल असे तुला वाटणे

हे नुसतेच तर्कहीन मूर्ख श्रद्धेचे नसून
तेही त्याच
जंजाळ गुंताड्याचाच भाग आहे हे बघ
तुझ्यासारखीच पण वेगळ्या गुंताड्याने
त्यांचीही काही श्रद्धा बनत आलीय
हे तर्काने समजणारे नसले
तरी तर्काने मान्य तर कर
म्हणूनच एका क्षणात शहाणे लोक म्हणतात
जाने दो त्याच गुंताड्यातले की बाहेरचे कोण जाणे
--- ००० ---

पोती

सिमेंटची किती पोती लागणार आहेत
किती आलीत
याचा हिशोबच नसे त्याच्याकडे
कोणताही पूल पडल्याची बातमी
वाचून त्याचा थरकाप उडे
भविष्य सांगणारे लोक
आहेत जगात पण तो
तिकडे जात नसे
त्याचे वडील पुरोगामी होते
तो त्याच्यावर संस्कार होता
तो सारखाच काही ना काही करून
मातीचा विषय काढे सश्रद्धांना
ते उगीचच अपशकुनी वाटे
चिडण्याच्या बाबतीत तो
त्याच्या आईच्या वळणावर
गेला होता त्या वेळी त्याचे
ठराविक हातवारे होत
त्याच्या आजीने सांगितलेले
रामायणमहाभारत मात्र
तो कटाक्षाने टाळत असे
आपण स्वतःची कविता नाही लिहू शकत
एवढीच त्याला खंत होती
--- ००० ---

गप्पा

आपण गप्पा मारल्या
आभासाला सत्य मानण्याच्या

आपण गप्पा मारल्या
बाहेरचे जग अदृश्य होण्याच्या

आपण गप्पा मारल्या
आपण एकमेकांच्या बाहेर नसल्याच्या

आपल्या गप्पांत ससे आले वाघ आले
पंतप्रधान आणि किराणादुकानदार आले

यायचे प्रत्यक्षात जवळ तर बाहेरच्या
जगातला रस्ता वापरावा लागेल

शेवटी आपण आपापली मने
आत आहेत की बाहेर यावर बोललो

आपली मने आपापल्या बाहेर
पण एकदुसऱ्याच्या आत आहेत

असे आपण ठरवले आणि मग पुन्हा
आभास म्हणजे सत्यच असा शेवट केला

स्पर्श जाणवतो गंध जाणवतो आवाज
ऐकू येतो आणि डोळे दिसतात हे स्पष्टच होते
--- ००० ---

एकत्र जमव

सदासर्वदा समाधानात राहता येईल असे जग
ही तुझी कल्पना आहे इथे प्रत्येक क्षण
असणार आहे फाटलेला
तुझ्या मनामुळे

अंगाला सुटणारी खाज
तू गोळ्यांनी घालवशील
आणि मग अर्धवट झोपेत म्हणशील
आज कामच नाही झाले काही फारसे
आवडते चॅटिंगही नाही

तुझ्या भूतकाळात डोकावून बघ
सर्व घटना दिसतील
सोलवटलेल्या
एखाद्या क्रूर परदुःखसंतोषी
वेड्याप्रमाणे तुझ्या स्वतःकडून

तू प्रश्नांच्या फंदातच नको पडूस
वाटल्यास नाइलाजाने पुस्तके वाच
प्रत्येक प्रश्नावर अधिकारवाणीने
निरूपण कर की आता पुन्हा
येताहेत दिवस कम्युनिझमचे

असे वाटणाऱ्यांना एकत्र जमव
संध्याकाळी एकत्र चर्चा होऊ द्यात
आपल्याला सापडलाय मार्ग यापासून मात्र ढळू नकोस
--- ००० ---

दाने दाने पे

स्वतःच्या कामात तरबेज असणारा
आणि शिवाय युनियनचा उत्तम कार्यकर्ता असणारा
तो युनियन कार्यालयातून आलोच दहा मिनिटांत
असे म्हणून गेला तो बेपत्ताच झाला
तसेच अचानक एक प्रख्यात उद्योगपती
एका संध्याकाळी बेपत्ताच झाला
अहो कालपर्यंत तर – अशी सुरुवात असलेले वाक्य
तर रोजच कुणी ना कुणी बोलत असते
जगणे येतेच कधी सरळपणे तर कधी विकृतपणे
त्या क्षणापर्यंत कदापि पूर्वसूचना नसलेल्या

कुणाचे चूक कुणाचे बरोबर ही विद्वत्ता
स्थगित होते तीव्र अपमान किरकोळ भासू
लागतात दाने दाने पे हे गाणे आठवू लागते

जाऊ द्या हे सगळे अपवादात्मक
मुलांना कॉलेजप्रवेश वगैरे सगळे
तर चालूच राहणार आहे ना

सत्याची अशी गोळी थोडीच मिळते
काल्पनिक भीतीचा फायदा तरी काय
माझ्या मनाची सवयच खंडित कशी होईल
जग तर टप्प्याटप्प्याने ओळीने मजल
दरमजल करत चालूच असते ना
ऊन पडलेले दिसले म्हणून
नवल वाटायचे कारणच काय
--- ००० ---

आंद्रे ब्रेटन (१८९६ ते १९६६) – फ्रेंच कवी आणि लेखक – अतिवास्तववादाच्या जाहीरनाम्याचा लेखक.

भुताटकीचे दृष्टिकोण (The Spectral Attitudes)
-- आंद्रे ब्रेटन – अनु० – चं. प्र. देशपांडे.

मी जगण्याला फारसे महत्त्व नाही देत
जगण्याच्या अगदी किरकोळही फुलपाखरांना मी कवडीच्या महत्वा सला टाचत नाही
माझ्यामुळे जगण्याला फरकच नाही पडत
परंतु मिठाच्या फांद्या त्या शुभ्र फांद्या
ते सावल्यांचे सर्व बुडबुडे
आणि ती समुद्रफुले
खाली अवतरतात आणि श्वासोच्चायास करतात माझ्या विचारांत
ती येतात अश्रूंपासून माझ्या नसलेल्या
पायऱ्यांपासून ज्यांची मी पुनरावृत्ती नाही करत
आणि ज्यांच्याबद्दल वाळूला असते स्मृती भरतीची
गज असतात पिंजऱ्यात
आणि पक्षी अवतरतात खूप उंचावरून त्या गजांसमोर गाण्यासाठी
एक भूमिगत मार्ग घडवतो मिलाफ सर्व सुगंधांचा

एका स्त्रीमिने वाहून घेतले स्वतःला तिथे एक दिवशी
ती स्त्रीस् तेजाने इतकी तळपू लागली की पुढे मला ती दिसेच ना
माझे स्वतःचे जळणे पाहणाऱ्या माझ्या या डोळ्यांनीही
त्या वेळी माझे वय माझ्या आताच्या वयाइतकेच होते
आणि मी पाहायचो स्वतःच्या पलिकडे आणि माझ्या विचारांकडे एखाद्या
प्रचंड कारखान्याचा रात्रीचा रखवालदार जसा एकटाच असतो लक्ष ठेवून
त्याच्याप्रमाणे ती सर्कस जशी सतत मोहवते त्याच त्याच निबद्ध मार्गांना
त्या प्लास्टर आकृतींच्या आविष्कारांतले काहीच नष्ट झालेले नाहीय
त्याच आकृती ज्यांनी स्मितांची किरकोळ अंजिरे चावली
विस्मृतीत गेलेल्या एका शहरातला मला असा एक पोषाख ठाऊक आहे
की मला जर खुश होत त्या पोषाखात तुमच्यापुढे यावेसे वाटले
तर तुम्हाला वाटेल की तुमचा अंत जवळ आलाय
माझ्यासारखाच
शेवटी कारंज्यांना कळेल की तुम्ही कारंज्याचे नावच काढू नये
लांडग्यांनी घातलेत कपडे बर्फाच्या आरशात
माझ्याकडे आहे अशी एक नाव जी सर्वच हवामानापासून अलिप्त आहे
मी फरफटत ओढला जातोय ज्वाळांचे दात असलेल्या बर्फपिशवीकडून
मी हे झाड तोडतो आणि त्याच्या ढलप्या करतो
आणि हे झाड सदोदित राहील हिरवेगार
संगीतकार हा बद्ध असतो त्याच्या वाद्याच्या तारांत

कोणत्याही बालपणीच्या गोष्टीच्या काळाची कवटी आणि तीखालील दोन हाडे
जातात एका जहाजावर जे अजून तरी असते स्वतःचेच भूत
बहुतेक या तलवारीला एक भक्कम मूठ आहे
द्वंद्वयुद्धाच्या वेळी स्पर्धकांना निःशस्त्र केले जाते
मारून टाकणे हा अगदी किरकोळही गुन्हा नसतो
भविष्य कधीच नाही येत

कधीच उघडले न गेलेले पडदे
तरंगतात अजून बांधूनच न झालेल्या घरांच्या खिडक्यांकडे
लिली फुलांच्या शय्या
सरकतात दवाच्या दिव्यांखालून
तिथे येईल एक संध्याकाळ
उजेडाचे लगदे होतील निश्चल निळ्या शेवाळ्याखाली

प्रेमाच्या आणि हवेच्या गाठी बांधणारे आणि सोडणारे हात
संभाळून ठेवतात त्यांची पूर्ण पारदर्शिता ज्यांना ती पाहण्याची दृष्टी आहे त्यांच्यासाठी
ते पाहतात हातांचे तळवे
डोळ्यांतले मुगुट
पण मुगुटांच्या वा तळव्यांच्या भङ्ग्या क्वचितच पेटवल्या जातात
जंगलाच्या अतिनिबिड खोल भागात जिथे हरणे झुकवतात त्यांची मस्तके
गेलेल्या वर्षांच्या परीक्षणासाठी
एका नाजुक ठेक्याशिवाय काहीच नाही ऐकू येत
आणि त्या आवाजातून पुढे येतात हजारो अधिक मोठे आणि अधिक नाजुक आवाज
आणि तो ठेका चालूच राहतो चालूच राहतो
तिथे असे पोषाख असतात जे सादकंपने देतात
त्या ठेक्याशी जुळणारी
ते परिधान करणाऱ्यांचे चेहरे बघावेत असे जेव्हा मला वाटते
तेव्हा जमिनीतून वर येते प्रचंड धुके
अतिरुबाबदार अशा जीवन आणि संपत्ती यांच्या साठ्यांच्या मागे असणाऱ्या शिखरांच्या मुळाशी
दोन डोंगरांमध्ये स्वतःला दडवणाऱ्या खिंडींमध्ये
सूर्य शांत होण्याच्या वेळी समुद्रावर
मला जे खुणावतात ते ताऱ्यांनी विभक्त केलेले असतात
आणि तरीही पूर्ण वेगात पलटी झालेली गाडी
नेते वाहून मला अगदी माझ्या शेवटच्या संदिग्धतेपर्यंत
जी माझ्यासाठी थांबलेली असते शहरात
जिथे ब्राँझचे आणि दगडाचे पुतळे
यांनी बदलल्या आहेत त्यांच्या जागा
मेणाच्या पारंब्यांच्या पुतळ्यांशी
--- ००० ---

बेंजामिन पेरेट – फ्रेंच कवी -- १८९९ ते १९५९ – अतिवास्तववादी कविता आणि स्वयंचलित कविता यांचा पुरस्कर्ता –

घडवणे पाय आणि हात (Making Feet And Hands)
-- बेंजामिन पेरेट – अनु० – चं. प्र. देशपांडे.

डोळा उभा राहिलेला डोळा पहुडलेला डोळा बसलेला

कशाला उगीचच भटकायचे दोन बांधांमध्ये पायऱ्या-कठड्यांच्या
जेव्हा शिड्या होत असतात मऊ नवजात अर्भकांसारख्या
जसा एक पायदळातला सैनिक आपल्या बुटांसह मातृभूमी सोडून आलेला
कशाला उभारायचे हात आकाशाकडे ज्याने स्वतःला
केलेय ठार बुडवून यमकाशिवाय आणि तर्काशिवाय
वेळ घालवण्यासाठी आणि मिशा वाढाव्यात म्हणून
शय्येकडे जाण्यापूर्वी माझा डोळा बसून का राहतो
कारण खोगिरे करताहेत गाढवांना इजा
आणि पेन्सिली मोडताहेत अत्यंत अनपेक्षितपणे
सगळाच काळ
वादळी दिवस सोडून
जेव्हा ते वेडेवाकडे मोडतात
आणि बर्फाळ दिवस
जेव्हा ते करतात त्यांच्या स्वेटरांच्या चिंध्या
पण ती दृश्ये ती जुनी मलिन दृश्ये
गातात गाणी मांजरांसाठी गवत गोळा करताना
मांजरे येतात मिरवणुकीच्या मागोमाग
झेंडे घेऊन
झेंडे आणि निशाणे
माशाची शेपटी ओलांडतेय एक धडकते हृदय
त्याचा गळा नियमीतपणे उभा होतोय बसतोय
त्याला वेढणाऱ्या समुद्राचे अनुकरण करत
आणि तो मासा गोल फिरतोय व्हेंटिलेटरभोवती
आणि तिथे हातही आहेत
लांबसडक गोरे हात ताज्या हिरवाळीच्या नखांसह
आणि बोटे – दवाचे सांधे असलेली
झुलत्या पापण्या पाहात असलेल्या फुलपाखरांकडे
विषण्ण केल्या गेलेल्या त्या दिवसाने पायऱ्यांवर केलेल्या चुकीमुळे
तिथे अनेक लिंगेही आहेत ताजी वाहत्या पाण्यासारखी
जे उसळते उंच आणि पडते खाली दरीत तशी
कारण त्यांना झालेला असतो स्पर्श सूर्याचा
त्यांना दाढ्या नसतात पण त्यांना स्वच्छ डोळे असतात

आणि ते उडत्या चतुरांचा करतात पाठलाग
लोक काय म्हणतील याची तमा न बाळगता
--- ००० ---

ट्रिस्टन झारा – फ्रेंच कवी – १८९६ ते १९६३ – कलेतल्या ' दादा ' चळवळीचा प्रवक्ता – दादा म्हणजे गुंडगिरीतला दादा नव्हे – यांचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे कशावरही विश्वास नसणे – जगण्याला काही अर्थबिर्थ नसतो असे म्हणत हवा तो लहरीपणा करणे – मार्सेल दुचँप या शिल्पकाराने मुतारीचे भांडे उलटे ठेवून त्याला ' फौंटेन ' या नावाने एक शिल्प म्हणून सादर केले होते ! -- कोणतीही हिंसा, युद्ध यांचे हे विरोधक होते. – आंतरद्वंद्वात्मक, तर्कहीन, उत्फूल्ल पण निरर्थक कला – विनोद, उपरोध मुबलक – सौंदर्यात्मक रचनेची कला अमान्य –

दादावादी कविता करणे (To make a dadist poem)
-- ट्रिस्टन झारा – अनु० – चं. प्र. देशपांडे.

एक वर्तमानपत्र घ्या.
एखादी कात्री घ्या.
साधारण किती लांबीची कविता तुम्हाला हवीय
त्या अंदाजाने एक लेख निवडा.
मग कापा तो लेख.
मग अत्यंत काळजीपूर्वक त्यातला एकेक शब्द सुटासुटा कापा
आणि ते सगळे एका पिशवीत टाका.
हळुवारपणे ती पिशवी हलवा.
मग त्यातले प्रत्येक कात्रण एकामागोमाग एक असे बाहेर काढा.
अत्यंत विवेकशीलतेने ते शब्द ज्या क्रमाने आले त्याच क्रमाने लिहून काढा.
आता ही कविता हुबेहूब तुम्हीच असाल.
आणि आता बघा – तुम्ही झाला आहात एक अमर्याद आद्यतायुक्त कवी
मोहक संवेदनशीलतेचा
जरी असभ्य अडाण्यांच्या कळपाकडून कौतुक होणार नसले तरी.
--- ००० ---

माझ्या तीन नंबरच्या गहनतेचा महान विलाप (Great Lament Of my Obscurity Three)
-- ट्रिस्टन झारा – अनु० – चं. प्र. देशपांडे.

जिथे आपण राहतो तिथे घड्याळांची फुले पकडतात आग आणि पिसारे
वेढतात तेजाला दूरच्या गंधकी सकाळी गाई चाटतात
मिठाची लिली फुले
वत्सा
वत्सा
जगाच्या रंगातून आपण नेहमीच एक नीटनेटकेपणा आणू या
भुयारी मार्ग वा खगोलशास्त्र यांच्याहून अधिकच निळे दिसणारे जग
आपण फारच बारीक आहोत
आपल्याला तोंड नाहीय
आपले पाय कडक आहेत आणि ते एकत्रितपणे लगावतात दणका
चांदण्यांप्रमाणे आपले चेहरे आकारहीन आहेत

स्फटिकबिंदू शक्तिहीन जळून गेलेले प्रचंड सभागृह
वेडे : नागमोडी कडकडत तडा गेलेले
टेलिफोन
चावा आधार दोर द्रवीकरण करा
कमानीचे
चढा
तारकासमूहांसारख्या
स्मृतीवर
तिच्या दुप्पट फळातून उत्तरेच्या दिशेने
कच्याच् मांसाप्रमाणे
भूक अग्नी रक्त
--- ००० ---

पीटर शेल्डाल – अमेरिकन कवी, समीक्षक – (जन्म १९४२.) – उत्तर आधुनिक – कविता सर्वांना समजावी असे तो म्हणे – रोजच्या जगण्यातले विषय तो हाताळे –

एक अधिक तरुण कवी (A Younger Poet)
-- पीटर शेल्डाल – अनु० – चं. प्र. देशपांडे.

त्याला आता शैलीचे सराव काही कामाचे नाहीत

एके काळी त्याला उत्तेजित करणाऱ्या शक्तींकडे तो पाहतो
आता त्या आत्मसंशयाच्या ॲसिडमध्ये विरघळताना दिसतात

जुन्या आवडत्या सिद्धहस्तांच्या क्लृप्त्या आणि त्यांची तेजोवलये
त्याची एक तर आत्मसात करून झालेली आहेत किंवा आता ती
फेकून द्यायला हवी आहेत

त्याचा प्रकार, अधिक चांगला वा वाईट होत, आता स्थिरावलेला आहे

आता तो स्वतःचे विडंबन करणे थांबवायला लागू शकतो

निष्ठावान कसे राहावे, जरी तीबाबत असमाधान असले तरी, त्याच्या कलेबद्दल
हा आता त्याच्या चिंतेचा प्रमुख विषय झालाय
आणि प्रत्यक्ष विषयवस्तू, ती कितीही ठीक वाटत असली तरी

याची वाटावी का त्याला काळजी की जे त्याचे वाचतात
त्यांना वेगळेच काही समजते, जे आपण लिहिले असे त्याला वाटत नाही ?

पण तसे नाही होत – कसेही नुसते लक्ष दिले जाण्यानेही तो उपकृत होतो

परंतु, तो जसजसा अधिकाधिक स्पष्ट होण्याचा प्रयत्न करतो
तसतसा तो स्वतःला अधिकच मूर्ख वाटू लागतो
आणि त्याचे वाचकही त्याला अधिकच मूर्ख वाटू लागतात

वनस्पतींचे आक्रमण व्हावे त्याप्रमाणे मूर्खपणा
आच्छादून टाकतो पृथ्वीला हे त्याला दिसते
त्याच्या एका व्यक्त करता न येणाऱ्या द्रष्टेपणातून
-- की तो पृथ्वीतूनच येतो उसळून बाहेर लाव्हारसाप्रमाणे ?
काही का असे ना, तो सर्वच व्यापून टाकतो

त्याकडे व्यग्रपणे पाहतो तो

त्याच्या शिस्तबद्ध ओळीच्या साधनाने
--- ००० ---

याच कवीच्या एका ठिकाणी उद्धृत झालेल्या ‘ रिलीज ‘ या कवितेतल्या मला आवडलेल्या ओळींचा मी अनुवाद केला होता. तो अनुवाद असा – (ती कविता सापडली नाही.)

माझे आयुष्य राहत आलेले आहे कंटाळवाणे
गोंधळलेले आणि कधीकधी अत्यंत घृणास्पद
आणि उद्रेकमय
परंतु मी कधीच काहीच उच्चारलेले नाही मुद्दाम,
अतिशय प्रामाणिकपणाशिवाय.

माझे स्वत:शीच असणारे मतभेद म्हणजे
असतात गैरसमज
एका बधिर आशावादाने पेललेले

बहुधा मी बाळगत नाही माझी मते
काही तासांहून अधिक काळ.
--- ००० ---

बैलगाडीच्या चाकोरीत दिवे

बसल्या बसल्या पाचपन्नास वर्षे सहज गेली असती
अंघोळ करून भांग पाडता पाडता आणखी पाचपंचवीस
मेकप तर कधी केलाच नाही तरीही
कॉलेजातून येताना भेटला असता एखादा अननस
तर सहज घरी परतेपर्यंत झाला असता त्याचा टोमॅटो

पण दुराग्रह नडले असेच आता म्हणणे भाग आहे
कोणत्या दिवशी काय व्हावे याचे भिकारचोट वेळापत्रकच ठरवले गेले
आणि तिथेच माशी शिंकली
गरजच नव्हती निष्कारण बैलगाडीच्या चाकोरीत दिवे सोडायची

वाढदिवस प्रत्येक वेळी अमावास्येलाच यायचा
तारीख बदलायचा साला दर वेळी सगळीकडच्या
नोंदीही जायच्या बदलून

पण निराशेला थारा नाही दिला आजारपणाने
खंबाटकी घाटात त्रस्त असतानाही
कधी गोडवे नाही गाईले स्वतःच्या मूडचे
जातायेता सर्व वाहने पाहताहेत दयाळूपणे
असे वाटे पण हसून हवेत रुमाल फडकवले

चूक म्हटले तर थोडीशीच किरकोळच झाली
पण नंतर ती सुधारण्याचा मार्ग सापडलाच नाही
खरे तर बटाटे महाग झाल्यापासून त्या नादात
तशी निकडही नाही राहिली
संपेल तेव्हा संपेल असे झाले
--- ००० ---

रिचर्ड ब्रॉटिगन – अमेरिकन कवी – जन्म १९३५ – १९६० नंतर लोकप्रियता लाभत गेली.

काफ्काची हॅट (Kafka's Hat)
-- रिचर्ड ब्रॉटिगन – अनु० चं. प्र. देशपांडे.

सर्जिकल स्त्रा ॅईकप्रमाणे
छपरावर पाऊस दणाणत असताना
मी खाल्ली एक आईस्त्रीत्मची डिश
जी काफ्काच्या हॅटसारखी दिसत होती.
ती होती एक अशी आईस्त्रीअाम डिश
जिची चव होती एखाद्या ऑपरेशन टेबलासारखी
ज्यावरचा रोगी पाहतोय एकटक
वर छताकडे
--- ००० ---

मी विसाव्या शतकात राहतो (I Live in the Twentieth Century)
-- रिचर्ड ब्रॉटिगन – अनु० चं. प्र. देशपांडे.

मी विसाव्या शतकात राहतो
आणि तू आहेस पडून इथे माझ्याजवळ. तू
नाराज होतीस जेव्हा तू झोपी गेलीस तेव्हा.
त्या बाबतीत मी करू शकेन असे काहीच
नव्हते. मला तथ्यहीन वाटत होते. तुझा चेहरा
इतका सुंदर आहे की त्याचे वर्णन
केल्याशिवाय मला राहवतच नाही, आणि काहीच नाहीय
तुला खुश करण्यासाठी मी काही करू शकेन असे आता
तू झोपलेली असताना.
--- ००० ---

आत्मचरित्र चांदीच्या तुकड्याप्रमाणे कर पॉलिश (Auto biography – Polish It Like a Piece of Silver)
-- रिचर्ड ब्रॉटिगन – अनु० चं. प्र. देशपांडे.

मी टेक्सासमधल्या बिर्डस स्मशानभूमीजवळ उभा आहे.
ज्यूडी काय म्हणाली होती ? " देवाने टाकलेली व्यक्तीही सुंदर असते. "
चेहऱ्यावर कॅन्सर असलेला एक खूपच वयस्कर माणूस घेतोय
त्या स्मशानभूमीची काळजी -- एक थडगे खरवडून असे साफ करतोय
की जणू तो एखादा चांदीचा तुकडाच पॉलिश करतोय.

एक म्हातारा कुत्रा उभा आहे त्याच्याजवळ. खूपच उकाडा आहे : १०५.

मी काय करतोय इथे उभा राहून पश्चिम टेक्सासमधल्या
या स्मशानभूमीत ? त्या वयस्कर माणसलाही याचे नवल वाटतेय.
माझी उपस्थिती भागच झालीय त्याच्या खरवडण्याचा. समजतेय मला
हे की तो मलाही करतोय पॉलिश.
--- ००० ---

प्रेमाची कविता (Love Poem)
-- रिचर्ड ब्रॉटिगन – अनु० चं. प्र. देशपांडे.

हे किती छान आहे
सकाळी जागे होणे
अगदी एकट्याने
आणि आता सांगायचे नाहीय कुणाला
की तुमचे त्या व्यक्तीवर प्रेम आहे
जेव्हा खरे तर आता तुमचे
मुळीच नाहीय प्रेम त्या व्यक्तीवर.
--- ००० ---

थकवा

हा काही थकवा नव्हे
हा आहे साईड इफेक्ट जगत राहण्याचा
आपण कोणत्याही आधाराच्या काठीला
कधी तुच्छ नाही लेखले
ना आपण माणसांचे मूल्यमापन
करण्याचे अधिकार बळकावून बसलो

आपण नम्र राहू शकलो
कारण अनावश्यक भरताड
आपण मेंदूत भरले नाही
प्रत्येक बाबतीत आपल्या मते
आदर्श काय हे आपण गिरवले नाही
आपल्याला पटणाऱ्या
बाजूला हिरीरीने जिंकवण्याची
बांधिलकी आपण घेतली नाही
आपली मते पटणाऱ्यांच्या
टोळ्या केल्या नाहीत मुख्य म्हणजे न्यूनगंड
आणि त्यातून येणारा उपरोध
यांना आपण थारा दिला नाही
आपण कुणाचाही कोणताही दोष
उघडा पाडू लागलो तर तेच तसेच
लाजिरवाणे डाग आपल्याही पार्श्वभागावर
आहेत याची आपण जाणीव ठेवली

या सगळ्यामुळे एकटे असावे लागण्याचा
थकवा येणारच ना त्या सगळ्याऐवजी
--- ००० ---

जोहन ॲशबेरी – अमेरिकन कवी – १९२७ ते २०१७ – १९७५ चे पुलित्झर पारितोषिक – उत्तर-आधुनिक व्यामिश्रता – चित्रकार होण्याची महत्त्वाकांक्षा होती – कवितेत अमूर्त चित्रकलेची वैशिष्ट्ये -- कविता ही प्रत्यक्ष जगण्याप्रमाणे अव्यवस्थितच असणार -- नीटनेटकी नाही – असे तो म्हणे –

चित्रकार (Painter)
-- जोहन ॲशबेरी – अनु० – चं. प्र. देशपांडे.

समुद्र आणि तिथल्या इमारती यांच्या मध्ये बसून
समुद्राचे व्यक्तिचित्र काढायला त्याला आवडायचे.
पण जशी मुले करतात कल्पना की प्रार्थना
म्हणजे फक्त शांतता असते तसेच त्याला वाटायचे त्याच्या विषयाने
भराभर उडवावी वाळू, हातात ब्रश धरून
आणि थापावे स्वतःचे व्यक्तिचित्र समोरच्या कॅन्व्हासवर.

त्यामुळे त्याच्या कॅन्व्हासवर कधीच नसे कोणताच रंग
जोवर त्या इमारतींत राहणारी माणसे त्याला लावत नसत कामाला
म्हणत, " तू ना ब्रशचा असा करून बघ वापर की फक्त
साध्याकडे नेणारे एक साधन. व्यक्तिचित्रासाठी निवड
जरा कमी क्रोधिष्ट, मोठे आणि अधिकच चित्रकाराच्या
मूडला बांधील असणारे किंवा प्रार्थनेला, असे काही. "

तो त्यांना कसे समजावणार की त्याची प्रार्थना
म्हणजे निसर्गच हावी होईल कलेऐवजी कॅन्व्हासवर ?
नवा विषय म्हणून त्याने त्याच्या बायकोची केली निवड,
तिचा आवाका वाढवत, उद्धस्त इमारतींप्रमाणे,
जणू काही, आत्मविस्मरणात त्या व्यक्तिचित्राने
व्यक्त केले होते स्वतःला ब्रशशिवाय.

याने प्रोत्साहित होऊन बुडवला त्याने ब्रश
समुद्रात, पुटपुटत त्याच्या हृदयातली प्रार्थना,
" माझ्या आत्म्या, यानंतरचे जेव्हा काढेन मी व्यक्तिचित्र
तेव्हा तू असावास करणारा नासधूस या कॅन्व्हासची. "
ही बातमी वणव्याप्रमाणे पसरली त्या इमारतींतून :
आता तो पुन्हा परतला आहे समुद्राकडे विषय म्हणून.

कल्पना करा की एक चित्रकार चढवला गेलाय सुळावर त्याच्या विषयाकडून !
ब्रशही उचलता येऊ नये इतक्या थकलेल्या त्याने
उद्युक्त केले काही कलाकारांना त्या इमारतींतून ओणवलेल्या अशा
आकसयुक्त जल्लोषाला : " आता अशी प्रार्थना नाहीय आपल्याकडे

की आपणच उमटावे कॅन्व्हासवर किंवा करावे
समुद्राला पाचारण व्यक्तिचित्रणाला बसण्यासाठी ! "

बाकीच्यांनी ते आत्मचित्र असल्याचे जाहीर करून टाकले.
शेवटी विषयाबाबतची सगळी चिन्हे
धूसर होऊ लागली, कॅन्व्हास आहे तसा
पूर्ण कोरा ठेवून. त्याने ब्रश खाली ठेवला.
लगेचच आला आक्रोश त्या खचाखच गर्दीच्या इमारतींतून,
जी प्रर्थानाही होती.

त्यांनी उंच उडवले त्याला, त्या चित्राला, त्यांतल्या सर्वांत उंच इमारतीतून
आणि समुद्राने गिळंकृत करून टाकला तो कॅन्व्हास आणि तो ब्रश
जणू काही त्याच्या विषयाने ठरवले होते की आपण प्रार्थनाच राहायचे.
--- ००० ---

अस्वस्थतेची कविता (A poem Of Unrest)
-- जोहन ऍशबेरी – अनु० – चं. प्र. देशपांडे.

माणसांना ओघात समजते जगण्याची वाहती नदी
अर्थाचे विपर्यास करत जसजशी ती विस्तारते आणि तिची शहरे वाढतात
कभिन्न आणि अधिकाधिक दाट, सततच पुढे पुढे.

आणि अर्थातच तो दूरस्थ दाटपणा मानवतो
आम्हाला, जसे कोकरे आणि गवत यांनाही वाटले असते
जर सगळ्या गोष्टी रचल्या गेल्या असत्या वेगळ्या प्रकारे ठरवल्याप्रमाणे.

पण मी स्वतःलाच समजू शकत नसल्यामुळे आणि फक्त
माझे तुकडे एकमेकांना चुकीचे समजत असल्यामुळे, तुम्ही काही
समजून घेण्याची इच्छा बाळगायचे कारणच नाही, ते शक्यही नाही

जरी आपणा दोघानाही तसे वाटले तरी. ते मनोरे अस्तित्वात तरी आहेत का ?
असे पाहायला हवे आपण त्याकडे, याच पद्धतीने,
म्हणजे विचाराला उभारी घेता येईल लाकडी तटांप्रमाणे.
--- ००० ---

स्पेस

स्टेशनवरची वेटिंग रूम
इंग्रजांच्या काळातली असावी
आता एवढी उंच कोण बांधेल

खूप मोठी स्पेस
असली की कंटाळा कमी येतो
खूप मोठी स्पेस
असली की राग कमी येतो
दुःख कमी होते
हिंसेचे विचार कमी येतात

वाढत वाढत स्पेस
अमर्याद झाली मनाची तर
कंटाळा राग दुःख हिंसा
सर्व नाहीसेच होऊ शकेल
की काय
--- ००० ---

के ऱ्यान – अमेरिकन स्त्रीकवी – जन्म १९४५ – २०११ ला पुलित्झर – छोट्या आकाराच्या आधुनिक कविता –

आल्बम (Album)
-- के ऱ्यान – अनु० – चं. प्र. देशपांडे.

मृत्यूला असते जगणे
त्याचे स्वतःचे. बघा ना
त्याचा आल्बम कसा वाढलाय
एका वर्षात आणि कसा
त्याचा स्पष्ट डाग आता
पडलाय मऊ इतका की
त्या जणू सावल्याच वाटाव्यात
चेरी ब्लॉसममागच्या
या फोटोप्रमाणे.
खरे तर तुम्हाला
हे सिद्धच नाही करता येणार
की ते नाहीच आहेत अस्तित्वात.
--- ००० ---

सगळे तुमचे घोडे (All Your Horses)
-- के ऱ्यान – अनु० – चं. प्र. देशपांडे.

सांगा असे कधी नाही होत की
पाऊस तुम्हाला
जास्तच भिजवतो
किंवा एखादा विचार
जास्तच सखोल होतो
आणि तरीही तुम्ही
पुन्हा करता तो विचार :
तुम्ही मोजणेच
हरवून बसलाय. अधिक मोठा
आकडा नाहीय आता
अधिक मोठा आकडा.
कोसळलेय सगळे; कदाचित
रात्रीतच. पाण्यात
तडा गेल्याप्रमाणे (तसा
जाऊ नाही शकत म्हणा)
सगळे तुमचे घोडे
मोडून पडलेले तुमच्या

सगळ्या घोड्यांसह.
--- ००० ---

अपेक्षा (Expectations)
-- के ऱ्यान – अनु० – चं. प्र. देशपांडे.

आम्हाला अपेक्षा आहे
की पावसाने सचेतन करावा हा झरा :
या खडकांनी व्हावे खळाळ, या
गोट्यांनी थोडे रांगावे
प्रवाहाखाली, त्या पानांनी
फिराचे गोल भोवऱ्यांत, असावेत
ओलीचे ओघळ आणि चमक.
शय्या तर आहे तयार
पण पाऊसच नाहीय अजून.
--- ००० ---

हौदिनी (Houdini)
-- के ऱ्यान – अनु० – चं. प्र. देशपांडे.

प्रत्येक सुटकेमागे
काही ना काही कला होती,
काही बडबड, आणि किमान काही
अगम्य अदलाबदल
तो माणूस आणि ते लोखंड यांत
जी होत असताना त्या साखळ्या
मुळीच तुटत नव्हत्या कारण
तो आणि त्या एकमेकांत
विरघळून जात होत्या. अशा
प्रत्येक विरघळीनंतर त्याला
स्वतःला अर्करूप वेगळे
काढावे लागे. तोच होता
सर्वात कठीण भाग पार पाडायला
रूटीन कामाप्रमाणे बिनचूक
जमणे : मोडून पुन्हा परतणे
त्याच हौदिनीत.
--- ००० ---
(हौदिनी हा एक प्रख्यात फ्रेंच जादुगार होता.)

फिलिप शुल्ट्झ – अमेरिकन कवी -- जन्म १९४५ -- २००८ ला पुलित्झरने सन्मानित –

माझा मित्र करतोय तयार स्वतःला (My friend is making himself)
-- फिलिप शुल्ट्झ – अनु० – चं. प्र. देशपांडे.

माझा मित्र जागा होतोय त्या
अजूनही झोपलेल्या शरीरात एका माणसाच्या जो त्याच्याहून
वेगळाच असा नसला दिसत जरी तरी काहीच ओळखीचे वाटत नाही
ना हात ना पाय ना तळहात
जे उचलले जाताहेत त्याच्या डोळ्यांसमोर
दोन छोट्या शुभ्र छत्र्यांप्रमाणे … पण पाऊस नाहीय पडत,
काहीच घडत नाहीय त्या खिडकीत वा कुठेही
तिच्या पलिकडेही … त्यामुळे त्याने काय करायला हवे ते स्पष्टच आहे
जरी यापूर्वी कधीच काहीच असे स्पष्ट नव्हते :
ते सगळे सोडून त्याने स्वतःला पुन्हा एकदा तयार करायला हवे
अगदी सुरुवातीपासून, त्याने घडवला पाहिजे असा एखादा माणूस
जो दिसेल त्याच्याचसारखा पण असेल पूर्णपणे वेगळा.
हे आधी कधी केल्याचे त्याला आठवत नाही,
किंवा असे काही त्याच्या बाबतीत केले गेल्याचेही,
पण त्याला हे कळतेय की त्याने त्याचे हे चित्र आता सोडायला हवेय
या खोलीत या खुर्च्या आणि भिंती आणि खिडक्या यांच्यासह
आणि हो, हे शरीरही … सगळेच सोडायला हवेय त्याने
जे जे तो झालाय आणि हलवायला हवेयत पाय आणि ठेवायला हवेयत
ते चालते … त्यामुळे तो नेमके तेच करतो, तो उचलतो त्याचे पाय
आणि झुलवतो बिछान्याच्या कडेवर आणि मग उचलतो त्याचे खांदे,
आधी डावा आणि मग उजवा आणि समजतोय की तो उचलला जातोय
हवेत जणू एका ढगात पाऊल ठेवत आणि तरंगत
इतक्या सहज की तो स्वतःला हलवून पाहतो पण तो काही स्वप्नात नाहीय,
तो तरंगतोय स्वतःबाहेर प्रथमदर्शनी वाटणाऱ्या
एका अवाढव्य पोकळीत पण आता दिसतेय ती त्या रस्त्याप्रमाणे
ज्यावर खेळायचा तो बालपणी … होय, तो जातोय पुढे आणि स्मित करतोय
बाजूने जाणाऱ्या चेहऱ्यांकडे पाहून या चमकत्या रस्त्यावरून
जिथे झाली होती त्याची सुरुवात तो कुणीही बनण्यापूर्वी
जे बनावेसे त्याला नंतर मुळीच वाटत नव्हते … नुसताच एक बालक
एका बालकाच्या शरीरात तो खेळणारा हॉकीचेंडू
एक हॉकिस्टिक एक चेंडू एक स्तंभ एक जग यांसह
हेही सगळे नसण्यातूनच आलेले …
--- ००० ---

उत्तरयंत्र (The Answering Machine)
-- फिलिप शुल्ट्झ – अनु० – चं. प्र. देशपांडे.

माझी मैत्रीण आणि मी बहुतेकदा आम्ही एकमेकांच्या उत्तरयंत्रांशीच बोलतो.
लकडा लावणे, गोडीत येणे, आणि इतरही कार्यकलाप आम्ही खेदखंत न बाळगता करतो
आणि बऱ्याचदा आमच्या हे लक्षातही नसते की आपण कुणाशी बोलतोय.

ही यंत्रे हुबेहूब उत्साह नाही दाखवत चढवून त्यांचा आवाज
किंवा तिटकाऱ्याचे सातत्यही नाही ठेवत उद्वेग असलेले.
ती मनांत किल्मिषेही नाही ठेवत आणि न्यायदानाचा पवित्राही नाही घेत. ती कधीच

नसतात अतिव्यस्त किंवा कंटाळलेली किंवा आत्ममग्न. त्यांना सदसद्विवेकबुद्धी नसते
आणि असतो खिन्नतेबाबतचा सहिष्णुपणा जो, मान्यच आहे, आमच्याकडे नसतो.
अगदी भ्याडपणालाही इथे वाव असतो, निर्भीडपणे सांगितल्यास. मी तोडले संबंध

बेटसीबरोबरचे तिच्या मशीनला सांगून की मी नाही जाऊ शकत तिच्याबरोबर
कोलोरॅडोत नौकानयनाला, खरे तर ' कुठेही ' असेच मला म्हणायचे होते आणि ते त्या मशीनला
पक्के समजले. किती जवळीक सहन करणे शक्य आहे रोजच्या रोज हे त्यांना, मला वाटते,

नीट कळते. जेव्हा कुणी दबला जातो ओझ्याखाली तेव्हा ते गाडून टाकते
सर्व प्रस्तुत माहिती तिची उलटापालट करून, काहीही का घडलेले असे ना,
समजा, जेनच्या वाढदिवसाच्या गोड गाण्याला दडपूनच टाकले गेले ना कित्येक

अशा माझ्या अपेंडिक्स ऑपरेशनबाबतच्या मिनतवाऱ्या किंवा बिलच्या वडिलांच्या
मृत्यूची बातमी जी उद्दामपणे हेलनच्या लग्नाच्या निमंत्रणाआधी
टाकली गेली होती, या सर्वांखाली ? होय, प्रत्यक्ष संपर्कातून वाढत जाणारा संघर्ष मशीनमुळे

सौम्य होतो आणि खाजगीपणाचे रक्षण होते पण बहुतेक आम्ही याची जी किंमत मोजतो
ती म्हणजे असते अधिक मोठा एकाकीपणा. या सर्व
याच्यात्याच्याऐवजी असणाऱ्या आवाजांखाली एक सततची बोच असते त्या सर्व गोष्टींची

ज्यांच्या एकदा आम्ही आणाभाका घेतल्या होत्या आणि मग विसरून गेलो होतो किंवा
विश्वासघातच केला होता. त्याचे अपराधी भाव फारच बुडवणारे असू शकतात विशेषतः
रात्री उशिरा जेव्हा रिप्ले करतो मी माझे निरोप ऐकण्यासाठी व्याकूळ स्वर आणि भांडखोर व्यंजने

घासतो आम्ही शाब्दिक चिकटा म्हणून भेदक कंपनांतला प्रार्थनेसारखा अजिजीयुक्त.
अत्यावश्यक काय आहे शेवटी हे नाहीच समजू शकत तातडीने
आणि आवश्यक नसलेल्या गोष्टींना मिळतो समान वेळ. म्हणजे बघा,

आमच्या शांततेतही असतो पुरावा आम्ही जे बोलायला वा स्पष्ट दाखवायला
घाबरत होतो त्याचा – ती असते सततची एक वाहती साक्ष आमच्या पश्चात्तापाची आणि प्रेमाची
जी कितीही अपंग करणारी का असे ना आम्ही रात्री रिप्ले करतो आणि नंतर, विषण्णपणे, पुसून टाकतो.
--- ००० ---

जेम्स टेट – अमेरिकन कवी – १९४३ ते २०१५ – १९९२ ला पुलित्झरने सन्मानित – कवी म्हणून सर्किट, उदार, अतिवास्तववादी, व्यस्ततावादी – अशी अनेक विशेषणे –

घडते असे कधी कधी (It Happens Like This)
-- जेम्स टेट – अनु० – चं. प्र. देशपांडे.

मी सेंट सेसिलियाच्या रेक्टरीच्या बाहेर होतो
सिगरेटचे झुरके घेत तेव्हा एक बोकड माझ्या जवळ येऊन उभा राहिलेला दिसला.
तो बराचसा काळा आणि पांढरा होता, मधेच थोडा तांबूस
आणि इकडेतिकडे तपकिरी. मी जेव्हा चालायला सुरुवात केली
तेव्हा तोही मागोमाग येऊ लागला. मला गंमत वाटली, आनंदही झाला पण मी विचारात पडलो
की अशा बाबतीत कायदे काय कसे आहेत. कुत्र्यांच्या बाबतीत
पट्ट्यांचा कायदा आहे, पण बोकडांचे काय ? लोक
स्मित करत होते माझ्याकडे पाहून आणि बोकडाचे कौतुक करत होते. " माझा नाहीय हा बोकड, "
मी त्यांना समजावले. " हा या शहराचाच आहे बोकड. मी आपला माझी पाळी
म्हणून घेतोय त्याची काळजी. " " मला नव्हते माहीत की आपल्याकडे असा बोकड आहे ते, "
त्यांच्यांतला एकजण म्हणाला. " माझी कधी येईल पाळी कोण जाणे. " " लौकरच, "
मी म्हणालो. " धीर धरा. येईलच तुमचीही वेळ. " तो बोकड
उभाच राहिला माझ्या शेजारी. मी थांबलो की तोही थांबायचा. त्याने वर
माझ्याकडे पाहिले आणि मी त्याच्या डोळ्यांत एकटक पाहिले. मला असे वाटले की
माझ्याबद्दलची सर्व अत्यावश्यक माहिती त्याला आहे. आम्ही पुढे चालत राहिलो. त्याच्या
कामाच्या फेरीवर असलेल्या एका पोलिसाने आमच्यावरून नजर फिरवली. " अरे काय
जबरदस्त बोकड आहे हा तुमच्याकडे. " तो थांबत कौतुकाने म्हणाला.
" हा या शहराचा आहे बोकड, " मी म्हणालो. " याचे वंशज गेल्या तीनशे वर्षांपासून
आपल्याबरोबर आहेत, " मी म्हणालो, " अगदी सुरुवातीपासून. " हवालदारसाहेब
त्याला स्पर्श करण्यासाठी पुढे वाकले, मग थांबले. आणि मग
त्यांनी माझ्याकडे पाहिले. " मी जरा त्याला थोपटले तर चालेल का ? " त्यांनी विचारले.
" याला स्पर्श करण्याने तुमचे आयुष्यच बदलून जाईल, " मी म्हणालो.
" निर्णय तुम्ही घ्यायचाय. " त्याने एक मिनिटभर खूपच कष्टाने विचार केला,
आणि मग उभा राहात तो म्हणाला, " काय नाव काय आहे त्याचे ? " " त्याला
शांततेचा राजपुत्र असे म्हणतात, " मी म्हणालो. " भगवंत ! हे शहर म्हणजे
एक परीकथाच आहे. कुठेही बघा, तिथे गूढ आणि चमत्कार असे काही आहेच.
आणि मी साधा एक बालक आहे कायमच चोरशिपाई खेळणारा.
आता मला रडू आले तर मला माफ करा. " " आम्ही माफ केलेय तुम्हाला
हवालदारसाहेब , " मी म्हणालो. " आणि आम्हाला हे समजते की दुसऱ्या
कुणाहीपेक्षा तुम्ही या राजपुत्राला का कधीच स्पर्श करू नये ते. " तो बोकड
आणि मी पुढे चालत गेलो. आता अंधार पडू लागला होता आणि आमच्या डोक्यात
घोळू लागला होता विचार की आता रात्र कशी कुठे काढावी.
--- ००० ---

चुकीच्या मार्गाने घरी (The Wrong Way Home)
-- जेम्स टेट – अनु० – चं. प्र. देशपांडे.

पूर्ण रात्रभर एक दरवाजा तरंगत वाहात होता नदीत.
त्याने सुखाच्या छोट्यामोठ्या प्रसंगांना आठवायचा प्रयत्न केला
त्याच्या पूर्वायुष्यातून जसे की त्या वेळा जेव्हा प्रेमिक रेलत
त्याच्यावर चुंबने घेत तासंतास आणि कुजबुजत
तेच जुने शब्द.
त्यानंतर आले कठोर शब्द आणि मग एक बूट
फेकला गेला आणि धडामकन आपटला गेला दरवाजा.
हजारोंची आगमने आणि निर्गमने,
सकाळच्या वेळी आणि रात्री उशिराही, आणि ते वर्षानुवर्षे.
अहो खूप मोठ्या योजना आहेत त्यांच्या, ढीग होईल त्यांचा एक.
तो दरवाजा एक बेटच झाला होता झोके खाणारा त्याच्या झोपेत.
चंद्राने त्या दाराची मूठ अगदी किंचितशी फिरवली,
तर त्याची बोटे भाजली आणि तो पळाला,
आणि तरीही ते दार काहीच नाही म्हणाले आणि झोपून राहिले.
किमान त्यांना तरी तसेच म्हणायला आवडते,
पाण्यातले छोटे मासे वगैरे.
दूरवर वाजली एक घंटा, आणि नंतर गोळी मारल्याचा आवाज आला.
--- ००० ---

श्रमशक्ती (Workforce)
-- जेम्स टेट – अनु० – चं. प्र. देशपांडे.

या कामासाठी पुरेसे बैल आहेत का तुमच्याकडे ?
नाहीत, माझ्याकडे आहेत ते अपुरे आहेत.
बरे, मग योग्य असे काम होण्यासाठी किती लागतील बैल ?
मला आणखी दहा जास्तीचे लागतील बैल.
मी पाहीन तुमच्यासाठी जमतेय का हे.
माझ्यासाठी तुम्ही हे करू शकलात तर मी खूप उपकृत होईन.
नक्कीच. आणि एकूण माणसांसाठी पुरेशा मासेपोळ्या आहेत का ?
आमच्याकडे पन्नास आहेत मासेपोळ्या पण त्या पुरेशा नाहीत.
तुम्हाला सकाळी त्या मिळतील हे मी पाहीन.
तुम्हाला डोंगरांच्या आणि अधोजगाच्या नकाशांची गरज आहे का ?
आमच्या कडे डोंगरांचे आहेत नकाशे पण अधोजगाचे नाहीयत.
अर्थात अधोजगाचे नसणारच तुमच्याकडे,
अधोजगाचे नाहीच आहेत नकाशे.

आणि, दुसरे म्हणजे, तुम्हाला तिकडे जायचेही नाहीय, ते खूप कोंदट आहे.
मला तिकडे जायची इच्छाही नाहीय, खरे तर कुठेही.
तुम्हीच तर विचारलेत मला नकाशांबद्दल …
होय, होय, माझी चूकच झाली ती, मी वाहवत गेलो.
काय आहे तुमची गरज, सांगा बरे तुम्ही ?
आम्हाला बियाणे हवीत, नांगर हवेत, खुरपी हवीयत, हव्या आहेत कोंबड्या,
डुकरे, गायी, घमेली आणि बायका.
बायका ?
आमच्याकडे बायकाच नाहीयत.
अरेरे, दयनीय आहे मग हे.
होय, दयनीयच आहोत आम्ही, मालक.
ते ठीक आहे पण मी बायका नाही पुरवू शकणार.
ते मला वाटलेच होते, मालक.
मग बायकांशिवाय करणार काय तुम्ही ?
ते दुःखच असणार आमचे, मालक. आणि मग आम्ही एकेक एकेक असे मरत जाऊ.
तुमच्यापैकी कुणी गाऊ शकते का ?
होय मालक, आमच्यांत बरेच चांगले गायक आहेत.
मग त्यांना ताबडतोब गाणे सुरू करायला आज्ञा द्या.
एक तर या पद्धतीने बायकाच तुम्हाला शोधत येतील नाही तर तुम्ही मराल
गाण्याने समाधानी होत. दरम्यान आता तुम्ही ठरवलेल्या
अर्थपूर्ण कामांमध्ये व्यग्र व्हा.
मालक, पोरी येईपर्यंत आता आम्ही मुळीच थांबत नाही, घ्या –
--- ००० ---

"Dust is watching life's talk show."
— James Tate
धूळ पाहतेय जगण्याचा टॉक-शो.
-- जेम्स टेट.

चार्लस राईट – अमेरिकन – जन्म १९३५ – १९९८ चे पुलित्झर – काळ, सत्य, निसर्ग आणि मृत्यू हे प्रामुख्याने त्याचे चिंतनविषय असत.

रस्त्यावरचे योद्धे (Road Warriors)
-- चार्लस राईट – अनु० – चं. प्र. देशपांडे.

माझे प्रवासाचे कपडे उजळवतात दुपार
खूप दीर्घ काळ मी प्रवासात आहे
भूतकाळात परतण्याच्या
असे दिसतेय की प्रत्येकालाच यायचेय माझ्याबरोबर आणि येऊ देतोही मी.
रस्त्याकडेची फुले मला जोरात विचलित करतात,
चतुर कीटक
घिरट्या घालतात किंमती रत्नांप्रमाणे जवळच पण हाताबाहेर.

अरुंद रस्ता, रुंद रस्ता, आम्ही सगळेच त्यांवरून, असमाधानी,
अस्थिर, अमरत्वापासून सात मीटर लांब
आणि एकच मीटर लांब जगणे फारसे उरले नसल्यापासून.
त्यापेक्षा उंच गवतात बसावे
आणि पाहावे ढगांकडे,
त्यांनी उचलावे आपले चेहरे आकाशापर्यंत म्हणून,
हे विचारात घेऊन की आमच्यांतल्या बहुतेकांच्या बाबतीत –
आमचे जगणे म्हणजे राहात आलेय एक सातत्ययुक्त चूक.
--- ००० ---

डोनाल्ड जस्टीस – अमेरिकन कवी – १९२५ ते २००४ – १९८० ला पुलित्झर – टी. एस. एलियट म्हणतो त्याप्रमाणे, स्वतःच्या व्यक्तिमत्वाची अभिव्यक्ती नसलेली अशी कविता त्याने लिहिली.

बस स्टॉप (Bus Stop)
-- डोनाल्ड जस्टीस – अनु० – चं. प्र. देशपांडे.

दिवे चालू आहेत
शांत खोल्यांतून
जिथे आयुष्ये चालू आहेत
आमच्याशी मिळतीजुळती

ही शांत आयुष्ये
जी येतात आमच्या मागोमाग –
ही आयुष्ये जी आम्ही जगतो
पण जी आमची स्वतःची नसतात –

उभे राहतो पावसात
इतक्या शांतपणे
जेव्हा आम्ही गेलेले असतो
इतक्या शांतपणे …
आणि ती शेवटची बस
येते पडू देत
काळ्या छत्र्या बाहेर –
काळी फुले काळी फुले

आणि आयुष्ये जात राहतात
आणि आयुष्ये जात राहतात
अचानक लागलेल्या रस्त्यांच्या
कोपऱ्यांवरच्या दिव्यांप्रमाणे

किंवा मग दिव्यांप्रमाणे
शांत खोल्यांतल्या
तासंतास राहू दिलेल्या
ढणढणत ढणढणत
--- ००० ---

ऑगस्ट स्ट्रॅम – जर्मन कवी – १८७४ ते १९१५ – युद्धात मारला गेला – जर्मनीतला अभिव्यक्तिवादाचा उद्गाता समजला जातो – त्या पद्धतीत बाह्य वास्तवापेक्षा मनाच्या भावना, अवस्था आणि आकलन यांना कलेत सर्वोच्च महत्त्व असते – स्ट्रॅम हा एक अभिव्यक्तिवादातले उच्च शिखर समजला जातो – मितभाषी कवितेसाठीही तो प्रसिद्ध आहे -- वाचकाच्या कल्पनाशक्तीला मोठे आवाहन करणारी ही कविता आहे –

रक्षकाचे काम (Guard-Duty)
-- ऑगस्ट स्ट्रॅम – अनु० – चं. प्र. देशपांडे.

एक तारा घाबरवतो चर्चशिखराच्या क्रॉसला
एक घोडा धपापतो धूर
लोखंड खणाणते पेंगत
खूप धुके पसरते
असंख्य प्रकारच्या भीती
एकटक पाहात थरथरत
थरथरत
गोडीत येत
कुजबुजत
तू !
--- ००० ---

रणमैदान (Battlefield)
-- ऑगस्ट स्ट्रॅम – अनु० – चं. प्र. देशपांडे.

शरणागत ढेकूळ मंद सुरांनी घालवते लोखंडाला झोपेत
गंजाला जातात तडे
थबथबतो चिखल
शोषून घेत लैंगिक वखवख सडण्याभोवती
खुनावर खून
उघडझाप होतो
पोरकट डोळ्यांत
--- ००० ---

हल्ला (Attack)
-- ऑगस्ट स्ट्रॅम – अनु० – चं. प्र. देशपांडे.

खूप स्कार्फ
हलतात
फडफडतात
बडबडतात

वारे थडथडतात
तुझे हास्य मारते गुद्दे
धरते पकडते
चकमकी होतात बळाच्या
चुंबन
वेढले गेलेले
बुडते खाली
काहीच नसणे
--- ००० ---

जखम (Wound)
-- ऑगस्ट स्ट्रॅम – अनु० – चं. प्र. देशपांडे.

शिरस्त्राणाच्या डोक्याखाली रक्ताळतेय पृथ्वी
तारे निखळताहेत
अवकाशाला जाणवते
थरथर
मुरगाळला जातो
एकाकीपणा
धुके
रडणे
दूरी
तुझे पाहणे
--- ००० ---

कोजागरी

कोजागरीचा चंद्र काल रात्री पाहिला
आणि वा पहाटे पुन्हा दिसला
सुंदर अतिसुंदर जवाब नही
काय काय आहे आपल्यसाठी या जगात
पाहून घ्या पाहून घ्या आता तो
लौकरच अस्त पावेल सोडू नका
बघा बघा बघा बघा बघा

तोवर दात होतील घासून मग पुन्हा बघू
चहाचा कप तर आणू हातात आणि बघत राहू

संवेदनशीलता हवी माणुसकी हवी
निसर्गाशी सोयरीक हवी
सांस्कृतिक भूक हवी माणूस नुसता
हावरट झालाय वेळच नाहीय
म्हणून नुसता रडत राहतो
खरेदीत बुडणारा कुणाला तरी
नामोहरम करू इच्छिणारा
कोणत्या समस्यांना कोण आहे जबाबदार
हे आत्मविश्वासाने सांगणारा
कविता वाचा मनांनी ताठर
नका राहू असे बोंबलत जाईल
तुमचे आणि तुमच्या पुढच्या पिढ्यांचे जगणे
-- हे आणि असे खूप काहीच नसते त्याच्याकडे

गेलासुद्धा तो अस्ताला
--- ००० ---

रंग

झाडाचा हिरवा रंग
दिसतोय तेवढाच नाहीय
त्याची सावली जशी हिरवी आहे
तसेच त्याचे माझ्या मनातले कार्यकलाप
त्याची मुळे कोणत्या उद्देशाने गेली पंढरीला
हे त्याचे त्याला माहीत
पण यात्राच ज्यांना अन्यायकारक ठरली
ते सतत मिसळत राहणारच
त्याच्या प्राणात विष
यात सत्य असत्याचा प्रश्नच नाही येत
पानांचे रंग बदलू लागले
तर मात्र भीती पसरत जाते
त्याला इलाज तरी काय
--- ००० ---

गिसेप्पे उगारेट्टी – इटालियन कवी – १८८८ ते १९७० – प्रतिमावाद, उत्कटता आणि विशेष मर्मदृष्टी –

ही सुंदर रात्र (The Beautiful Night)
-- गिसेप्पे उगारेट्टी – अनु० – चं. प्र. देशपांडे.

कोणत्या जपाने नेलीय झटकन ही रात्र
आंतरिक विणेची हृदयाच्या
स्फटिकात्म प्रतिध्वनीने
ताऱ्यांशी
कोणती वसंत मेजवानी
मीलनातल्या हृदयाची
मी होतो
कडेकोट विभाग अंधाराचा
आता मी चावतो
एखाद्या बाळाप्रमाणे स्तन
मोकळिकीचे
आता मी पिऊन तर्र
विश्वाने
--- ००० ---

तारा (Star)
-- गिसेप्पे उगारेट्टी – अनु० – चं. प्र. देशपांडे.

तारा, माझा एकमेव तारा,
रात्रीच्या दारिद्र्यात, एकटा,
माझ्यासाठी, एकटा, तू चमकतोस,
चमकतोस तू एकाकीपणात;
पण, माझ्यासाठी, तारा
जो कधीच प्रकाशायचा थांबणार नाही,
तुला अगदीच थोडा वेळ दिला गेलाय,
तू भव्यझोत दे मला प्रकाश
जो माझ्यात दुसरे काहीच नाही करणार
माझ्या निराशेला धार लावण्याशिवाय.
--- ००० ---

मी एक प्राणी आहे
-- गिसेप्पे उगारेट्टी – अनु० – चं. प्र. देशपांडे.

या दगडाप्रमाणे

सान मिशेलच्या
तसाच थंड
तसाच कडक
तसाच पूर्णपणे रुक्ष झालेला
तसाच असाध्य
तसाच अचेतन
या दगडाप्रमाणेच
आहे माझे रुदन जे
दिसू नाही शकत
जगणे देते सूट
मृत्यूची
--- ००० ---

अराजकी कवी

फिलिप्पो टोम्मासो मारिनेट्टी – इटालियन कवी – १८७६ ते १९४४ – भविष्यवादाचा उद्गाता आणि त्याच्या जाहीरनाम्याचा लेखक – डोक्याचा खुर्दा करणारे विचार – भूतकाळाशी संबंध तोडातला हवेत, सर्व वस्तुसंग्रहालये, वाचनालये, विद्यापीठे नष्ट करायला हवीत, भाषेचा क्रूर वापर करून तीत अराजक माजवायला हवे, कविता म्हणजे फक्त क्रौर्य आणि अन्याय, युद्ध ही जगातली सर्वाधिक आरोग्यपूर्ण गोष्ट, बाकी कोणतेही भेद नकोत पण पक्का राष्ट्रवाद हवा, पौरुष महत्वाचे, बायकीपणाला अर्थ नाही, वेग हा आजच्या जगाचा मंत्र आहे (त्याच्या कारला एक जोरदार अपघात झाला होता), संगीत असे गोंगाटमय हवे की ऐकणाऱ्यांची डोकी फिरायला हवीत, वगैरे असे आपल्याला भयानक वाटतील असे विचार बाळगणारा कवी. फॅसिझमचा पुरस्कर्ता. नेटवर त्याच्या कविता शोधत होतो – बघू तरी नमूने म्हणून – पण नाही सापडल्या. कुणाला कुठे त्याच्या कविता सापडल्यास माझ्याकडे अवश्य पाठवाव्यात. ऍब्सर्डिटी – व्यस्तता – हेच सत्य, असेही तो काही बोललेला दिसतो ! हा कॅलिग्युलाचा कवी-अवतार दिसतो ! ऐसा भी रहता है ' अभिव्यक्तिस्वातंत्र्य ! ' म्हणून नुसती माहिती दिलीय. अराजकता हेच तत्त्वज्ञान म्हणणारा आणि सर्वांनी वेडे व्हायला हवे, असे म्हणणारा एकूण मानव जातीतला एक अजब ' बांधव ' !

--- ००० ---

मिलो डी अँजेलिस – इटालियन कवी – जन्म १९५१ – काही कविता कळत नाहीत पण आवडतात – तशा या –

यापुढे आता ते नाही शक्य (It's no longer possible)
-- मिलो डी अँजेलिस – अनु० – चं. प्र. देशपांडे.

यापुढे आता ते शक्य नाही. ते रडणे जे रूपांतरित झाले
वेड्याच्या हसण्यात, त्या घालवलेल्या रात्री क्रेसेंझागोवरून धावत
पाठलाग करत त्या निऑन फलकाच्या वार्तारचनेचा.
यापुढे आता ते नाही शक्य. आता ते आपले नाहीय,
मध्यरात्रीची वाट पाहणारा हृदयाचा ठोका, मध्यरात्र
येईपर्यंत वाट पाहणारा तिच्या खऱ्या गोंगाटासह,
त्या सर्व तासांच्या उन्मादासह, सर्वच तासांच्या.
यापुढे आता ते शक्य नाही. त्यासाठी एकच वेळ असते, फक्त एकच
मृत्यू, थोडेफार पछाडणारे विचार, थोड्याफार
रात्री प्रेमाच्या, थोडीफार चुंबने, थोडेफार रस्ते
जे नेतात आपल्याला स्वतःबाहेर, थोड्याफार कविता.
--- ००० ---

खिडकी
-- मिलो डी अँजेलिस – अनु० – चं. प्र. देशपांडे.

त्या हॉटेलच्या
खोलीत, पडद्यांच्या मागे
जे दाखवतात एक माघार घेणारा चौकोन
प्रथमच
" मला हे फक्त पुन्हा सांगावेसे वाटतेय, येतेय ना लक्षात,
बाकी काहीच नाही "
या दुपारच्या वेळी
ते अजिबात व्यक्तिगत नाही, ते कुणालाच
नाही लागू होत
ते निवड नाही करत, आधीच तो आहे
एक अतिथींनी पूर्ण भरलेला प्रदेश
जो करतो पूर्ण
त्याने सुरू केलेले काम
दुसऱ्या कोणात तरी
जसा तो पूल आहे तिथे
शांत, यापुढे दोन तट
जोडत नसणारा.
--- ००० ---

सर्व काही आधीच त्याच्या मार्गावर होते (Everything was already on its way }
-- मिलो डी अँजेलिस – अनु० – चं. प्र. देशपांडे.

सर्व काही आधीच त्याच्या मार्गावर होते. तेव्हापासून ते आतापर्यंत. सर्वच
काळ, तेजाळता, वरच्या वर ओठांवरून, सर्व
श्वासोच्छवास बांधलेले कंठहाराला. लँब्रेटच्या
सावल्यांनी बंद केला दरवाजा. ती पूर्ण खोली
आसरा देत, झाली हृदयाचा पहिला ठोका.
तुझ्या केसांचा काळा सूर्याच्या शेवटच्या किरणांच्या पिवळ्या पार्श्वभूमीवर.
तेव्हापासून ते आतापर्यंत. तो उन्हाळ्यातला पहिला दिवस होता.
आपल्या विचारांत भरून होती शांतता. सर्व काही
आधीच त्याच्या मार्गावर होते, तेव्हापासून, सर्व काही इथेच होते, अद्वितीय
आणि हरवलेले, आपले पण आपल्यापासून खूप लांब, जळते. सर्व काही
सांगत होते त्याच्यासाठी थांबायला, त्याच्या मूळ नावाकडे परतायला.
--- ००० ---

रवींद्रनाथ टागोर – भारतीय कवी, लेखक, चित्रकार, संगीतकार व तत्त्वज्ञ – १८६१ ते १९४१ – प्रामुख्याने मधुरा भक्तीच्या कविता – १९१३ ला नोबेल पुरस्काराने सन्मानित.

शेवटचा पडदा (Last Curtain)
-- रवींद्रनाथ टागोर – अनु० चं. प्र. देशपांडे.

मला माहीत आहे की असा एक दिवस येईलच,
जेव्हा पृथ्वी पाहणारी माझी ही दृष्टी नष्ट होईल,
आणि जीवन तिचा निरोप घेईल शांततेत,
माझ्या डोळ्यांवर शेवटचा पडदा टाकून.
तरीही तारे पाहतील रात्रीकडे,
आणि सकाळ उजाडेल पूर्वीप्रमाणेच,
आणि घटका हेलकावत राहतील समुद्राप्रमाणे उत्सर्जित करत सुखे आणि दुःखे.
माझ्या क्षणांच्या या अंताचा जेव्हा मी करतो विचार,
तेव्हा क्षणांचे अडथळे पडतात मोडून,
आणि मी पाहतो मृत्यूच्या प्रकाशात
तुझे विश्व त्याच्या बेफिकीर खजिन्यांसह.
त्यातले निम्नतर स्थानही आहे अपवादात्मक,
त्यातले निम्नतर जीवजंतूही आहेत अपवादात्मक.
ज्या गोष्टींची मी वांच्छा केली निष्फळपणे
आणि ज्या गोष्टी मला प्राप्त झाल्या
… जाऊ दे ते सगळे.
खरोखर आता अशाच लाभू देत मला गोष्टी
ज्या मी झिडकारत आलो
आणि टाळत आलो.
--- ००० ---

माझा छोटा भाग (Little Of Me)
-- रवींद्रनाथ टागोर – अनु० चं. प्र. देशपांडे.

माझ्यातला फक्त तेवढाच राहू दे छोटा भाग
ज्यामुळे मी माझे सर्वस्व तुझ्या नावे करत राहू शकेन.
माझ्या इच्छेचा तेवढाच राहू दे छोटा भाग
ज्यामुळे तुला मी सगळीकडे अनुभवू शकेन,
आणि प्रत्येक गोष्टीतून येऊ शकेन तुझ्याकडे,
आणि अर्पू शकेन तुला माझे प्रेम क्षणोक्षणी.
माझ्यातला तेवढाच फक्त राहू दे एक छोटा भाग
ज्यामुळे मी तुला कधीच नजरेआड नाही करू शकणार.
तेवढ्याच छोट्या भागाने राहू देत माझ्या बेड्या

ज्यांमुळे मी सतत बांधलेला राहीन तुझ्या इच्छेशी,
आणि तुझे हेतू अंमलात येत राहतील माझ्या जगण्यातून – आणि ती असेल बेडी तुझ्या प्रेमाची.
--- 000 ---

एका भारतीय स्त्रीकवीच्या भन्नाट कविता --

कमला दास – इंग्लिशमध्ये लिहिणारी भारतीय स्त्रीकवी – १९३४ ते २००९ – मुळात ही केरळची – १५ व्या वर्षी तिचे माधव दास यांच्याशी लग्न झाले -- नवऱ्याच्या मृत्यूनंतर ६५ व्या वर्षी तिने तिच्याहून वयाने बऱ्याच कमी असलेल्या मुस्लिम पुरुषाशी लग्न करून धर्म बदलला – भारतात क्वचितच दिसणारी अनिर्बंध मोकळीक हे तिच्या कवितेचे प्रमुख वैशिष्ट्य -- साहित्यासाठीची भारतातली आणि परदेशांतली बरीच पारितोषिके तिला मिळाली -- १९८४ ला नोबेलसाठी तिचे नामांकन होते.

ओळख (An Introduction)

-- कमला दास – अनु० चं. प्र. देशपांडे.

मला राजकारण नाही समजत पण सत्तेत
असलेल्यांची नावे मला माहीत आहेत आणि ती मी
पाठ म्हणून दाखवू शकते आठवड्याच्या सात दिवसांप्रमाणे
किंवा बारा महिन्यांप्रमाणे सुरुवात करत नेहरूंपासून.
मी भारतीय आहे, अगदीच गव्हाळ, मलबारात जन्मलेली,
मी बोलते तीन भाषांतून, लिहिते दोन भाषांतून आणि
स्वप्न पाहते एका भाषेत.
इंग्लिशमध्ये नको लिहूस, ते म्हणाले, इंग्लिश काही
तुझी मातृभाषा नाहीय. पण माझे मला बघू द्या ना.
टीकाकार, मित्र, राहायला येणारी चुलत-मावस भावंडे,
सगळेच ? मला माझ्या आवडत्या भाषेत का नाही बोलू देत ?
जी भाषा मी बोलते ती माझी होते, तिच्यातले बिघाड, तिची विक्षिप्तता,
सर्व काही माझे असते, फक्त माझे.
ते अर्धे इंग्लिश, अर्धे भारतीय, विनोदीच कदाचित, पण ते प्रामाणिक असते,
ते माझ्याइतकेच मानवी असते, हे नाही दिसत
का तुम्हाला ? ते व्यक्त करते माझे आनंद, माझ्या आकांक्षा, माझ्या
इच्छा आणि मला ते तितकेच उपयोगी असते जितके कावकाव
करणे कावळ्याला किंवा गर्जना करणे सिंहाला, ते असते
मानवी बोलणे, बोलणे मनाचे इथेच असलेल्या, कुठे लांब नव्हे,
मन जे पाहते आणि ऐकते आणि असते सजग. बहिरे, अंधळे बोलणे नव्हे
वादळातल्या झाडांचे वा पावसाळ्यातल्या ढगांचे किंवा पावसाचे वा
असंबद्ध बडबडणे भडकलेल्या चितेचे. आधी मी एक मूल होते नंतर
त्यांनी मला सांगितले की मी मोठी झालेय, कारण मी उंच झाले,
माझे अवयव आकाराला आले आणि एकदोन ठिकाणी केसही आले.
जेव्हा मी मागितले प्रेम, दुसरे काय मागायचे असते हे माहीतच नसल्याने,
तेव्हा त्याने मला षोडशेला ओढले शय्यागृहात आणि दार बंद केले. त्याने
मला मारले नाही पण माझ्या दुःखी स्त्री-शरीराला खूपच मारल्यासारखेच वाटले.
माझ्या स्तनांच्या आणि ओटीपोटाच्या ओझ्याने मी चिरडली गेले.
मी आत्मकीवेने आकुंचन पावले.

त्यानंतर … मी शर्ट घालू लागले आणि माझ्या
भावाच्या विजारी, केस बारीक कापले आणि दुर्लक्षच करू लागले
माझ्या स्त्रीत्वाकडे. साडी नेस, मुलगी राहा, पत्नी राहा,
ते म्हणाले. भरतकाम करणारी हो, सुगरण हो,
नोकरांशी भांडणारी हो. नीट बस चाकोरीत. आणि हो,
कुणाचीतरी हो, भेदवाले ओरडत राहिले. कुंपणावर
नको राहूस किंवा आमच्या झालरींचे पडदे असलेल्या
खिडक्यांतून डोकावतही नको राहूस. अमी हो
किंवा कमला हो. किंवा याहून अधिक बरे म्हणजे हो माधवीकुट्टी.
नाव निवडायची झालीय आता तुझी वेळ आणि भूमिका स्वीकारायचीही.
भातुकलीचे खेळ नको खेळूस. छिन्नमनस्कही होऊ नकोस आणि
अप्सराही. लाजिरवाणेपणाने मोठ्याने रडू नकोस प्रेमात फसल्यावर.
मी भेटले एका पुरुषाला, प्रेम केले त्याच्यावर. त्याला कोणतेही
नाव असायची गरजच नाही, तो प्रत्येकच पुरुष आहे ज्याला
हवी असते एक बाई, जशी मीही आहे एक स्त्री जी असते
शोधात प्रेमाच्या. त्याच्यात … भुकेल्या लगबगी नद्यांच्या,
माझ्यात … समुद्राचे अथक वाट पाहणे. कोण आहेस तू
मी विचारते एकेका प्रत्येकाला, ठरलेले उत्तर असते, मी आहे.
कुठेही आणि सगळीकडेच मी पाहते तो माणूस जो स्वतःला मी म्हणतो
या जगात, तो घट्टपणे बंदिस्त असतो जणू म्यानातली तलवारच.
ती मीच असते जी पिते एकाकी पेये बारा वाजता, मध्यरात्री, अनोळखी
शहरांच्या हॉटेलांत, ती मीच असते जी हसते, मीच असते जी प्रेम करते,
आणि नंतर होते शरमिंदी, ती मीच असते जी मरणप्राय पडून राहते माझ्या
घोगऱ्या घशासह. मी पापी आहे, मी संत आहे. मी प्रेयसी आहे
आणि प्रतारणा झालेली. माझी अशी कोणतीच सुखे नाहीयत
जी तुझीही नाहीयत, कोणत्याही वेदना नाहीयत
ज्या तुझ्याही नाहीयत. मीसुद्धा मला म्हणते मी.
--- ००० ---

संबंध (Relationship)
-- कमला दास – अनु० चं. प्र. देशपांडे.

हे प्रेम माझ्यापेक्षा खूप जुने आहे असंख्य दुःखी शतकांनी जुने.
हे एकदा प्रार्थना होते त्याच्या हाडांतली जीमुळे ती वाढली
त्याच्या कुमारवयात या मर्जीतल्या उंचीपर्यंत; होय
ती माझीच इच्छा होती जिच्यामुळे तो पुरुष झाला
आणि देखणा, आम्ही शेवटी भेटू जेव्हा तेव्हा अवघड जावे विश्वास वाटणे
की मला त्याचा ना आकार माहीत होता ना त्याचा शांत स्पर्श ना
अंधळा दयाळूपणा त्याच्या ओठांचा. माझी प्रतारणा ?

अवश्य, करू शकतोच तो पण शरीराची कधीच नाही, फक्त शब्दांनी
ज्यांचे अवयव वाकतात हवेच्या स्पर्शाने आणि मरतात जे कडक सुस्काऱ्यांनी.
मी कशाला काळजी करू त्यांच्या त्वरेच्या नपुंसक दंशाची जोवर
माझ्या शरीराचे शहाणपण सांगतेय आणि सांगतेय पुन्हा पुन्हा
की मला माझी विश्रांती मिळेल, माझी झोप मिळेल, माझी शांतता मिळेल
आणि मृत्यूही मिळेल इतरत्र कुठेच नाही तर इथेच
माझी प्रतारणा करणाऱ्याच्याच बाहूंत.
--- ००० ---

आरसा (The Looking Glass)
-- कमला दास – अनु० चं. प्र. देशपांडे.

तुमच्यावर प्रेम करायला पुरुष मिळणे सोपे असते,
तुमच्या गरजांच्या बाबतीत तुम्ही प्रामाणिक मात्र असायला हवे,
एक स्त्री म्हणून. नग्न उभी राहा आरशासमोर त्याच्यासह
त्याला तो अधिक बलवान असल्याचे दिसावे म्हणून
आणि तसा त्याला विश्वसही वाटावा म्हणून आणि तू
त्याला खूपच नाजुक, अधिक तरुण आणि अधिक मोहक वाटावीस म्हणूनही.
मान्यच कर तुला वाटणारे कौतुक. लक्ष दे त्याच्या अवयवांच्या
पूर्णतेकडे, त्याचे डोळे लाल होताना शॉवरखाली, बाथरूमच्या
जमिनीवरून त्याचे बुजरे चालणे, टावेल पाडणे, आणि त्याचे
जोरजोरात लघवी करणे. सगळे आवडते तपशील ज्यांमुळे
तो होतो पुरुष आणि तुझा एकमेव पुरुष. सर्वस्व भेट कर त्याला,
तू ज्यामुळे स्त्री आहेस ते सर्व, तुझ्या लांब केसांचा सुगंध, तुझ्या दोन
स्तनांमधल्या घामाची कस्तुरी, मासिक स्त्रावाची ऊबदार अनपेक्षितता,
आणि तुझ्या सर्व स्त्री-भुका. होय ना, तुमच्यावर प्रेम करायला
पुरुष मिळणे सोपे असते, पण नंतर कदाचित त्याच्याशिवाय जगणेही
स्वीकारायला लागू शकते. जिवंतपणाशिवाय जगणेच ते तुम्ही इकडेतिकडे
जातयेत असताना, अनोळखी लोकांना भेटत असताना, त्याचा शोध
सोडूनच दिलेल्या तुमच्या डोळ्यांसह आणि तुमच्या कानांत फक्त
त्याचा शेवटचा आवाज असताना तुम्हाला नावाने हाक मारणारा
आणि तुमचे शरीर जे त्याच्या स्पर्शाखाली उजळले होते तकाकणाऱ्या
पितळाप्रमाणे पण आता तेच निस्तेज आणि निराधार झालेले असताना.
--- ००० ---

विचार

अतिपावसाने रस्ते बंद आहेत
हे कळल्याने त्या ऐवजी
आपण बुद्धिबळाचा डाव मांडला
काळेपांढरे दोन्ही आपणच होत
आणि चालींचा विचार करता करता
विचार आला आपण काळे की पांढरे
डिटेक्टिव्ह मधली गाणी मस्त होती
पण त्या काळात के एन सिंग चे डोळे
भयानक वाटत त्या डोळ्यांवर
आणि सिगरेटच्या झुरक्यांवर
त्याच्या पूर्ण करियरचा डोलारा घडला
माणूस कसा असू शकेल प्रतिभावान
स्वभावाने जगणारा तर सतत
तुरुंगातच तर असणार प्रवाहपतित
हे विचार झटकून कोणते विचार
येणे इष्ट होईल हा सुरू झाला विचार
विचार तर आपलेच
पण भीतीमुळे ताबाहीन
--- ००० ---

मानलेलेच

नुसते मनाने मानलेलेच
तर सगळे तू असशील तिथे
असावेस एकटेपणात असमाधानी
असे वाटले जेव्हा

मी संगणकासमोर बसतो
तिथे दोन फुटांवर असलेल्या
खिडकीबाहेर आले एक
साळुंकी-जोडपे
मधे होते काचदार लावलेले
त्यांनी काचेवर चोची मरून पाहिल्या
त्यांना आत यायचे होते की काय
बरे झाले काचदार लावलेले आहे
आत आले असते तर त्यांना
बाहेर काढणे हे एक कामच झाले असते
त्यांनी माझ्याकडे बिनधास्त पाहिले
मीही त्यांच्याकडे येडेबिडे
आहेत की काय
या विचाराला प्राधान्य देत पाहिले
आणि ते मला घाबरले नाहीत
हा सूक्ष्म आनंद दडपून टाकत
आठवत तसा तर दचकतोच मी
असे पक्षिबिक्षी जवळ आले तर
आणि यानंतर ते गेले उडून
तेव्हा
--- ००० ---

वॅलेस स्टीव्हन्स -- २० व्या शतकातला महत्त्वाचा अमेरिकन आधुनिक कवी – १८७९ ते १९५५ – विमा कंपनीत अधिकारी होता – कवितेची भाषा आणि प्रतिमा यांसाठी खास प्रसिद्ध – " मीच जग आहे, मीच जगणे आहे " असे तो म्हणे -- १९५५ ला पुलित्झरने सन्मानित --

हूनच्या प्लाझातला चहा (Tea At The Plaza Of Hoon)
-- वॅलेस स्टीव्हन्स – अनु० – चं. प्र. देशपांडे.

मी जो आहे त्यात कमी नव्हतो
जांभळ्यात उतरलो म्हणून पश्चिमदिनी
ज्यात आहे, तुम्ही म्हणालात, एकाकी हवा
मी जो आहे त्यात मुळीच कमी नव्हतो

माझ्या दाढीवर चोपडलेले मलम कोणते होते ?
कोणते मंत्र माझ्या कानांभोवती गुंजत होते ?
तो कोणता समुद्र होता ज्याची भरती
माझ्यातले सर्व धुऊन टाकत होती ?

माझ्या मनातून पडत होता सोनेरी मलमाचा पाऊस
माझे कानच घडवत होते त्यांना ऐकू येणारा मंत्रघोष
मीच होतो त्या समुद्राचा आवाका :

मी ते जग होतो ज्यात मी चालत होतो, आणि मी जे पाहिले,
ऐकले वा मला जे जाणवले ते इतर कुठून नाही
तर माझ्यातूनच येत होते आणि तिथेच
माझा मीच मला खरा सापडलो आणि अधिकच परका झालो
--- ००० ---

हिममानव (The Snow Man)
-- वॅलेस स्टीव्हन्स – अनु० – चं. प्र. देशपांडे.

माणसाला असायला हवे हिवाळ्याचे मन
न्याहाळायला बर्फ आणि फांद्या
पाईन वृक्षांच्या बर्फाचे तुरे असलेल्या;

आणि खूप वेळ असायला हवे थंडीत
लक्षपूर्वक पाहायला सदाहरित ज्युनिपर झाडे
बर्फाच्या गोधड्या पांघरलेली, आणि फरची झाडे
दूरवर चमकणारी जानेवारीच्या सूर्यप्रकाशात

आणि विचारही करता कामा नये कोणत्याही
दुःखाचा त्या वाऱ्याच्या आवाजात, आणि आवाजात
काही पानांच्या,

जो आहे त्या प्रदेशाचाच आवाज
त्याच वाऱ्याने भरारलेल्या
त्याच नग्न भूमीत वाहणाऱ्या

त्याच श्रोत्यासाठी श्रवण करणाऱ्या
त्या बर्फमयतेत, आणि, स्वतःहीन पाहणाऱ्या
नसणे तिथे जे नाही त्याचे आणि नसणे जे आहे त्याचेही
--- ००० ---

टच

थोडी थंडी थोडे धुके
थोडा आठवणींचा खुर्दा
थोडे न झालेल्याचे असमाधान
थोडे चुकल्याची खंत
थोडे अटळ घर्षणापुढे
पराभूत वाटणे तरीही
अजून जिवंत असल्याचे समाधान
थोडा हिरवा थोडे ऊन
थोडा आळस थोडी उदासी
च्यायला हा काय
हिंदी चाललाय की काय
दिग्दर्शनाचा टच
की प्रेमिक एकत्र आले की
टच व्हावीत दोन फुले
एकमेकांना
--- ००० ---

चार्लस सीमिक – अमेरिकन कवी – जन्म १९३८ – १९९० ला पुलित्झरने सन्मानित – अत्यंत कल्पक प्रतिमा, रचनेचे कौशल्य, दुःखाच्या छटा, उपरोधिक विनोद आणि आत्मभान ही वैशिष्ट्ये –

माझे बूट (My Shoes)
-- चार्लस सीमिक – अनु० – चं. प्र. देशपंडे.

बूट, माझ्या आतल्या जगण्याचा गुप्त चेहरा :
आ वासलेली दोन दंतहीन तोंडे,
अंशतः सडलेली दोन जनावरांची कातडी
उंदरांच्या घरट्यांचा वास मारणारी.

माझा भाऊ आणि बहीण जे मृत्यू पावले जन्मतःच
ते चालू ठेवतात त्यांचे अस्तित्व तुमच्यांतून,
माझ्या जगण्याला दिशा देत
त्यांच्या अगम्य निरागसतेची.

पुस्तकांचा मला उपयोगच काय
जर तुमच्यांतच मला वाचता येत असेल
या पृथ्वीवरच्या माझ्या जगण्याचा सूत्रसंदेश
आणि त्याही पलिकडचा म्हणजे भविष्यासाठीचाही ?

मला उद्घोषित करायचाय एक धर्म
मी घडवलेला तुमच्या परिपूर्ण नम्रतेसाठी
आणि एक अजब चर्च जे मी बांधणाराय
वेदिरूपात तुम्हाला घेऊन.

संन्यस्त आणि मातुल, तुम्ही सहता सर्वच :
सख्यान् नातेवाईकांपासून बैलांपर्यंत, संतांपर्यंत, तिरस्कृतांपर्यंत,
तुमच्या मूक धीराने, घडवत
एकमेव सत्य असा माझा हुबेहूबपणा.
--- ००० ---

हिवाळ्याच्या विरोधात (Against Winter)
-- चार्लस सीमिक – अनु० – चं. प्र. देशपंडे.

सत्य काळे पडलेय तुझ्या पापण्यांखाली.
काय करणार आहेस तू त्या बाबतीत ?
पक्षी शांत आहेत, विचारायला कुणीच नाहीय.
दिवसभर तू बघत बसशील तिरक्या नजरेने राखट आकाशाकडे

आणि वारा वाहील तेव्हा तू थरथरशील गवताच्या पात्यासारखा.

एक गरीब कोकरू तू वाढवलीस लोकर तुझ्या अंगावर
मोठ्या कात्याका घेऊन ते तुझ्या मागे लागेपर्यंत.
माशा घोंघावत होत्या तुझ्या उघड्या तोंडाभोवती,
नंतर त्याही गेल्या उडून पानांप्रमाणे, आणि
पर्णहीन शाखांचे त्या पानांना पकडू पाहणे निष्फळ ठरले.

हिवाळा येत होता. पराभूत सैन्याच्या एखाद्या शेवटच्या
शूर सैनिकाप्रमाणे, तू उभा राहणार होतास तुझ्या निर्धारित ठिकाणी,
डोके उघडे पडलेल्या स्थितीत बर्फाच्या पहिल्या थराला.
जोवर एखादा शेजारी येऊन तुला नाही म्हणत,
तू तर या हवेपेक्षा वेडा झाला आहेस, चार्ली.
--- ००० ---

पहाटे चारचे आरसे (Mirrors at 4 A. M.)
-- चार्लस सीमिक – अनु० – चं. प्र. देशपंडे.

तुम्ही त्यांच्याकडे बाजूच्या रस्यांेयनीच या
सावल्यांच्या गुंताड्यातल्या खोल्यांकडे,
बघा त्यांच्या रिकामेपणाचे दृश्य पण
त्यांना मात्र उलट तुम्ही
ओझरतेही दिसू नयेत असे.

त्याचे रहस्य असे आहे,
एखादी रिकामी शय्याही त्यांना ओझे वाटते,
एक खोटेपणा.
ते स्वतःशी अधिक खरे असतात
कोऱ्या भिंतीच्या सहवासात,
काळ आणि अनंतता यांच्या सहवासात

जे, क्षमा करा,
त्यांची कोणतीच प्रतिमा नाही उमटवत
त्यांना स्वतःचेच कौतुक वाटत असताना आरशात,
जेव्हा तुम्ही उभे असता एका बाजूला
हातरुमाल बाहेर काढत
तुमची भुवई पुसण्यासाठी चोरटेपणाने.
--- ००० ---

आकार

रस्त्यावर उभी रिक्षा असेल
वा बाल्कनीत उभी सुडौल बांध्याची स्त्री
वा पडझड झालेला किल्ला
आकार लागणारच विचाराला
म्हणूनच विचाराला वाटते
सर्व विश्व भरीव आहे -- विचाराने
--- ००० ---

रिचर्ड सायकेन – अमेरिकन कवी, चित्रकार आणि चित्रपटकर्ता – जन्म १९६७ – २०२० चे नोबेल मिळवणाऱ्या ग्लक या स्त्रीकवीने सायकेनच्या कविता उत्कटता आणि कलात्मकता यांसाठी वाखाणलेल्या आहेत –

शहरजादे (Scheherazade)
-- रिचर्ड सायकेन – अनु० – चं. प्र. देशपांडे.

मला त्या स्वप्नांबद्दल सांग जिथे आपण आपली शरीरे
तलावातून बाहेर काढतो आणि पुन्हा चढवतो त्यांच्यावर ऊबदार कपडे.
कसा उशीर झाला होता, कसे कुणीच झोपू शकत नव्हते आणि घोडे
कसे धावत राहिले होते विसरून जाईपर्यंत की ते घोडे आहेत.
ते एखाद्या झाडाप्रमाणे नसते की ज्याच्या मुळांचा कुठे ना कुठे
व्हावाच लागतो शेवट, ते असते एखाद्या गाण्याप्रमाणे
एखाद्या पोलिसाच्या रिडियोवरच्या, आपण कसे
गुंडाळले जाजम आपल्याला नाचता येण्यासाठी, आणि दिवस कसे
होते झगमगते लाल, आणि आपण चुंबन घेतल्यावर प्रत्येक वेळी
कसे होते तिथे आणखी एक सफरचंद अनेक फोडींत कापण्यासाठी.
खिडकीच्या तावदानातून बघ बाहेरच्या उजेडाकडे. त्याचा अर्थ
आता दुपार झालेली आहे, आणि हाही आहे अर्थ की आपण
सांत्वनाच्या पलिकडे आहोत.
मला सांग, हे सगळे आणि प्रेमही आपला विध्वंस कसा करेल.
ही आपली शरीरे प्रकाशाने पछाडलेली.
सांग मला की आपण याचे कधीही आदी नाही होणार.
--- ००० ---
(सुलतानाच्या पहिल्या राणीने त्याच्याशी प्रतारणा केल्यामुळे, त्याचा, तो स्त्री जातीवरच सूड घ्यायचे ठरवतो. रोज एका कुमारिकेशी लग्न करायचे आणि पुढे तिला प्रतारणेची संधीच मिळू नये म्हणून दुसऱ्या दिवशी तिला मारून टाकायचे, असे तो सुरू करतो. त्याच्या वजीराची मुलगी शहरजादे यातला धोका पत्करूनही त्याच्याशी लग्न करते. पण रोज एक गोष्ट सांगायची, ती त्या रात्रीत संपवायची नाही आणि सुलतानाची उत्सुकता ताणून ठेवायची, अशी युक्ती ती वापरते. यातूनच १००१ अरेबियन रात्री घडतात. पुढे सुलतान तिच्या प्रेमात पडतो आणि ती बचावते.)
--- ००० ---

समुद्राकाठचे त्या त्या वेळचे रचत जाणे (Seaside Improvisation)
-- रिचर्ड सायकेन – अनु० – चं. प्र. देशपांडे.

मी माझे हात काढतो उखडून आणि ते तुला देतो पण तुला
ते नको आहेत म्हणून मी ते परत घेतो आणि पुन्हा जोडतो
चुकीच्या पद्धतीने मनगटांची अदलाबदल करत. ते आवार
आहे अंधारलेले, आणि ते टोमॅटो आहेत रंगसफेती
केलेल्या भिंतीच्या पुढे, तिथल्या टेबलावरचे पुस्तक
आहे स्पेनबद्दलचे आणि खिडक्या रंगवलेल्या आहेत बंद.

या रात्री चाललाय तुझा विचार बर्फाचे मुकुट ल्यालेल्या शहरांचा
आणि मी तुझ्याकडे असा एकटक पाहतोय की जणू काही
मी पाहतोय खिडकीतून बाहेर आणि मोजतोय पक्षी.
तुला सुख हवे होते आणि त्याबद्दल मी तुला दोष नाही देणार,
आणि शक्य आहे की माणसाचे तोंड वाटते गधडे जेव्हा ते
आवाजी बडबड करत राहते आनंदाबद्दल, पण मला एक सांग
की हे तुला खूप आवडतेय, सांग मला की तू दुःखी नाहीयस.
जा तू गणित सोडवायला आणि घे मग अपेक्षित त्रास.
समुद्राकाठचे शहर. विजेचे कुंपण.
खडूच्या तुकड्याने काढ एक वर्तुळ. कल्पना कर सतत
उभे असल्याची प्रकाशाच्या शंकूत.
कल्पना कर पूर्ण शरणागतीची.
पूर्ण निरुपयोगी असल्याची.
रस्त्यावर दगड आहे याचा अर्थ चहा तयार नाहीय,
दगड एखाद्याच्या हातात असेल तर त्याचा अर्थ आहे की कुणी
आहे क्रोधित, तुझ्या आतल्या दगडाने मात्र
अजून तळ नाही वेधलेला.
--- ००० ---

तंबू

समोर दिसतेय ते ऊन आहे
की अंधाराची सावली
मनात आलेला विचार
ही भूतकाळाची जखम तर नाही
आणि मीच सिंहासनावर बसवलेले
माझे सत्यरूप मत
हे आजवरच्या युद्धांचे
फक्त वाळलेले
रक्त तर नाही

माझ्या अंगाखांद्यावर बागडणारे ससे
होलपटत का राहतात
जगाचे भले कसे होईल यावर
मी बरेच बोलतो पण त्यावर
माझाही विश्वास का नसतो
माझी अंडीपिल्ली नाहीत माहीत
कुणाला असे समजत
मी भ्रष्टाचारावर चिडून बोलतो
तेव्हा माझ्या नैतिकतेचे भक्कम तंबू
कुठे असतात ठिकाणावर

हे वाह्यात जगणे कुणाचे
की ही माझ्याच जगण्याची सावली

मरायच्या आधी च्यायला
थोडे तरी ओरिजिनल जगायला हवे
--- ००० ---

येहुदा आमिचाई – इस्राएलचा ज्यू कवी – १९२४ ते २००० – ज्यू आणि अरब लेखकांच्या शांतता चळवळीत –

मी झालोय खूपच केसाळ (I Have Become Very Hairy)
-- येहुदा आमिचाई – अनु० – चं. प्र. देशपांडे.

मी झालोय खूपच केसाळ माझ्या पूर्ण शरीरावर. मला भीती एकच आहे की
ते शिकार म्हणून शोध घेतील माझा माझ्या लोकरीसाठी.

माझा रंगीबेरंगी शर्ट काही प्रेमाचा दर्शक नाहीय –
तो दिसतो हवाई फोटोसारखा एखाद्या रेल्वे स्टेशनच्या.

रात्रीच्या वेळी माझे शरीर असते खुले आणि जागे गोधडीखाली,
पट्टी बांधलेल्या डोळ्यांप्रमाणे एखाद्याच्या ज्याला गोळी घालायचीय.

अस्वस्थपणे मी भटकत राहीन;
जगण्याचा भुकेला असा मी मरेन.

तरीही मला अविचलच राहायचे होते एखाद्या टेकाडाप्रमाणे ज्याची सर्व शहरे
नष्ट झाली आहेत अशा, आणि शांत एखाद्या परिपूर्ण स्मशानाप्रमाणे.
--- ००० ---

पावो हाविक्को – फिन्लंडचा कवी – फिन्निश भाषेत लेखन – १९३१ ते २००८ – कवी व नाटककार – अनेक सन्मान –

विंटर पॅलेसमधली चौथी कविता (The Fourth Poem from Winter Palace)
-- पावो हाविक्को – अनु० – चं. प्र. देशपांडे.

या कवितेला वाटतेय की तिने वर्णन असावे,
आणि मला असे हवेय की कवितेला असावी
अत्यंत सूक्ष्म चव.
स्वतःला मी समजतो एक प्राणी
गवताबद्दल आशावादी असलेला.
या ओळी जवळजवळ अशक्यच आहेत,
हा आहे एक प्रवास ओळखीच्या वाचेचा
अशा प्रदेशाकडे जाणाऱ्या जे स्थळ नाहीय,
ही कविता गावीच लागेल, उभे राहून,
किंवा मग वाचावी लागेल आवाजाशिवाय, एकट्याने.

दुसरे काय म्हटले मी.
मी म्हणालो की प्रत्येक गोष्ट बाहेर असते,
आणि हा मी इथे आहे.
मी लटकलोय झाडांवरून जसे पक्षी असतात झाडांवर.
कुलुपे लावलेली आहेत सर्व दारांना
खुल्या.

दिवस रात्र जात राहतात, मी उमटवतो माझी मोहोर त्यांवर
निश्चितपणे, न वाचता,
एखाद्या वर्तमानपत्राप्रमाणे
किंवा कोणत्याही निरुपयोगी कागदाप्रमाणे.
जोवर जागी असते झोप तोवर मी झोपतो,
आणि माझ्या झोपेत मी म्हणतो : मी.

हे जंगल घनदाट आहे,
खुरट्या झाडांनी भरलेले आणि त्यांना ही भीती असते :
इथे, या जंगलात आवाज फिरतो घाम ठिबकत असलेला,
हा आहे प्रदेश जिथे झाडे खुली होतात, यात
अंधळे झाड हे विसरून जाते की ते दिसू शकते.

एक पोकळ प्रदेश आणि बाकीचेही सगळे तसेच,
हे जंगल स्फोट पावलेय एका फुलात मला मूढ करायला,
मी माझी तुलना त्या न जन्मलेल्याशी करू का

जो भाग्यहीन होता, जो गिळंकृत झाला होता मांसाकडून
लवचीक आणि मऊ असलेल्या
आणि कण न कण असलेल्या हडळ ...

मला हे समजतच नव्हते की कसे असते
असणे.

मला मूक राहायचे होते,
शब्द खाऊन बदलायचे होते, बदलाची
सक्तीच हवी होती व्हायला जशी झाली होती जन्मायची.

मी इथवर आलोय : हे घर आहे केंद्रस्थानी,
मी आलोय टेबलाकडे पेन धरायला हातात आणि टेकवायला
कागदाच्या तुकड्यावर,
इथे अगदीच उत्तरेकडचे वाटते, पण माझे मन आहे दाट झाडी,
मी लिहितोय ती एक कविता आहे, बर्फवृष्टी चालू असताना, रात्री,
एकट्याने. आणि असा कोण आहे जो नाहीय मी ?
सर्वसामान्यातले काहीच नाहीय इथे,
इथे ? इथेही :
ज्याला खूप दूरवर जायचेय त्याला खुश व्हायला आहे कारण इथे
सत्वर.

या कवितेत मी फक्त एक प्रतिमा आहे,
मनाने भरलेली,
जिज्ञासा नसलेल्या फळ का नाही फुलत याबाबतची,
मी विचारतो स्वतःला, कुणाला आहे फिकीर या वस्तूंची, हे मन
तराजूत टाकलेले, ते तरंगते हवेत, एक गोलाकार जहाज,
रमतगमत चालणारे वाऱ्याच्या पुढे.

मी त्या जंगलातून आलो,
ओळीओळीतून पुढे गेलो.

तुमचा जन्म होताच ते पाहू देतात तुम्हाला
वर ताऱ्यांकडे तिथे असलेल्या.
ही कधीच तृप्त न होणारी माझी हाव,
अचानक रूपांतरीत झालेली विषण्णतेत.
पाऊस, धबाबा कोसळणारा,
आणि काय मग
कविता म्हणजे ?

मला तुम्हाला सांगायचेय :
एक छोटे घर, अरुंद, उंच, आणि एक खोली
जिथे मी हे लिहितोय.
अतिशयोक्त.
तरीही मी कल्पना करतो की ते सर्वच घडते,
आणि असा कोण असतो जो नसतो एकटा
आणि असा कोण असतो जो नसतो हे जग ?

मला राहायचेय
मूक अशा सर्वच बाबतींत
ज्या बोलणे निर्माण करतात.
मला मागे फिरायचेय
जिकडून मी आलो तिकडे.
--- ००० ---

टॉमस ट्रान्सट्रोमर – स्वीडिश कवी आणि मानसशास्त्रज्ञ – १९३१ ते २०१५ – माणसाच्या जगण्यातली विदीर्णता आणि एकाकीपणा हे प्रमुख विषय – २०११ च्या नोबेल पारितोषिकाने सन्मानित.

राजमहाल (The Palace)
-- टॉमस ट्रान्सट्रोमर – अनु० – चं. प्र. देशपांडे.

आम्ही आत पाऊल टाकले. एक मोठा प्रशस्त हॉल,
शांत आणि रिकामा, जिथल्या जमिनीचा पृष्ठभाग पडला होता
वापरात नसलेल्या बर्फाच्या स्केटिंगच्या मार्गासारखा.
सगळी दारे बंद. हवा राखट.

भिंतींवर चित्रे. आम्हाला दिसली ती चित्रे गर्दी
करून येताना निर्जीवपणे : ढाली, तराजूथाळ्या,
मासे, संघर्षातल्या आकृत्या,
एका बहिऱ्या आणि मुक्या जगात पलिकडे.

तिथल्या पोकळीत बसवलेले होते एक शिल्प :
त्या हॉलच्या मध्यभागी एकटाच उभा होता एक घोडा
पण सुरुवातीला जेव्हा आम्ही पुरते बुडून गेलो होतो
त्या रिकामिकेत तेव्हा आमचे लक्ष नाही गेले त्याच्याकडे.

एखाद्या शिंपल्यातल्या श्वासोच्छ्वासापेक्षा अस्पष्ट
शहरातून येणारे आवाज आणि बोलणे
घेरून होते ही मोकळी जागा निर्मनुष्य
पुटपुटत आणि सत्तेच्या शोधात.

शिवाय आणखी काही. आमच्या पंचेंद्रियांच्या काठाशी
काहीतरी गर्दपणे स्थापून होते स्वतःला
आम्ही ओलांडून पलिकडे न जाता.
वाळू भराभर पडत राहिली होती प्रत्येक शांत ग्लासात.

आता मात्र निघायला हवे होते. आम्ही गेलो चालत
त्या घोड्यापर्यंत. तो प्रचंडच होता,
लोखंडासारखा काळा. सत्तेची मूर्तिमंत प्रतिमाच
राहून गेलेली इथे जेव्हा निघून गेले होते राजपुत्र.

तो घोडा बोलू लागला : ‘ मी एकमेव आहे.
माझ्यावर स्वार झाली होती ती रिकामीक मी
फेकून दिलेली आहे. हा माझा तबेला आहे. मी वाढतोय

शांतपणे. आणि इथे असणारी शांतता हीच माझा चारा. '
--- ००० ---

जोडपे (The Couple)
-- टॉमस ट्रान्सट्रोमर – अनु० – चं. प्र. देशपांडे.

ते दिवा घालवतात आणि त्याची पांढरी शेड
क्षणभर राहते चमकत एखाद्या गोळीप्रमाणे
अंधाराच्या ग्लासात विरघळून जाणाऱ्या. मग पुढे.
त्या हॉटेलच्या भिंती उभरतात त्या काळ्या आकाशात.
प्रेमाच्या हालचाली यथास्थित आणि ते झोपतात
परंतु त्यांचे गुप्त विचार भेटतात एकमेकांना
जसे दोन रंग यावेत एकत्र आणि वाहावेत एकमेकांत
ओल्या कागदावर शाळकरी मुलाच्या चित्र काढणाऱ्या.
आता सर्व अंधारलेले आणि शांत आहे. पण शहर मात्र
ओढून घेतेय अधिकच जवळ या रात्री. शमलेल्या खिडक्या.
घरे येऊन पोचलेली. ते सर्व थांबतात वाट पाहात गर्दीने,
एक जमाव ज्यांतल्या चेहऱ्यांवर नाहीत कोणतेच भाव.
--- ००० ---

सकाळचे पक्षी (Morning Birds)
-- टॉमस ट्रान्सट्रोमर – अनु० – चं. प्र. देशपांडे.

मी जागी करतो कार
जिच्या समोरच्या काचेवर आहे परागांचा थर.
मी घालतो माझा गॉगल.
पक्षिसंगीत होते ठळक.

तेवढ्यात आणखी एक माणूस विकत घेतो पेपर
रेल्वे स्टेशनावर
मालगाडीच्या एका मोठ्या डब्याजवळ
जो गंजून पूर्ण लाल झालाय
आणि फडफडत उभा आहे उन्हात.

इथे कुठेही मोकळी जागा नाहीय.

थेट वसंत ऋतूच्या उबेतल्या एका थंड मार्गिकेवरून
कुणी येतो धावत आणि सांगतो कसे तिकडे वर
मुख्य कार्यालयात

त्याची बदनामी करण्यात आली.

त्या निसर्गचित्रातल्या मागच्या दारातून
येतो एक किलबिलता पक्षी
पांढरा आणि काळा.
आणि एक काळा पक्षी भराभर येरझाऱ्या घालणारा
संध्याकाळपर्यंत होतो एक कोळश्याने काढलेले चित्र,
दोरीवर वाळत टाकलेले पांढरे कपडे सोडून :
एका धर्मसंगीताचे समूहगान.

इथे कुठेही मोकळी जागा नाहीय.

कल्पनातीतच आहे हे माझी कविता कशी वाढतेय
ते जाणवणे मी मात्र आकुंचन पावत असताना.
ती वाढते, ती माझी जागा घेते.
ती ढकलते मला बाजूला.
ती घरट्याबाहेर फेकूनच देते मला.
आणि आता तयार आहे कविता.
--- ००० ---

दगड (The Stones)
-- टॉमस ट्रान्सट्रोमर – अनु० – चं. प्र. देशपांडे.

आम्ही फेकलेले दगड मी ऐकतो
पडताना, काचलख्ख वर्षभर. दरीत
त्या क्षणीच्या गोंधळलेल्या कृती
दीर्घ ओरडत उडत जातात झाडाच्या
शेंड्याशेंड्यावरून शांत होत हवेत विरळ आत्ताहून,
तरंगत सरकत स्वॅलो पक्ष्यांप्रमाणे डोंगरांच्या
शिखराशिखरावरून पोचेपर्यंत ते
सर्वांत दूरच्या पठाराशी
अस्तित्वाच्या कडेजवळच्या. जिथे
आमच्या सर्वच कृती पडतात
काचलख्ख
शेवटाशी दुसरे काहीच नसून
आम्हीच असलेल्या.
--- ००० ---

हॅरॉल्ड पिंटर – ब्रिटिश नाटककार, दिग्दर्शक, कवी – १९३० ते २००८ – जगातला एक महत्त्वाचा नाटककार -- त्याच्या कविता काही खास वाटल्या नाहीत – पण असू दे, एक आवडली ती देतोय – तो २००५ च्या नोबेलने सन्मानित झाला –

कविता (poem)
-- हॅरॉल्ड पिंटर – अनु० – चं. प्र. देशपांडे.

दिवे प्रकाशतात.
पुढे काय होईल ?

रात्र पडते.
पाऊस थांबतो.
पुढे काय होईल ?

रात्र सखोल होईल.
त्याला नाही माहीत
की त्याला मी काय सांगेन.

तो गेल्यानंतर
मी त्याच्या कानात काही बोलेन
आणि मी जे सांगणार होते ते सांगेन
लौकरच घडणाऱ्या भेटीत
जी नुक्तीच घडून गेलीय.

पण तो काहीच नाही म्हणाला
त्या लौकरच घडणाऱ्या भेटीत.
आत्ता कुठे तो वळतोय आणि स्मित करतोय
आणि कुजबुजतोय :
‘ मला नाही माहीत पुढे काय घडेल ते. ‘
--- ००० ---

हातभार

उद्गारचिन्हे साली
बांधून ठेवतात मला माझ्या स्वभावात
ताणतणाव आणि हर्ष आणि शोकात

त्यांच्यामुळेच अस्तित्वात येतो विरह
आणि भूतदया आणि
कलेची धुंदी

आणि मग पूर्णविराम
आणि स्वल्पविराम काय करतात
आणि प्रश्नचिन्ह

आता येतेय लक्षात
माझी भाषाच ठळक ठरत चाललीय
जसे माझ्या चेहऱ्यावरचे भावही

पण मग करणार काय शरीराचे
ते म्हणजे सौम्य वा भडक
मेलोड्रामाच असणार हे कळल्यावर

मग निस्पृह निरपेक्ष निस्वार्थी
स्वशिवाय स्वच्या बाहेर स्व
नाहीच असा कसा असणार मी

बोगस मूल्यव्यवस्था टिकवायला
आपणही हातभार लावावा हेच बरे
--- ००० ---

कॅन्सर

औदासीन्य तर असणारच होते
एकदा जगाच्या बाजारात विरघळल्यावर
उभेआडवे मेंदूतून आलेले लाळेचे ओहोळ
पुन्हा पुन्हा पेट घेत राहणार
काल्पनिक वर्तमानात
हे घडणारच होते
त्याला इलाज नव्हता

उगीचच आपल्याला आज वाटणारे सत्य
उशाला घेऊन खुनांचे विचार करून
सुटका थोडीच होणार होती

व्यापक दृष्टिकोण हवा म्हणून
पावसाचे चित्र काढावे
तसे होतच राहणार होते
संस्कृतीचे मातेरे
आपलीच स्वप्ने रेटत राहण्याने

आत्मविश्वासी बाळू सगळे
धक्के बसूनही पोहतच राहणार होते
बौद्धिकांच्या मधमाशा खात

उपाय शोधणार कोण जेव्हा आवाजच
बसलेत सगळ्यांचे कॅन्सरमुळे भाषेच्या
--- ००० ---

काय घेतले होते

राहता राहिले काय
तर उरलेले झाड म्हणून
भिंगातून पाहिले
तर मनाने तेही घेतले रूटीन म्हणून

खूप हिंसक विध्वंसक
असे काहीही येऊ शकते
ढगांतून मी कल्पना केली तर

सारखे बोलत राहणे
माहिती जमवणे
यांचे फॉर्म किती भरणार
अंधारातही असते ती तीच अगम्यता
हे खिशातल्या किल्ल्यांप्रमाणे
खळाळते सत्य माहीत असल्यावर

सामान आवरते घेताना
जुने राग नाहक झालेले अपमान
आणि काही रात्रींचे चांदणे
हे घेतले जाणारच देवळात
चला पुढे म्हणत ढकलणाऱ्या
सराईत हुकुमशहा असणाऱ्या
आजवरच्या समाजामुळे

काय फरक पडतो काय घेतले
होते हे इथेच मनातच तर राहणार आहे
--- ००० ---

ऐन दिवाळीत

त्या प्रदर्शनातले राजकारण
परिवर्तकांनी आधी पिंजून काढले
मग त्याचे छोटे छोटे तुकडे करून
ते स्वप्नांच्या पाण्यात खारवून
सडवत टाकले
भविष्याच्या सार्वजनिक संडासात

हातभट्टीची मीमांसा समतावादी
प्रत्येक परिसंवादात
फलाधिष्ठित निगुतीने वापरली

अशाने स्वातंत्र्याची वाट लागेल
मुले मद्दड होतील
देशाच्या सीमाही धोक्यात येतील
हे जाणवले काही तटस्थ पत्रकारांना

त्यांनी मग
गॅसपेक्षा चुलीवरची भाकरी
अधिक उत्तेजक असते
यावर भर देणे चालू केले

सर्व करमणुकींचे प्रवक्ते
आता गंभीर व्हायला हवे असे म्हणून
ऐन दिवाळीत झोपी गेले
--- ००० ---

पाब्लो सॅबोरियोच्या ' एग्झिस्टन्स ऍज फिक्शन ' या कवितेचा अनुवाद --

अस्तित्व फिक्शनरूपातले (Existence As Fiction)

आपले अस्तित्व असते
फिक्शनमधला एक उपक्रम
आणि त्याच्या विकृतिकरणातूनच
फिक्शन बनते अनुकरण वास्तवाचे
आणि म्हणून समस्यात्मक

खरे महान कार्य हे असते की
निराकरणासाठी प्रयत्न न करता
समस्या समजून घेणे

सर्वांत महान अभिनेते
प्रेक्षकांना पोचवतात समस्येची समज
आणि शूरवीर म्हणून वाखाणले जातात
कारण ते सातत्याने भरभराटीला येत असतात
आंतर्विरोधात समस्येच्या निराकरणहीन
(कल्पित वास्तव असणाऱ्या)

हे मनाचे प्रेक्षागृह असते
आणि इथे अनेक शौर्यगाथा
लिहिल्या गेल्या आहेत रक्ताच्या फोलपणातून

शोकात्म नायकाची एकमेव निश्चितता
त्याच्या परिणामशून्य यशातली
आणि आपला एकमेव दिलासा
हे दोन्ही मिळून असतो त्याचा दुःखस्वीकार

आपली दयनीयता ही असते की
तो शोकात्म माणूस करतो त्याची समस्या
म्हणजेच केवळ त्याचा प्रेक्षक

त्याला करावेच लागते दुःख
जोवर होत नाही त्यातली वेदना
वास्तव समस्येइतकी खरी

नंतर तो म्हणतो की अप्राप्य आहे मुक्ती

आणि स्वातंत्र्य म्हणजे दुसरेतिसरे काही नसून
असते फिक्शनची परमशुद्ध अवस्था

आणि विशेष म्हणजे त्याच्या
त्या भाषेच्या दुर्विलासात
तो मरणाचा अचूक असतो
--- ००० ---

झोपी जाण्यापूर्वीचा छोटा संवाद
-- पाब्लो सॅबोरिओ (अनुवाद माझा.)

-- हं, कसला विचार चाललाय ?
-- माझा विचार नव्हताच चालला.
-- विचार न करणे कशाबद्दल चालले होते ?
-- माझे विचार न करणे हे सगळ्याबद्दल होते.
-- ओह ! हे तर काव्यात्मकच झाले !
-- होय तर.
--- ००० ---

(इंग्रजीत, स्त्री बोलतेय की पुरुष हे उघड होत नाही
-- ते तसेच राहावे म्हणून मराठीत वाक्यरचना जरा बदलली आहे.)

पाब्लो, त्याच्या एका मुलाखतीत काय म्हणतो, ते पाहा – (त्याच्या एका चित्राच्या अर्थाबद्दल --)

- What is the meaning behind 'Return to Source'?
I have noticed we no longer have experiences. We conceptualize experience; we interpret and define what is happening all the time. Return to Source is a challenge to this mode of existing; a reminder that prior to language and thought, there is awareness. All the works are titled 'In Silentio' (in silence). People are invited to experience the art without the aid of concepts or interpretation.

Artist's comments: "Return to Source is the outcome of living in pure meditation – a return to the intuitive, playful and immediate mode of existing that children and Buddhas exemplify".

गोड चुथडा (Sweet Mess)
-- पाब्लो सॅबोरियो – अनु० – चं. प्र. देशपांडे.

मी समजू शकतो.
की तू वैफल्यग्रस्त आहेस.
एकाकी एखाद्या बिंदूसारखा.
तुझ्या रूटीनच्या दिङमूढतेत.
समजतेय मला.
विचार कसे परावर्तित होतात घड्याळांत.
पुनरावृत्तीचे भयानक कार्यकर्तृत्व.
मी सहभागी आहे त्यात.
तुझी पूर्णपणे परके झाल्याची कल्पना.
सोनेरी गल्ल्या रुपेरी आत्म्याशिवाय.
माझा विश्वास आहे तुझ्यावर.
त्या धारदार कल्पना कशा मोकाट सुटतात ते.
नुसतेच प्रेरणेच्या अधीन असणे.
आहेच मी तुझ्या पाठीशी.
अर्थ लावण्याची ती योजना.
इतरांना सुखी व्हायला सहकार्य देणे.
तेही समजतेय मला.
की तू आता रात्रीच्या अगदी काठावर आहेस.
की तुझ्या अंगावर काटे आलेयत ताऱ्यांसारखे.
मी नाकारत नाही ते.
उपयोगात आणल्या न गेलेल्या प्रत्येक क्षणाचा प्रचंडपणा.
थंड, थंडगार कंटाळ्याचा क्षण.
तुझ्या विद्रोहात मी सहभागी आहे.
संशयाचे तळे जे आशेला बुडवूनच टाकते.
मृत्यूची वेदना जी किंचाळायला लावते.
समजतेय मला.
जगण्यातला अगदी छोटासासुद्धा भाग कसा दंश करत राहतो.
आहे माहीत मला.
की तू वैफल्यग्रस्त आहेस.
एकाकी एखाद्या बिंदूसारखा.
--- ००० ---

निकॅनोर पारा – २० व्या शतकातला स्पॅनिश भाषेतला महत्त्वाचा चिलियन कवी – १९१४ ते २०१८ – नकवितेचा (Anti poetry) उद्गाता – कवितेतली अलांकारिकता, भावनिकता आणि उदात्त बडेजाव यांना विरोध – त्याची ' मॅनिफेस्टो ' ही कविता या संदर्भात पाहावी – उपरोध, विनोद यांचा मुक्त वापर – (कवी समुदायात सर्वात जास्त जगलेला माणूस – १०३ वर्षे ! – मी तोच आदर्श घेणार आहे – त्याच्याबद्दल आदर असल्याने त्याचा विक्रम नाही मोडाणार, पण १०२ पर्यंत तरी जावे, असा माझा विचार आहे --)

तरुण कवी (Young Poets)
-- निकॅनोर पारा – अनु० – चं. प्र. देशपांडे.

बिनधास्त तुमच्या इच्छेप्रमाणे लिहा
तुम्हाला हव्या त्या शैलीत लिहा
पुलाखालून खूपच रक्त गेलेय वाहून
हेकट खात्री बाळगत राहण्यात
की एकच असतो बरोबर आणि योग्य मार्ग

कवितेत सर्व गोष्टींना परवानगी असते

अट एकच असते अर्थात की तुम्ही
कागदाच्या कोरेपणात सुधारणा केली पाहिजे
--- ००० ---

वरील कवितेचा काही महिन्यांपूर्वी केलेला अनुवाद --

तरुण कवी

हवे ते लिहा हो
तुम्हाला आवडेल त्या कोणत्याही शैलीत
खूपच रक्त वाहून गेलेय पुलाखालून
एकच मार्ग बरोबर असतो
असे मानत राहण्यात
कवितेत काहीही चालते
पण अर्थात एक आहे बुवा अट
कोरे पान आहे तसे राहू नये
अबोल
--- ००० ---

शेवटचा सन्मान (The Last Toast)
-- निकॅनोर पारा – अनु० – चं. प्र. देशपांडे.

आपल्याला आवडो वा न आवडो
आपल्याला फक्त या तीनांतूनच करायचीय निवड
काल, आज आणि उद्या.

आणि तसे तर तीनही नाहीतच
कारण तत्त्वज्ञाच्या म्हणण्याप्रमाणे
काल हा काल असतो
तो फक्त स्मृतीतच आपला असतो.
एकदा तोडलेल्या गुलाबातून
अधिक पाकळ्या नाही मिळू शकत.

खेळायचे पत्ते
तसे दोनच आहेत
वर्तमान आणि भविष्य

आणे तसे तर दोनही नाहीयत
कारण ही एक सर्वज्ञात गोष्ट आहे
की वर्तमान अस्तित्वातच नाहीय
तो नुसता चाटून जातो आणि संपतो
तारुण्याप्रमाणे, एवढे सोडल्यास.

त्यामुळे शेवटी
आपल्याला फक्त उद्याच उरतो.
मी माझा ग्लास उंचावतो
त्या कधीच न येणाऱ्या दिवसासाठी.

पण तेवढेच तर आहे
आपल्या हातात.
--- ००० ---

मी जे बोललो ते सर्व मागे घेतोय (I take back Everything I've Said)
-- निकॅनोर पारा – अनु० – चं. प्र. देशपांडे.

जाण्यापूर्वी
मी एक शेवटची इच्छा बोलणे गरजेचे आहे :
उदार अंतःकरणाच्या वाचका

जाळून टाक हे पुस्तक
मला जे म्हणायचे होते ते हे मुळीच नाहीय
जरी ते रक्ताने लिहिलेले असले तरीही
मला जे म्हणायचे होते ते हे नव्हे.
माझ्याइतके दुर्दैवी कुणीच नसेल
माझ्याच सावलीने केलाय माझा पराभव :
माझ्या शब्दांनी सूड घेतलाय माझ्यावर.
मला माफ कर माझ्या वाचका, माझ्या उत्तम वाचका
कारण मी घेऊ शकणार नाहीय तुझा निरोप
सौहार्दपूर्ण आलिंगनाने तर घेणार आहे
एका बळेबळेच आणलेल्या अशा उदास स्मिताने.
बहुतेक एकूणात मी तेवढाच असेन
पण ऐक माझे हे शेवटचे शब्द :
मी जे काही बोललो ते सर्व मी मागे घेतोय.
जगातल्या आत्यंतिक कडवटपणाने
मी जे बोललो ते सर्व मागे घेतोय.
--- ००० ---